
# शब्द रुची

४४

ऑगस्ट २०१९
मूल्य १० रुपये
पृष्ठे ४८








# बीएमएम अधिवेशन डॅलस पुस्तक प्रकाशन आणि स्टॉलवरची  क्षणचित्रे




अविनाश पाध्ये आणि विनता कुलकर्णी यांनी पुस्तकप्रकाशनाचे सूत्रसंचालन केले.
सोबत 'ग्रंथाली'चे लेखक प्रगती कोळगे, रमेश वाघमारे, डॉ. अनंत लाभसेटवार, प्रकाश अंबुरे, डॉ. विजय ढवळे, दीपक करंजीकर, संदीप काळे.
'पुस्तकचोर'चे प्रकाशन करताना सई हिंगलासपूरकर.
'शब्द रुची' विशेषांकाचे प्रकाशन करताना श्रीधर पाटील.













'ग्रंथाली' परिवार. सोबत डॉ. रविन थत्ते,  डॉ. अरुणा ढेरे, विद्या हर्डीकर–सप्रे, डॉ. शशिकांत अहंकारी, श्री. काळे, गजानन सबनीस, डॉ. विजय जोशी, संजय मोने, स्पृहा जोशी, विद्या करंजीकर, सुबोध भावे आणि मान्यवर

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची

ऑगस्ट २०१९, वर्ष सातवे
अंक चौथा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**
**ज्यांची वर्गणी मनिऑर्डरद्वारे १०० अथवा १५० रुपये येईल त्यांना अंक फक्त ६ महिनेच पाठवला जाईल.**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com www.granthali.com

**ग्रंथाली ऑफिसची वेळ १ एप्रिलपासून १२ ते ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी वाचक व विक्रेते यांनी याची नोंद घ्यावी.**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**स्मरणस्वर**
- एक बंडखोर पँथर
  **अर्जुन डांगळे / ६**
- सृजनमस्तीत रमलेला अवलिया!
  **अजीम नवाज राही / ९**

**कथा-कविता**
- दोन समुद्र
  **रवींद्र भगवते / १२**
- दप्तरातल्या कविता
  **प्रशांत असनारे / १६**

**ललितरंग**
- नक्षत्रांकित पाऊस
  **अनुजा जोशी / १७**
- इंदिरा संतांच्या यांच्या भास कविता
  **मधुवंती सप्रे / २१**

**नोंदी-निष्कर्ष**
- नव्वदोत्तर मराठी साहित्य : काही प्रश्न
  **डॉ. प्रभाकर देसाई / २५**
- 5G ''व्हावे''!
  **मोहन द्रविड / ३०**

**वाचता-वाचता**
- मार्टीयरडम टू फ्रिडम
  **गणेश मनोहर कुलकर्णी / ३३**

**आपल्या मातीतला चित्रपट**
- कुम्बलंगी नाईट्स
  **संतोष पाठारे / ३५**

**बीएमएम अधिवेशन डॅलस वृत्तांत / ३७**

- पुस्तकप्रकाशन आणि पुरस्कार वृत्तांत / **४१**
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे / ४३**

**सा**तवीत शिकणाऱ्या एका मुलाने चक्क स्वत:च्या अपहरणाचा कट रचला ही याच आठवड्यातील बातमी. परीक्षेत गुण कमी मिळालेले नि ओरडा बसणार हे त्याला चांगले ठाऊक होते. स्पर्धा इतकी वाढलेली सध्या की पालकांना मुलांनी ९०%च्या आतले मार्क मिळवले की जणू काही पापच केले असे वाटते. साध्या-साध्या वर्गपरीक्षा (क्लास टेस्ट्स) मध्येही मुलांनी घोकंपट्टी करून पैकीच्या पैकी गुण मिळवावे असा पालकांचा अट्टाहास असतो. हा अट्टाहास आणि पालकांच्या अपेक्षांचे डोंगर इतके मोठे असतात की मुलं त्याखाली पार दबतात. त्यांच्या कोंडमाऱ्याची वाफ मग बाहेर पडण्याकरता वेगवेगळ्या वाटा शोधायला लागते.

वर उल्लेखिलेल्या मुलानेही अशीच वाट शोधली असणार. त्याला आठवले की त्याच्या एका मित्राचे अपहरण झाले होते आणि तो सापडल्यावर आई-बाबा त्याच्यावर प्रचंड प्रेम करू लागले, त्याला जिवापाड जपू लागले म्हणून त्याने स्वत:च स्वत:च्या अपहरणाचा बेत रचला. मुलं आणखी मोठी झाली की त्यांचे प्रश्न अजूनच गंभीर होत जातात. एकतर लहानपणापासूनच मुलीसारखे रडायचे नाही, हे मुलग्यांना घराघरात शिकवलेले! त्यामुळे त्यांचे सर्व ताण सोसायचीच त्यांना सवय लागलेली... पण हे सोसणे कठीण मग ते विसरण्याकरता मुलं असे मार्ग शोधतात, जे त्यांनाच सजा देतात. मुलांच्या बॅगांमध्ये दारूच्या बाटल्या, गांजा, ड्रग्ज, सिगार, नशेचे सामान सापडणे या गोष्टी नवख्या राहिलेल्या नाहीत.

असाच एक मुलगा माझ्यासमोर उभा, भेदरलेला-घाबरलेला. त्याच्या बॅगेत ड्रग्ज सापडले होते. काही बोलायला तयार नव्हता. आधी तोंड नुसतं शिवलेलं आणि ओठ चावत उभा. डोळ्यांखाली वर्तुळे... जणू काही झोपलाच नाही खूप दिवस. हळू-हळू मी बोलत राहिले, त्याला प्रश्न विचारत राहिले. माझ्या आवाजतली त्याच्याबद्दलची काळजी त्याला खरी वाटली असावी. मग तो भडाभडा बोलू लागला, ''आईशी त्याचे मुळीच जमत नाही. पप्पांना त्याच्यासाठी अजिबात वेळ नाही. अभ्यासात त्याचे लक्ष लागत नाही.''

तरुणांचे - वाढत्या वयातल्या मुलांचे प्रश्न अतिशय गुंतागुंतीचे होत चालले आहेत. विशेषत: आईबाप नि मुलांच्या नात्यातला विसंवाद अनेक घरांतून स्पष्टपणे दिसतो आहे यातूनच मुलांचं भरकटणं, नैराश्यात हातून चुकीचं काहीतरी घडणं, ताण विसरण्याकरता व्यसनांच्या आहारी जाणं हे सारं घडत जातं.

अलीकडे घर आणि महाविद्यालयीन शिक्षणाचं ठिकाण यात अंतर असतं. मुले शिकण्यासाठी दूर राहतात. अशावेळी एका बाजूला अमर्याद स्वातंत्र्य आणि दुसऱ्या बाजूला 'पिअर प्रेशर' या कात्रीत ही मुले सापडतात. हॉस्टेल लाईफ आणि रॅगिंग हा याच बरोबरीने येणारा विषय. महेश एलकुंचवार यांची 'होळी' ही एकांकिका आजही यासंदर्भात लख्ख आठवते. रॅगिंगमुक्त कॅम्पस ही शिक्षणक्षेत्राची गरज आहे. वेगवेगळ्या पद्धतीने सिनियर्सनी ज्युनिअर्सचे स्वागत करण्याचे ट्रेंडस् देखील समांतरपणे सुरू झालेत.

साठीच्या दशकातल्या 'कोसला'ने युवापिढीचा संघर्षकल्लोळ समोर आणला. नव्वदोत्तर काळातला तरुणाईचा कोलाहल बहुआयामी आहे. मानवी नात्यांमधले विसंवाद, नोकरीतली असुरक्षितता, स्वत:ला क्षणोक्षणी सिद्ध करण्याचा ताण, अपयशाची भीती, यशाची बेसुमार धुंदी, आभासी जगातले अस्तित्व टिकवण्याचा अट्टाहास अशा अनेक गोष्टी या कोलाहलात दडल्या आहेत. हा

कोलाहल मराठी साहित्यविश्वात अजून पुरता आलेला नाही.

अलीकडे मला अजून एक समस्या ठळकपणे दिसते. ‘लर्निंग डिसेबिलिटी’ असलेल्या मुलांच्या संख्येत वाढ होऊ लागली आहे. हे का घडते आहे याचा मी फार बारीक विचार करतेय सध्या. काय प्रश्न असतात या मुलांचे? कुठे काय चुकलेलं असतं लहानपणी यांच्या बाबतीत? का वाटते त्यांना विशिष्ट अभ्यासविषयांची भीती? या प्रश्नांची उत्तरे सोपी नाहीत.

काही दिवसांपूर्वी एक मुलगा मला भेटला. त्याचे म्हणणे असे होते की आईवडिलांचा त्याच्यावर खडा पहारा असतो नि या पहाऱ्याचा त्याला त्रास होतो. इतका त्रास की त्याचा सगळा आत्मविश्वास त्यामुळे हरवल्यासारखा झालाय. अशा काही केसेसही जवळून पाहतेय की आईवडिल लांब, मुलं हॉस्टेलमध्ये. त्यांची नुसती मनमानी. पुन्हा मुलं एकुलती एक. अभ्यासबिभ्यास कोसो दूर. मुलं भलत्या-भलत्याच गोष्टीत अडकलेली. आईबाप केवळ अगतिक! अस्वस्थ करणाऱ्या अशा गोष्टींबद्दल बोललं गेलं पाहिजे तरच प्रश्नांची उत्तरं मिळतील.

० ० ०

गेल्या महिन्यातला बीएमएम अधिवेशन विशेषांक अतिथी संपादक आल्हाद गोडबोले यांनी सपांदित केला होता. त्याचे सातासमुद्रापार चांगलेच स्वागत झाले. सप्टेंबर महिन्याचा अंक डॉ. लतिका भानुशाली संपादित करणार आहेत. विविध लोकसंस्कृतींचा परिचय या अंकातून वाचकांना घडणार आहे. याही अंकाचे जिज्ञासू वाचक स्वागत करतील याची खात्री आहे.

० ० ०


मराठी साहित्यविश्वातली दोन व्यक्तिमत्त्वं काळाच्या पडद्याआड गेली. त्यांनी उमटवलेली अक्षरमुद्रा मात्र चिरायू आहे. लेखकाने वा कवीने जगाचा निरोप घेतला तरी त्याचे शब्द मात्र अक्षय सोबत राहतात.

*त्या कोवळ्या फुलांचा बाजार पाहिला मी*
*पैशात भावनेचा व्यापार पाहिला मी*
*थोडा उजेड ज्याला मागावयास गेलो*
*तो सूर्यही जरासा लाचार पाहिला मी*

गझलकार अनिल कांबळे यांची ही गझल तशीच अजरामर...

**– डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व),
मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

## ‘पुल’ चरित्र ‘राजहंस’चे




स्नेहल भाटकर, सुधीर फडके, ग. दि. माडगूळकर आणि पु. ल. देशपांडे यांच्या जन्म शताब्दीनिमित्त प्रसिद्ध केलेल्या रुचीच्या जुलैच्या विशेषांकात पुलंच्या व्यक्तिमत्त्वाचे, स्वभावाचे पैलू दाखविणारे काही उतारे मंगला गोडबोलेलिखित ‘पुल : चांदणे स्मरणाचे’ या नुकत्याच प्रकाशित झालेल्या चरित्रातून घेण्यात आले होते. लेखिकेने आणि ‘राजहंस’चे दिलीप माजगावकर यांनी संमती दिल्यामुळे ते पुनर्प्रकाशित होऊन ‘बीएमएम’च्या आणि ‘ग्रंथाली’च्या वाचकांपर्यंत पोचले. मात्र हे पुस्तक राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केले असल्याचा उल्लेख त्या उताऱ्यांसोबत करण्याचे राहून गेले होते. अनवधानाने झालेल्या या चुकीबद्दल या विशेषांकाच्या अभ्यागत संपादक या नात्याने मी दिलगिरी व्यक्त करतो.

**– आल्हाद गोडबोले**

आंबेडकरी विचार आणि चळवळीतील झुंजार झंझावात राजा ढाले यांच्या आठवणी जागवणारा लेख

# एक बंडखोर 'पँथर'

**अर्जुन डांगळे**

**भ**ल्या सकाळी बातमी कळली, राजा ढाले गेल्याची. आदल्या रात्रीच सुहास सोनावणे या अभ्यासक संशोधक मित्राच्या अभिवादन सभेत श्रद्धांजली वाहिली होती. राजाच्या निधनाच्या बातमीने मन विषण्ण झाले. चाळीस-पंचेचाळीस वर्षांचा भूतकाळ डोळ्यांपुढे सरकू लागला.

राजाराम पिराजी ढाले ऊर्फ राजा ढाले. चाळीस वर्षांपूर्वी त्याला म्हाडाचं म्हणजे हौसिंग बोर्डाचं घर, कन्नमवार नगर विक्रोळी येथे मिळालं तेव्हा त्याला फार आनंद झाला. त्यावेळी ते बघायला मला घेऊन तो आला होता. ''चला आता पुस्तकं सुरक्षित राहतील आणि काहीतरी लिखाण शांतपणे करता येईल.'' शांतपणे तो बोलत होता. राजा त्यावेळी अविवाहित होता. घर मिळाल्यावर साधारणत: लोक लग्नाचा-संसाराचा विचार करतात पण राजाची 'सोय' वेगळीच होती. साहित्य आणि कलेवर त्याचं निस्सीम प्रेम होतं.

या छोट्याशा लेखात राजा ढालेच्या कुठच्या अंगाबद्दल लिहायचे याबद्दल प्रश्नच पडतो. कवी, समीक्षक, अभ्यासक, विचारवंत, चित्रकार, प्रतिभावंत ही कला साहित्यातील अंगे त्याच्या जवळ होतीच. पण सामाजिक विशेषतः आंबेडकरी चळवळीविषयीचा त्याचा दृष्टिकोन आणि बाबासाहेबांनी स्वीकारलेल्या बौद्ध धम्माचे मूलभूत आकलन आणि त्यावर त्याने केलेले भाष्य हे वेगळेच आहे. राजा ढाले याची सगळीच मते किंवा भूमिका ही योग्यच होती असे मी मुळीच म्हणणार नाही. त्याबद्दल मतभेद असू शकतात. पण राजा ढाले हा धगधगती ऊर्जा निर्माण करणारा 'पँथर' होता. त्याच्या प्रत्येक लेखातून जाणवणारी अभ्यासू वृत्ती, चिंतनशीलता, तार्किकता आणि निर्भीड व स्पष्ट भूमिका ही थक्क करणारी होती. याचे प्रत्यंतर म्हणजे 'चिमणे, चिमणे दार उघड' हा राजा ढालेचा एकूण मराठी प्रस्थापित साहित्याचा आणि साहित्यिकांचे 'पोस्टमार्टेम' करणारा किंवा नामदेवच्या 'विद्रोह'मध्ये जो प्रदीर्घ लेख त्याने लिहिला, तो त्याची प्रचीती देणारा आहे. 'वाळवंटाची लेक' हा 'अस्मितादर्श'मधील संत जनाबाई यांच्या व्यक्तित्वाचा शोध लेख हा राजा ढालेच्या प्रतिभेचा आणि व्यासंगाची साक्ष देणारा होता. मला तो खूप आवडला. मी राजाला फोन केला. त्यावेळी त्याने माझे एक नुकतेच प्रकाशित झालेले पुस्तक पाठव असे सांगितले. मी त्याला त्याचे 'बौद्ध पूजा पाठ' मागितले. मी पुस्तक पाठवले. दोन चार दिवसांतच त्याचे पोस्टकार्डवर लिहिलेले पत्र आले की, पुस्तक सध्या उपलब्ध नाही. सांगायचा मुद्दा हा की त्याचे अक्षर वळणदार, स्वच्छ, सुंदर काळय़ा शाईत असायचे. लिखाण इतके टापटिपीने करणारा राजा ढालेशिवाय अन्य कुणी लेखक माझ्या पाहण्यात नाही. 'रिडल्स'चे जे आंदोलन झाले, त्यात सगळ्या आंबेडकरवादी पक्ष, संघटना एकत्र होत्या. त्या समितीचा अध्यक्ष मी होतो. 'फुले-आंबेडकर विचार संवर्धन समिती' असे तिचे नाव होते. हे नाव राजा ढाले यानेच सुचविले होते. तर या समितीने 'रिडल्स'संबंधी जी भूमिका मांडली ती दीर्घ भूमिका सुवाच्च्य, सुंदर हस्ताक्षरात राजा ढाले, रामदास आठवले आणि शिंदे नावाचे माझ्या कार्यालयातील मित्र या तिघांनी मिळून ती लिहिली आहे. राजा ढाले याच्या चित्रातील कल्पकता आणि आशयगर्भता बघायची असेल तर ज. वि. पवार यांच्या कवितासंग्रहाला जे मुखपृष्ठ त्याने काढले आहे ते पहावे. रेषा आणि रंग याचा अप्रतिम मेळ त्यात आहे.

दलित पँथरचा नेता म्हणून राजा ढाले याला अमाप आणि अद्वितीय प्रसिद्धी मिळाली. 'काळा स्वातंत्र्य दिन' या 'साधने'च्या रौप्य महोत्सवी अंकात लिहिलेल्या राजा ढाले याच्या लेखाने खळबळ माजविली. विदुषी दुर्गा भागवत आणि राष्ट्रध्वजावर केलेल्या विधानाने राजा ढाले प्रकाशझोतात आला. या अगोदर लघु अनियतकालिकांच्या चळवळीमुळे वाङ्मयीन क्षेत्रात त्याचा दबदबा होताच. पण सामाजिक क्षेत्रात ही त्याची पहिली खळबळजनक कृती होय. 'साधना'वर टीकेचा वर्षाव सुरू झाला. 'साधना'ला पाठिंबा देण्यासाठी 'दलित पँथर' उतरली. पुढे 'वरळीची दंगल' झाली. राजा ढाले याच्यावर खटले भरले गेले. पोलिसांनी त्याला प्रचंड मारहाण केली. त्याचे डोके फुटले, अटक केली गेली. जामिनावर सुटल्यावर राजा काही दिवस माटुंगा लेबर कॅम्पमध्ये राहिला. माझ्या घरी दोन दिवस होता. अशोक जैन यांनी माझ्याच घरी 'मनोहर'साठी त्याची मुलाखत घेतली.

राजा 'साधने'तील ज्या 'काळा स्वातंत्र्यदिन' या लेखामुळे प्रसिद्ध झाला. त्या लेखाविषयीची माहिती सांगणे आवश्यक आहे. 'दलित पँथर'च्या स्थापनेपूर्वी दलितांवरील व महिलांवरील अन्याय-अत्याचार विरोधात लढण्यासाठी 'युवक आघाडी' या संघटनेच्या नावाने काम करीत होतो. मी, राजा ढाले आणि सिद्धार्थविहार वडाळा येथे राहणारे विद्यार्थी तरुण आघाडीवर होतो. त्याच वेळी 'युवक क्रांतीदल' ही संघटना देखील कार्यरत होती. दोन्हीकडचे कार्यकर्ते एकमेकांशी संवाद साधून आणि परिचित



**रिपब्लिकन नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यासह राजा ढाले, अर्जुन डांगळे आणि ज. वि. पवार हे तीन पँथर.**

होते. डॉ. अनिल अवचट 'युक्रांद'मध्ये सक्रिय होते. स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचे संपादन करण्याची जबाबदारी 'साधना'ने डॉ. अनिल अवचट यांच्याकडे दिली होती. एके दिवशी म्हणजे जून १९७२ मध्ये डॉ. अनिल अवचट आणि युक्रांदचे मार्गदर्शक प्राचार्य मे.पुं. रेगे सिद्धार्थ विहारच्या हॉस्टेलवर आले. 'युवक आघाडी'च्या कार्यकर्त्यांबरोबर चर्चा केली आणि 'साधना'चा रौप्यमहोत्सवी अंक 'दलित अत्याचार' संदर्भात काढायचे ठरले. त्यावेळी राजाने त्यात 'काळा स्वातंत्र्यदिन' हा लेख लिहिला. पुढे 'दलित पँथर'ची स्थापना झाली. 'दलित पँथर' पूर्ण ताकदीनिशी या लेखाच्या पाठीशी उभा राहिला आणि महाराष्ट्रात एक राजकीय-सामाजिक आणि सांस्कृतिक झंझावात उभा राहिला. याच अंकात माझा, प्रल्हाद चेंदवणकर, दया पवार यांचे लेख होते. तर सांगायचा मुद्दा हा की 'ग्रंथाली'ने पुढे दया पवार यांचं आत्मचरित्र 'बलुतं' हे काढलं. त्याचं मूळ या अंकातील दया पवार यांच्या 'विटाळ' या लेखात आहे. 'बलुतं'ने नवे पुढे वाङ्मयीन पर्व उभे केले. याचे श्रेय 'ग्रंथाली'च्या कारभारी मंडळींना जातेच, पण दिनकर गांगल आणि अरुण साधू यांना विशेष श्रेय जाते.

दलित पँथरच्या स्थापनेच्या अगोदरपासून राजा ढाले आणि माझी मैत्री होती. १९६७ साली मुंबईत महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभेच्या वतीने जे साहित्य संमेलन झाले त्यावेळी तो आणि वामन निंबाळकर माझ्या चेंबूरच्या जुन्या घरी म्हणजे प्रगती सोसायटीत आले होते. राजा ढाले सिद्धार्थ विहार हॉस्टेलमध्ये राहायचा. कस्टममध्ये नोकरीला होता. सिद्धार्थ विहारमध्ये त्या काळात चळवळीचे आणि समाजाचे भान जपणारे अनेक विद्यार्थी होते. त्या काळात म्हणजे सत्तरीच्या आसपास महाराष्ट्रात दलितांवर, स्त्रियांवर अन्याय-अत्याचाराची मालिकाच सुरू झाली होती. त्याविरुद्ध आवाज उठविण्यासाठी आम्ही 'युवक आघाडी' नावाची संघटना उभारली होती. मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानाजवळ धरणेदेखील धरले होते. 'तरुण मराठी कवी' या नावानेही आम्ही फतवे काढायचो. अर्थात यात पुढाकार राजा ढालेचा असायचा. दलितांविरुद्ध अन्याय, अत्याचार थांबले नाही तर आम्ही हातात शस्त्रे घेऊ, अशा आशयाचा एक फतवा आम्ही काढला होता. मी, राजा ढाले आणि नामदेव, बाबूराव बागूल यांच्या माटुंगा लेबर कॅम्पातील घरी सहीसाठी गेलो. बाबूरावांनी आम्हाला समजावत नकार दिला. राजाचे एक वैशिष्ट्य होते ते म्हणजे तो अतिशय तर्कशुद्ध मांडणी करायचा. त्याने बाबूरावांना त्यांच्याच एका कवितेतील ओळी सांगितल्या. त्या अशा होत्या,

'ज्यांनी चूक केली इथे जन्म घेण्याची
त्यांनीच ती सुधारली पाहिजे
देश सोडून अथवा
भीषण युद्धे करून'

नंतर कवितेची भाषा, जगण्यातील भाषा यावर चर्चा झाली. दुसरे उदाहरण नारायण सुर्वे यांच्या कवितेचे. नारायण सुर्वे यांचा 'माझे विद्यापीठ' हा कवितासंग्रह खूपच गाजला. नारायण सुर्वे यांच्याबद्दल आम्हाला प्रचंड आदर होता. पण 'येरू' या अनियतकालिकात राजा ढालेने या कवितासंग्रहावर परीक्षण लिहिले. त्यात त्याने एका विसंगतीवर बोट ठेवले. एका कवितेत सुर्व्यांच्या ओळी होत्या. 'ग्रंथ लेनिनचा पठण केला आम्ही' तर दुसऱ्या एका कवितेत ओळी होत्या 'अनुभव हाच ग्रंथ, बाकी सारे ग्रंथराज कोलमडून पडतात.' मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचा कट्टा

म्हणजे सत्तरीच्या दशकातील विद्रोही, दलित, संतप्त मार्क्सवादी अशा कवी-लेखकांचा अड्डा होता. तिथे आमची आणि सुर्व्यांची भेट झाली. राजाने दाखविलेली विसंगती त्यांनी दिलदारपणे स्वीकारली होती.

बौद्ध धम्माचा त्याने अंगाने अभ्यास केला होता. विशेषत: बौद्ध तत्त्वज्ञानातील साहित्याच्या अभ्यासाकडे त्याचा विशेष कल होता. एम.ए.ची परीक्षा आम्ही दोघांनी एकाच वेळी दिली होती. त्याचा विषय सौंदर्यशास्त्र तर माझा भाषाशास्त्र होता. ज. वि. पवार, परेन जांभळे, अनिल थत्ते हे माझे वर्गमित्र होते. राजाला साहित्यातील सौंदर्याची जाण होती. त्यातूनच 'झेन' कथा भाषांतरित केल्या होत्या. 'झेन' हे जपानमधील बौद्ध धम्माचेच एक अंग होय. त्याला झेन संप्रदाय म्हणतात. अनुभवांवर आधारित अशा छोट्या-छोट्या कथा ज्याला 'झेन कथा' म्हणतात. त्या त्याने अनुवादित केल्यात. शिवाय धम्मपदातील अनेक पदांचा अतिशय तरल आणि रसाळ अनुवाद त्याने केला आहे. राजाने भरपूर लिहिले पण प्रसिद्ध करण्यात तो फार काटेकोर होता. त्याला अनेक कारणे आहेत. राजाचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित होणे आवश्यक आहे.

राजा ढाले हा एक विचक्षण असा संपादक होता. तो चित्रकार असल्यामुळे त्याच्या अंकाची मांडणी इतकी नेटकी आणि सुबक असायची. त्यामुळे त्यांनी संपादित केलेले 'जातक', 'धम्मलिपी' ही नियतकालिके नजरेत भरणारी असायची. संपादकीय निवडीबाबत तो अतिशय चोखंदळ असायचा. बाबूराव बागूल 'आम्ही' नावाचे मासिक काढीत. त्यांच्याकडे साहित्याचा प्रचंड ओघ असे. मी, राजा आणि बरेच जण त्यांना साहित्य निवडीबाबत मदत करायचो. एकदा किंग्जसर्कल येथील माहेश्वरी उद्यानात बाबूराव बागूल, मी आणि राजा 'आम्ही'कडे आलेल्या साहित्याचे बाड घेऊन बसलेले असताना राजाने प्रल्हाद चेंदवणकरांची 'चहाचा कप' ही कविता राजाच्या हाती लागली. कविता छोटीच होती. राजाला ती खूप आवडली. तो खूश झाला. त्याला एखादी गोष्ट आवडली की तो भरभरून बोलायचा. 'आम्ही'च्या अंकात प्रल्हाद चेंदवणकरांची कविता प्रसिद्ध झाली. कविता वाचनाच्या कार्यक्रमात प्रल्हाद ह्या कवितेवर खूप टाळ्या घ्यायचा. त्याची दुसरी गाजलेली कविता म्हणजे 'माझा बाप' ही होय. राजाला वाङ्मयीन अहंकार निश्चितच होता, पण तरुण-नव्या प्रतिभावंताचा तो नेहमीच शोध घ्यायचा.

नामदेव आणि राजा हे दोघेही माझे मित्र. आंबेडकरी चळवळीतल्या सर्व स्तरावर फाटाफूटघडवून आणणारा 'मार्क्सवाद - आंबेडकरवाद' हा मुद्दा नंतर पुढे आला. पँथरमध्ये फूट पडली. अर्थातच मी वैचारिकदृष्ट्या नामदेव ढसाळच्या पाठीशी उभा राहिलो. हा सगळा इतिहास क्लेशदायक आहे. पुढे राजा ढालेने 'दलित पँथर' बरखास्तीची घोषणा केली आणि 'मास मूव्हमेंट' नावाची संघटना उभी केली, पण राजा ढालेची एकूणच प्रवृत्ती आणि प्रकृती ही 'मास लिडर' या कल्पनेशी मिळतीजुळती नव्हती. नंतरच्या काळात मी बाळासाहेब आंबेडकरांसोबत भारतीय रिपब्लिकन पक्ष, भारिप बहुजन महासंघ स्थापन केला. आज जसा वंचित बहुजन आघाडीला जनाधार आहे तसाच जनाधार 'भारिप-बहुजन महासंघा'ला होता. राजा ढाले व त्याचे सहकारी ज. वि. पवार हे भारिप - बहुजन महासंघात सामील झाले. पुन्हा आम्ही बरोबर काम केले. राजा ढालेला लोकसभेचे उमेदवार केले गेले. मध्य मुंबईत त्याला लाखाच्या वर मते मिळाली, पण राजा ढाले याचे व्यक्तिमत्त्व चौकटीत आणि 'आदेशा'त बसणारे नव्हते. आमच्यासारखे अनेकजण तिथून बाहेर पडले तसे राजा ढालेही तिथून बाहेर पडला. ज. वि. पवार अजून तिथेच आहेत.

मला बऱ्याचवेळा एका राजा ढालेमध्ये दोन राजा ढाले दिसायचे. ते म्हणजे वैचारिकता आणि भूमिकेच्या बाबतीत ठाम असलेला शिष्ट वाटणारा, आपले मत स्पष्टपणे हट्टाने मांडणारा, तार्किकता आणि संदर्भ देऊन आपली भूमिका भक्कम करणारा राजा ढाले. राजाने बोटचेपेपणाची भूमिका कधी घेतली नाही. बौद्ध संस्कार आणि विपश्यना या संदर्भात तो सडेतोड बोलायचा. अनेकजण अस्वस्थ व्हायचे. दुसरा राजा ढाले म्हणजे पानाशिवाय कसलेही व्यसन नसणारा, साधेपणाने राहणारा, बस, ट्रेन, पायी प्रवास करणारा, बडेजाव न मिरविणारा, मित्रांसोबत हास्यविनोद करणारा.

राजा ढाले हा धगधगती ऊर्जा निर्माण करणारा 'पँथर' होता. त्याच्या प्रत्येक लेखातून जाणवणारी अभ्यासूवृत्ती, चिंतनशीलता, तार्किकता आणि निर्भीड व स्पष्ट भूमिका ही थक्क करणारी होती. याचे प्रत्यंतर म्हणजे 'चिमणे, चिमणे दार उघड' हा राजा ढालेचा एकूण मराठी प्रस्थापित साहित्याचा आणि साहित्यिकांचे 'पोस्टमार्टेम' करणारा किंवा नामदेवच्या 'विद्रोह'मध्ये जो प्रदीर्घ लेख त्याने लिहिला तो त्याची प्रचीती देणारा आहे. राजा गेला. याअगोदर नामदेव गेला. तसे मरण हे अटळच असले तरी सत्य एवढेच की, आजही तरुण पिढीवर ज्यांचे गारुड आहे असे 'पँथर पिढी' घडविणारे दोन मित्र निघून गेले.

दीक्षा वहिनींच्या योगदानाचा उल्लेख केल्याशिवाय राजा ढाले नावाचे व्यक्तिमत्त्व परिपूर्ण होऊच शकणार नाही. त्यादेखील कस्टममध्ये नोकरीला होत्या. राजा सार्वजनिक जीवनात सक्रिय झाल्यावर दीक्षा वहिनी त्याच्या पाठिशी निष्ठेने, कणखरपणे आणि ध्येयाने उभ्या राहिल्या. आयुष्यातील चढउतार सोसले. वर्ष-दीड वर्षापूर्वी राजाची कन्या गाथा आणि मित्रमंडळींनी दीक्षा वहिनींच्या पंच्याहत्तरीनिमित्त सत्कार घडवून आणला आणि गाथाच्या आग्रहामुळे माझ्या हस्ते सत्कार करण्यात आला. राजादेखील त्यावेळी उपस्थित होता. राजा गेला. याअगोदर नामदेव गेला. तसे मरण हे अटळच असले तरी सत्य एवढेच की, आजही तरुण पिढीवर ज्यांचे गारुड आहे असे 'पँथर पिढी' घडविणारे दोन मित्र दुरावा ठेवून एकमेकांशी संवाद न करता निघून गेले.

**- अर्जुन डांगळे**

भ्रमणध्वनी : ९८२०५०३१५४

लेखक पुरुषोत्तम बोरकर यांनी नुकताच जगाचा निरोप घेतला. त्यांच्या जगण्याचा हा अस्वस्थ करणारा आलेख!

# सृजनमस्तीत रमलेला अवलिया

## अजीम नवाज राही

*बिछडा कुछ इस अदा से के रूत ही बदल गई*
*एक शख्स सारे शहेर को विरान कर गया*
*वो तो बता रहा था कई दिन का सफर*
*जंजीर खिंच के जो मुसाफीर उतर गया*

**ज**सं पाणी तयार करता येत नाही, तशी काही माणसं नव्यानं घडत नाहीत. सत्यप्रत निर्माण करणे ईश्वरी कारखान्याचा स्थायीभाव आहे. ईश्वरी कारखाना छायांकित प्रत कधीच निर्माण करत नाही. गढुळलेलं पाणी नदीला पूर येण्याची शक्यता वर्तवते. सुसाट्याचा वारा वादळाच्या आगमनाची ग्वाही देतो. पुरुषोत्तम बोरकर अचानक निघून गेले. विजनवासाच्या बेटावर मस्तमौला जगणं जगणाऱ्या अवलिया लेखकावर आता तो निघून गेल्यावर वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरून येत आहेत. अलीकडे या प्रतिभासंपन्न लेखकाच्या आयुष्यात ठाण मांडून बसलेल्या सन्नाट्याची फारशी दखल मात्र कोणी घेतली नाही. अज्ञातवासाची तटबंदी अस्तित्वाभोवती वाढतच गेली. श्वासांची घसघशीत रक्कम मोजल्यावर मात्र आता आम्ही त्यांच्या जाण्याची ठसठशीत दखल घेत आहोत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक कोन होते यावर भाष्य करत आहोत. परिघावर जगणाऱ्यांचं दुःख यावर बौद्धिक काथ्याकूट करीत आहोत. विशिष्ट दृष्टिकोन किंवा मान्यतेच्या खिडकीतून आयुष्याचे निरीक्षण त्यांनी केले नाही, फक्त मांडली सर्वसामान्य माणसाची व्यथा!

माझ्या आणि बोरकरांच्या भेटीगाठी जवळजवळ नाहीतच जमा. प्रदीर्घ भेटीची काळजावर एखादी ठसठशीत मुद्रा नाही. एखाद्या साहित्य संमेलनात भेट झाली असेल पण तीही ओझरती! अपवाद तो फोनचा. बोरकरांचे वाचन चौफेर, सकस! कधी-कधी त्यांचा फोन यायचा. वऱ्हाडी बाजाचा करडा पण आत्मीयतेने ओथंबलेला नितळ, निर्मळ आवाज. भाऊ, अमुक दैनिकात सदर, तमुक नियतकालिकांत तुमची कविता वाचली. बोरकर भरभरून बोलायचे. त्यांच्या फोनला वेळकाळ नव्हता. कधी-कधी तर मध्यरात्रीच्या सुमारास त्यांचा फोन यायचा. सलग तेच बोलायचे. ऐकणाऱ्याला बोलण्याची संधी तशी कमीच. त्यांचे बोलणे म्हणजे भाषाउत्सवच. समर्थ परीक्षणाची रेशीमवीण उसवत जायची. बोरकर आपल्याच निर्मितीवरच बोलत आहेत म्हणून त्यांच्या बोलण्यात व्यत्यय आणायची माझीही हिंमत व्हायची नाही. बोलण्याच्या त्या मर्यादित अवकाशात ते कवितेचा, ललित लेखाचा डोळस धांडोळा घ्यायचे. बेंबीच्या देठापासून दाद द्यायचे. ऐकताना गुलमोहरासारखी सर्वांग डवरल्याची जाणीव व्हायची. वऱ्हाडी लहेज्यातले त्यांचे बोलणे म्हणजे रसनिष्पत्तीचा दणकट अविष्कार. वाक्यागणिक शब्दरसवत्तेची रसाळ अनुभूती. बोरकरांशी बोलणे म्हणजे टवका ग्रंथ वाचल्याची समृद्ध जाणीव. ती समृद्ध जाणीव फोनवरच्या संवादाच्या माध्यमातून मी कैक वेळा अनुभवली. खामगावला स्थिरावल्यानंतर एक अंतहीन दुंभगलेपण त्यांच्या हिश्श्याला आल्याचे त्यांच्या बोलण्यातून मला जाणवायचे. कर्करोगाने पत्नीच्या निधनानंतरची वैफल्यग्रस्तता आवंढा गिळत हिकमतीने ते लपवायचे. शल्य लपवण्याचे कौशल्य त्यांनी आत्मसात केले असावे असं मला


पुरुषोत्तम बोरकर

वाटायचं. संघर्षाचा वैशाख त्यांनी हसत-हसत साहिला. काही नशिबवंत तयार रस्त्यांचे मुशाफीर असतात. काहींना आपले रस्ते स्वतः तयार करावे लागतात. बोरकर दुसऱ्या पठडीतले. 'मेड इन इंडिया' कादंबरीचे आभाळाएवढे यश. त्या यशाची डोळे दिपवणारी प्रभावळ पाठीशी असताना व्यवहाराच्या अबलख घोड्यावर मांड ठोकण्यात मात्र ते अपयशी ठरले. व्यवहारावरची पकड जरी सैल पडली तरी लेखनावरची पकड मात्र त्यांची घट्ट होती. त्यांच्या मनात सतत निर्मितीविषयक सलग घुसळण असायची. ती घुसळण, ती अस्वस्थता आयुष्याच्या कातरवेळेपर्यंत कायम राहिली. सतत अभिव्यक्तीचाच विचार. कदाचित याच विचारांमुळे व्यावहारिक ताणेबाणे विस्कटत गेले, पण त्याची तमा त्यांनी कधी बाळगली नाही. पानझडीच्या नाकावर टिच्चून सर्वांग डवरणाऱ्या गुलमोहरासारखे त्यांच्यातले शब्दझाड बहरत राहिले. बोरकरांचं जगणं म्हणजे वावटळीत दिवा लावल्यासारखं! जगण्याला भटकंतीची वेगवान चाके. चाकांच्या वेगाला अर्थप्राप्तीचा नाही सकस साहित्यनिर्मितीचा ध्येयासक्त ध्यास. भटकंती त्यांना आयुष्यभर खुणावत राहिली. त्यांचाही भटकंतीवर जीव जडला. भटकंतीला

त्यांनी आयुष्यभर परके केले नाही. अपवाद फक्त खामगाव शहरातल्या अलीकडच्या वास्तव्याचा, ज्याची माती जिथे असते तो तिथेच येऊन आपल्या आयुष्याचे शेवटचे श्वास पूर्ण करतो. ज्या वातावरणातलं झाड त्याच वातावरणातच वाढत असते. माणूस ज्या हवेत श्वास घेतो तीच हवा त्याच्या निर्मितीतून वाहिली पाहिजे. बोरकरांच्या निर्मितीची नाळ सर्वसामान्य माणसाशी, मातीशी घट्ट जुळलेली. त्यांच्या कवितेची एक ओळ आजही माझ्या काळजात आपली मुळे घट्ट रोवून आहे.

रात्रीने गिळले
सारे दिवसाचे माणिक मोती




वऱ्हाडी भाषा, वऱ्हाडी माणूस, वऱ्हाडी माती कायम त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी राहिली. 'मेड इन इंडिया' कादंबरीमुळे वऱ्हाडीला राज्याच्या वाङ्मयीन विश्वाचे विस्तीर्ण आकाश कवेत घेता आले. विनोदाचा भरभक्कम पाया असलेली उपहासात्मक शैली मराठी साहित्यात अधोरेखित करण्याचे काम या कादंबरीने केले. अत्यंत सुपीक प्रतिभेचे धनी असलेल्या पुरुषोत्तम बोरकर यांनी लेखणी उचलावी आणि त्या लेखणीने धबधब्यासारखे कागदावर कोसळावे, ''होबासक्या ऊर्फ बांड्यापंचायती'' त्यांच्या या वाचकप्रिय सदराची आठवण कधी विस्मरणात जाणार नाही, इतका जिवंतपणा या सदरात होता. वऱ्हाडी स्तंभलेखनाच्या परंपरेचे खरे श्रेय निर्विवादपणे फक्त बोरकरांनाच देता येईल. पु.ल. देशपांडे यांना एका मुलाखतीत निवेदकाने प्रश्न केला. तुमच्या लेखनाव्यतिरिक्त तुम्हाला आवडलेलं पुस्तक नि लेखक कोण?



पु.लं.नी क्षणाची उसंत न लावता उत्तर दिले, कादंबरी 'मेड इन इंडिया' आणि लेखक पुरुषोत्तम बोरकर. मॅजेस्टिकने प्रकाशित केलेल्या या कादंबरीचे असे अनेक मिथक. मिथकांची एक प्रदीर्घ श्रृंखलाच. व्यावहारिक पडझडीत कैकवेळा बोरकरांनी मरण अनुभवले. कोसळल्यावर उभे राहण्याचे तंत्रज्ञान शिकले. त्यांच्या हिश्श्याला आलेल्या कुतरओढीच्या, ससेहोलपटीच्या, सततच्या भटकंतीच्या खाणाखुणा मनाच्या तळातून उसळून आलेल्या त्यांच्या कवितांमध्ये ठायीठायी दिसतात. वाचताना आपणही उद्विग्न होतो.

मी काळाचा पाचोळा
मजवर मृत्युचा डोळा
मुडदा दावी तिरडीला
तो माझा चौथा मळा
जीवन लालसारांजण
अस्थी घटातच गोळा
पुसल्या जाईल हा सर्व
स्थावरजंगमचा ताळा
झरे फसवती पाण्याला
देश हा चोरांचा पोळा
सातपिढ्या? हाव नको
सरणापुरते कर गोळा

उपरोक्त कवितेतलं आयुष्याचं जळजळीत पण वस्तुनिष्ठ तत्त्वज्ञान कोणीच नाकारू शकत नाही. बोरकरांची कविता शिळोप्याच्या गप्पा नव्हत्या. मे महिन्याच्या रखरखत्या उन्हात संघर्षाच्या खवळलेल्या डांबराने ही कविता लिहिली होती. लेखाच्या प्रारंभी मी लिहिलं की, काही तयार रस्त्यांचे मुशाफिर असतात. काहींना भाकर, घर, कपडे आणि पुस्तकांना एकत्र आणण्यासाठी आयुष्यभर दमछाक करावी लागते. ज्यांच्या हिश्श्याला भटकंतीचे जिणे येते त्यांची मांडणी वस्तुनिष्ठ असते. वाळवंटी वाऱ्याला सरावलेल्या त्यांच्या अभिव्यक्तीच्या कानात कल्पनाविलासाच्या अत्तराचा फाया टिकत नाही. बोरकरांची कविता वास्तवाच्या रखरखत्या उन्हाची रणरणती कहाणी.

बॅक-बॅलन्स, घर-दार
गाळ्या-फाळ्या, बायका
पोरं, वावर-गिवर, शिन्मा-थिएटर
इलाजच नस्ते!
एक दिवस सगळं सोळूनच जा लागते!!
०००००
कीर्ती, फिर्ती, प्रतिष्ठा-फ्रतिष्ठा
मान-सन्मान, लाजिरवाणे अपमान
स्टेज-गिज, माईक-फाईक,
काही प्रेम करणारे
काही हरामखोर नातेवाईक
इलाजच नस्ते!

एक दिवस सगळं सोळूनच जा लागते!!
००००
अकादमी-फकादमी
पद्मश्री-फद्मश्री
हे भूषण ते भूषण
भारतरत्न त्यासाठी प्रयत्न
इलाजच नस्ते!
एक दिवस सगळं सोळूनच जा लागते!!
००००
तिच्या
बायोकोच्या
आठवणी
शुक्राणूंचे सदेहपण
त्यांचे संगोपन
एक दिवस तेही संपते
इलाजच नस्ते
एक दिस सगळं सोळूनच जा लागते!!
००००
गटबाजी-फटबाजी
कारखाने-फारखाने
लाल दिवा-पिवळा दिवा
हा हवा-तो हवा
वर्षा-गिर्षा, आर्ची परशा
पार्लमेंट-व्हाईट हाऊस
गरिबांचा दुष्काळ, सुकाळ
ऊनवारापाऊस
हे पायज्ये ते पायज्ये
भरपेट उपवास, कट्टर रोजे
इलाजस नस्ते!
एक दिवस सगळं सोळूनच जा लागते!!
००००
मंत्र मांगं उरते एक फोटो
चंदनाचा हार घालून
मंत्र वर्षातून एक ताटभर जेवण पितरपरवाले,
दारू-फारू, मटन-फटन
शिरा-पुरी, बासुंदी-त्रिसुंदी
श्रीखंड-फ्रीखंड, वळे-भजे
सगळं मातीतल्या मनूतच मातीमोल होते
आणि मळकभर अस्थींची राख
नदीत विरघळते
इलाजच नस्ते!
एक दिवस सगळं सोळूनच जा लागते!!
००००

आयुष्य आणि मरण यांच्या सीमारेषा पुसून कुठलाही







आडपडदा न ठेवता बोरकरांनी किती साध्या-सोप्या भाषेत माणसाच्या गहनगूढ आयुष्याचे सगळे पदर ओघवत्या शैलीत उलगडले. माणूस वाचताना थक्क होतो. बोरकरांच्या जमिनीत खोलवर पाळेमुळे रुजवलेल्या अचाट प्रतिभेची दणकट प्रचिती येते. वाचल्यावर आयुष्यावरची सगळी रया क्षणार्धात उडून जाते. पतंगासारखा आकाशात उडणारा माणूस गपकन् जमिनीवर येतो.

पुरुषोत्तम बोरकर जाताना अनेक प्रश्नांच्या मालिका मागे सोडून गेले. काही माणसं लेखनावर जगतात. काही माणसं लेखन जगतात. बोरकर लेखनासाठी जगले. बँकेतली पी.आर.ओ.ची नोकरी सोडल्यावर अनेक वृत्तपत्रांमध्ये नोकरी केली. या नोकरीत त्यांचे निर्मितीक्षम मन रमले नाही. रमले असते तर 'आमदार निवास रूम नं. १७५६', '१५ ऑगस्ट भागिले २६ जानेवारी' अशा अफलातून शीर्षकाच्या सकस कादंबऱ्या प्रसवल्या नसत्या. आपल्या कफल्लक, भणंग जगण्याचा त्रागा त्यांनी चुकून मांडला नाही. सृजनमस्तीत प्रापंचिक अडीअडचणींचा पाढा वाचला नाही. नवनवीन शब्दांची निर्मिती त्यांच्या लेखनाचा स्थायीभाव. निर्मितीसाठी सतत अस्वस्थ असणारा हा अवलिया लेखक म्हरजे अस्वस्थतेचा लाटाळलेला समुद्र अचानक शांत झाला. मागे उरले विजनवासाचे, उपेक्षेचे, भटकंतीचे रहस्य. सकस लेखनासाठी सर्वकाही उधळून टाकणारा कलंदरीपणा. ग्रेस म्हणतात,

इथे कोणीतरी रचले होते
झिमझिम पाऊसगाणे
येता-जाता टाकीत होता
तो चिमण्यांना दाणे

**- अजीम नवाज राही**
भ्रमणध्वनी : ९४२१३९६६६९

‘‘बापरे... एवढ्या पावसात... काळोखात... ट्रकनं... आणि तो ट्रकवाला दिल्लीच्या निर्भया सारखा असता तर?’’ गौरीच्या अंगावर शहाराच आला.

# दोन समुद्र

**रवींद्र भगवते**

**गौ**री आणि बाबा चिपळूणच्या प्लॅटफॉर्मवर पोहोचले तेव्हा पाऊस धोधो कोसळत होता.अंधार गडद होत चालला होता.गाडीला अजून दिड तास अवकाश होता.पण गौरीनं वेळेआधी पोहोचावं उगाच टेन्शन नको असं टेन्शन बाबा नेहमीच घेतात.

म्हणून एवढ्या लवकर येऊन बसायचं......दोनदोन तास आधी.

‘‘तू गाडीत बसलीस की मी निघतो.’’ बाबा म्हणाले

‘‘बाबा, तुम्ही निघा. तेवढे थांबलात तर खूपच उशीर होईल तुम्हाला घरी पोहोचायला.पाऊस बघा नं किती कोसळतोय.’’ गौरीनं सांगून बघितलं.

‘‘थोडा वेळ तरी बसतो.’ बाबा म्हणाले. त्यांनी बसताना तिच्या हातावर थोपटलं.तेवढ्या स्पर्शात तिला जाणवलं....बाबांचं अंग चांगलंच तापलं होतं.

‘‘बाबा, तुम्हाला चांगलाच ताप भरतोय...खरंच तुम्ही निघा...मी रिटायरिंग रुममध्ये बसते....गाडीत बसल्यावर फोन करेनच....सेफ आहे इथे....आणि नेहमी तर जाते मी राज्यराणीनं..’’ बाबांना खरोखरच ताप भरपूर जाणवत असावा..चेहराच सांगत होता.

‘‘नेहमी जातेस हे खरंय बेटा......पण मी आजपर्यंत तू गाडीत बसेपर्यंत कधीच परत गेलो नाही.’’

‘‘आज जा मग....बाबा इथे खरंच सेफ आहे. आणि मी एकटी कुठे आहे? समोर पाच-सहा माणसं आहेत. ते बघा..समोर तर एक चांगलं कुटुंबच आहे. अजिबात घाबरू नका....खरंच जाइन मी.’’

मग हिंमत करून बाबा तिचा निरोप घेऊन निघाले. गौरी बाबांचा विचार करत बसली. पन्नाशीचे असूनही साठीचे वाटत होते. किती जीव आहे बाबांचा आपल्यावर! आज पहिल्यांदाच असे सोडून गेले.

तशी ही गाडी तिची नेहमीचीच... माहेरी आली की ती याच गाडीनं परत मुंबईला जायची. रिझर्वेशन करायचं. रात्री चिपळूणला साडेअकराला गाडीत बसायचं आणि झोपून जायचं. सकाळी सहाला ठाण्याला उतरायचं. ठाण्याला तिला घ्यायला महेश यायचाच स्कूटर घेऊन. प्रॉब्लेम असा काहीच नाही. आणि चिपळूण स्टेशनवर अगदी गाडीत बसेपर्यंत बाबा असतातच... आज मात्र गेले.

तिनं पंख्याखालची जागा पकडली. साडी चिंब भिजली होती. आता पंख्याखाली वाळेल. पण आज एवढी कमी माणसं कशी?... गाडी येईपर्यंत भरेल बहुतेक.

पाऊस आणि काळोख वाढत होता. एवढ्यात अनाउन्समेंट झाली.

‘‘पावसाच्या अतिवृष्टीमुळे आज मुंबईकडे जाणाऱ्या सर्व गाडया तीन ते चार तास उशिरा धावत आहेत.’’

माय गॉड! म्हणजे आता इथेच चार तास बसणं आलं. घरी जाण्यात अर्थ नव्हता. तसा जायला यायला एकच तास लागला असता. पण काळोखात आणि पावसात त्या सुरक्षित ठिकाणाहून बाहेर पडायची तिची हिंमत होत नव्हती.

गौरी बसून राहिली.

एवढ्यात तिनं गौरीचं लक्ष वेधून घेतलं. पाठीवर एक हॅवरसॅक घेऊन ती रिटायरिंग रुममध्ये शिरत होती. घट्ट जीन्स, घट्ट टॉप, केस कापलेले, गोरापान सुंदर चेहरा, चेहऱ्यावर स्वयंभू आत्मविश्वास.

मधोमध उभी राहून तिनं संपूर्ण रिटायरिंग रुमवर एक नजर फिरवली. गौरीच्या बाजूला जागा होती. ती तिथे आली. गौरीच्या शेजारी बसताना तिनं गौरीकडे पाहून एक छान गोड स्मित केलं.

गौरीही हसली.

बसल्यावर तिनं स्मार्टफोनवरून कोणाला तरी, किंवा कोणाकोणाला तरी भरपूर मेसेजेस केल... की चॅट करत होती कोणास ठाऊक . मग ती त्या उद्योगालाही कंटाळली.

आता गौरीकडे पाहून तिनं मघासच्यापेक्षा मोकळं स्मित केलं. हातावरच्या मोठ्ठाल्या घडयाळाकडे पहात खांदे उडवत म्हणाली,

‘‘माय गॉड... चारपाच तास बसायचं म्हणजे टु मच... ’’

‘‘हो ना.’’ गौरी म्हणाली.

‘‘यू आ आल्सो वेटिंग फॉ राजारानी?’’

‘येस’ गौरी मुद्दामच येस म्हणाली. आपल्याला इंग्लिश बोलता येतं हे हिला दाखवून द्यावं म्हणून ती पुढे म्हणाली,

‘आय ऑलवेज गो बाय धिस ट्रेन... बट टुडे इट इज... ...इट इज... जास्तच लेट आहे.’

इंग्रजी बोलताना गौरीची तारांबळ उडतेय् हे लक्षात येऊन ती हसली. गौरीलाच ओशाळं वाटलं.

‘डोन्ट वरी’ गौरीची अडचण ओळखून ती म्हणाली. ‘‘आय एम कम्फर्टेबल विथ मराठी... म्हणजे मराठीच आहे मी... आय एम सान्वी... सान्वी मराठे.’’

‘‘मी गौरी... गौरी दामले.’’

‘‘आमच्या चिपळूणला एक मराठे आहेत. बहादुरशेखजवळ.... ते...’’

''नो... सॉरी... आमचं चिपळूणला कोणीही नाही...''

''मग इथे... इथे कशी...''

''इथे हरणटेंभा आहे नं... नाइस प्लेस... तिथे नेचर ट्रेकला आले होते.''

''एकटीच?''

''नाही... चारपाच जणांचा आमचा ग्रुप होता.''

''मग?''

''त्यांनी साल्यांनी उद्या दांडी मारायचं ठरवलं. स्टे एक्सटेंड केला. पण मला उद्या जायलाच हवं. नो रजा.''

''मग तू तिथून एकटीच आलीस?''

''हो... माझा नवीन जॉब आहे. जरनॅलिस्टचा... नो लिव्ह.. ॲक्च्युअली इथे यायलाही वेहिकल मिळतच नव्हतं.''

''बापरे. . मग काय केलंस तू?''

''लिफ्ट ट्राय करत होते... कोणीही थांबत नव्हतं. शेवटी एक ट्रक थांबला... बरा वाटला ट्रक ड्रायव्हर... त्यानं सोडलं. ''

''बापरे... एवढ्या पावसात... काळोखात... ट्रकनं... आणि तो ट्रकवाला दिल्लीच्या निर्भया सारखा असता तर?'' गौरीच्या अंगावर शहाराच आला.

''रिस्क होती खरी. पण फेसरिडिंगनं बरा वाटला तो. ''

''तरीसुद्धा.''

''तरीसुद्धा काय?'' तिनं बॅग उघडली. एक बाटली काढली.

''हे बघ.''

''काय?''

''मिरची पावडर! टाकली असती त्याच्या डोळयात. शिवाय बसल्या बसल्या तीन-चार फोन केले. सगळ्यांना त्याच्या ट्रकचा नंबर दिला. पण सोडलं त्यानं ईमानदारीत... उतरल्यावर शंभर मागत होता... मी दोनशे दिले.''

''तुला भीती नाही वाटत?''

''काय असते ती?''

''बापरे.. मला तर रात्री काळोखात आणि पावसात इथून एकटीनं रिक्शास्टँड पर्यंत जायलासुद्धा भीती वाटेल.''

मग तिनं बॅगमधनं टॅब काढला. कोणतंतरी इंग्रजी इ-बुक वाचत बसली. पण त्यात तिचं मन रमत नसावं... ती उठली.

''माझी बॅग बघशील?... आले मी. ''

''हो... पण लवकर ये. ''

''हो.''

ती बाहेर गेली... कुठे गेली असेल?

दहा मिनिटात परत आली. डीओचा एक फवारा मारुन ती आली होती पण तिच्या जीन्सच्या खिशातून डोकावणारं सिगरेटचं पाकिट गौरीच्या नजेतून सुटलं नाही.

''तू सिगरेट ओढतेस ?''

''हो... व्हाय?''

''का ओढतेस?... चांगलं नाही ते.''

''कॅन्सर होतो म्हणून?''

''ते तर आहेच... पण... नाही बरं वाटत बघायला.''

''पुरुषांनी ओढली तर चालतं?''

''खरंतर ते सुद्धा मला आवडत नाही... पण मुलीनं ओढायची म्हणजे... हिडीस दिसतं. ''

''मीन्स?''

''खूप वाईट... खूपच वाईट.''

''माय डिअर... कारण तुम्हाला ते बघायची सवय नाही... फॉरिनर्सचं काही वाटतं?''

''पण तू कुठे फॉरिनर आहेस?''

''लीव्ह इट याऽऽर... डोन्ट ॲक्ट लाइक मय ग्रँडमा... बाय द वे..'' तिच्या मंगळसूत्राकडे पहात ती म्हणाली,

''लग्न कधी झालं तुझं?''

''दोन वर्षं झाली.''

''वय किती गं तुझं? थर्टी?''

''नाही... ट्वेंटी फायु... तुझं? ट्वेंटी-टु ट्वेंटी थ्री?''

''नाही गं... तुझ्याएवढंच... ट्वेंटी फाय.''

''लहान दिसतेस.''

''आय थिंक कपड्यांमुळे... स्टाइलमुळे असेल. तू साडीबिडी नेसतेस अगदी.''

''अगं सासूबाई म्हणतात की मी साडीतच छान दिसते.... महेशलाही आवडतं.''

''तुझा नवरा?''

''हो.''

''ओह् माय्! सासूला आवडतं म्हणून तू साडी नेसलीस... पण तू तर माहेराहून निघालीस ना?''

''हो... पोहोचणार आहे सासरीच ना?'' हे म्हणताना गौरी भरपूर लाजली.

''तुला आवडतं असं वागायला?... सासू सांगते म्हणून मनाच्या अगेन्स्ट?''

''मनाच्या अगेन्स्ट असं नाही गं... त्या खूश होतात ना... मग नेसली तर काय झालं? शिवाय नवऱ्यालाही आवडतं...दोघंही खूश... आपल्या अंगाला काय भोकं पडतात का?''

''डिस्गस्टिंग... एक्स्ट्रीमली डिस्गस्टिंग...अगं तू ट्रॅव्हल करते आहेस... जीन्स राहू दे... निदान ड्रेस घालायचा... माय गॉड... आय कान्ट स्टँड धिस माइंडसेट... आणि तुझा नवराही एवढा ऑर्थोडॉक्स?''

''साधा आहे गं तो... पण प्रेम करतो तो माझ्यावर.''

''लव्ह मॅरेज?''

''नाही... अॅरेंज्ड... लव्ह आफ्टर मॅरेज म्हण हवं तर.'' गौरी खुद्कन् हसली.

''लव्ह आफ्टर मॅरेज असं तुला वाटतंय... पण समज... काय नाव तुझं?... गौरी... समज... तू नाही ऐकलंस सासूचं, नवऱ्याचं... आणि ट्रॅवेलिंगमध्ये बरं पडतं म्हणून ड्रेस किंवा जीन्स घातलीस... तर तुझ्या नवऱ्याचं प्रेम कमी होईल?''

''हो... थोडंतरी कमी होईल '
''किती?... शंभर ग्रॅम... दोनशे ग्रॅम?''
''ए... काय गं मस्करी करतेस?''
''नोनो... आय एम सीरीयस... तू त्यांना कन्विन्स कर ना.''
''मला नाही बाई जमणार... त्यापेक्षा साडी नेसणं सोप्पं.''
''शिकलीएस किती?''
''बीए.''
''नवरा?''
''बी.कॉम.''
''तू जॉब करतेस?''
''पीजीमध्ये राहतो आम्ही.''
''पीजी?''
''पेइंग गेस्ट्स... तिघी मुली.''
''मग आईवडील?''
''ते नागपुरला असतात.. मी जरनॅलिझम केलंय.. डॅड बिझनेसमन... मॉम डॉक्टर.''
''जेवणाचं काय करतेस?''
''काहीतरी रेडी टु इट... पराठे, आलु-टिकली किंवा मॅगी... मग कधीकधी आलुरॅप.. कधी फ्रँकी पोटात ढकलायचं गं काहीतरी... मला काहीही चालतं.''



''नाही... हाउसवाइफ.''
''नवरा कुठे आहे जॉबला?''
''गव्हर्नमेंटमध्ये.''
सान्वीनं आपले खांदे उडवले आणि ती ई-बुक वाचत बसली. ही पोरगी आल्यापासून गौरीचं आजूबाजूला लक्षही गेलं नव्हतं. आणखी बरीच माणसं वाढली होती. सगळे त्या दोघींकडेच पहात होते असाच गौरीला भास झाला. सान्वीनं पुन्हा कंटाळून टॅब बंद केला.
''एवढा कंटाळा येतोय् मग वाचतेस कशाला?'
''जस्ट टु किल टाइम.''
''तू काय... पत्रकार आहेस?''
''हो एका मॅगमध्ये हल्लीच जॉब मिळालाय.''
''घरी कोण कोण असतं?''
''मी, प्रियंका आणि जॅकलिन.''
''कोण?''
''लग्न कधी करणार आहेस?''
''लग्न? नॉट थॉट ऑफ इट..... नको गं बाई... उगाच साडी नेसावी लागेल... मंगळसूत्र घालावं लागेल '
''गप्प बस.'' एखाद्या जुन्या मैत्रिणीसारखे गौरीनं तिला गुद्दे मारले. दोघीही खळखळून हसल्या. एवढ्या की आख्ख्या रिटायरिंग रुमनं एक कंबाइन्ड लुक दिला आणि रुम पुन्हा गुडघ्यात वळली.
पाऊस जरा कमी झाला होता. तासाभरात गाडी येणार होती.
अचानक गौरीनं विचारलं, ''प्रेम केलंस कोणावर?''
''काय असतं ते?''
''प्रेम म्हणजे प्रेम... उगाच नाटकं करू नकोस.''
''तसे दोन ब्रेक-अप्स झालेत माझे.''
''बापरे... दोन?''
''हा... काय करणार?... एकाला मी सोडलं... एकानं मला सोडलं..... नाही पटलं कोणाशीच... जाऊ दे याऽऽर, मी काय देवदासी होणार नाही.''

''देवदासी ?''

''अगं देवदास माहीत नाही?... पारु नाही मिळाली म्हणून दारु प्यायला लागला तो?... शाहरूखानचा देवदास नाही बघितलास? मी देवदासचं फेमिनाइन केलं... देवदासी.''

''मग तू काय करणार? ''

''सध्या मी एका साहिल नावाच्या मुलाबरोबर रिलेशनशिप-मध्ये आहे... लेट्स सी. . ''

ती अचानक उठली आणि समोर धावली... समोर बसलेल्या एका माणसाला फीट आली होती... इतरही धावले... हिनं धावत जाऊन त्याचं डोकं मांडीवर घेतलं... स्वत:च्या स्टोलनं वारा घालू लागली... लोकांना हवा सोडायला सांगू लागली... एकच धावपळ झाली... कोणीतरी पाणी आणलं. कोणीतरी चप्पल हुंगायला दिली. दोन-तीन मिनिटातच तो माणूस नॉर्मल झाला.

''आसं न्हेमीच होतं बगा ह्यानला. आता बरं वाटंल.''

त्या माणसाला पुन्हा स्थिरस्थावर बसवून ती पुन्हा जागेवर येऊन बसली. जणू काही झालंच नव्हतं.

गौरीला तिच्या धैर्याचं कौतुक वाटलं.

''कमाल केलीस तू.''

''मी अशीच आहे ... इम्पल्सिव्ह.''

पुन्हा ती ई-बुकमध्ये गढून गेली.

चार तास होत आले होते. गौरीला लांबून आपला चुलतभाऊ येताना दिसला. गौरीचा फोन गेला नाही म्हणून एवढ्या मध्यरात्री बाबांनी त्याला पाठवला होता.

पाठोपाठ गाडीसुद्धा आली. चुलतभावानं नीट गाडीत तिला तिच्या बर्थवर बसवून दिली आणि तो गेला. सान्वीचा बर्थ तिच्या जवळच होता. तिनं गौरीला गुड नाइट केलं आणि सराइतपणे वरच्या बर्थवर चढून ती झोपली सुद्धा.

मग गौरीसुद्धा झोपली.

सकाळी दहा वाजता गाडी ठाण्याला पोहोचली. सान्वीसुद्धा ठाण्यालाच उतरली. तिचा तो साहिल आला होता. गौरीनं पाहिलं. कुरळ्या केसांचा... उंच... जीन्स आणि चेकचा शर्ट घातलेला तो मुलगा होता. सिनेमानटासारखा दिसत होता.

त्यानं सान्वीला जवळजवळ मिठीच मारली. ओह्... यू आ लुकिंग ऑसम... तो ओरडलाच थोडासा...

सान्वीनं त्याच्याशी गौरीची ओळख करून दिली... ते दोघं रमतगमत गेलेसुद्धा.

एवढ्यात महेशही आला.

''छान दिसतेएस... या साडीत तर ग्रेटच.'' तिच्या हातातली बॅग घेत तो म्हणाला. गौरी महेशबरोबर निघाली. तिनं दूरवर नजर टाकली.

अजूनही सान्वी आणि साहिल दिसत होते,

गौरीला ते दोघं कन्याकुमारीला हनिमूनला गेले होते तिथलं दृश्य आठवलं.

दोन समुद्र... दोन रंगाचे... एकमेकात मिसळले तरी आपापला रंग टिकवून होते.

ती आणि सान्वी.

दोन समुद्र.

**- रवींद्र भगवते**
भ्रमणध्वनी : ९८३३१५७७७१
ravindrabhagwate9@gmail.com

ग्रंथाली

# उजळले स्मृतींचे दिवे




**मुक्ता केणेकर**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

सावित्रीबाई फुले, आनंदीबाई जोशी, ताराबाई मोडक, कमलाबाई होस्पेट, अनुताई वाघ... अशा १५ स्त्रियांच्या कर्तृत्वाचा आलेख त्यांच्या शब्दांत मांडण्याचा एक प्रसन्न उपक्रम म्हणजे हे नितांत सुंदर पुस्तक.

# गाऊ जंगलगाणी

**लीला शिंदे**




**मूल्य ६० रुपये**
**सवलतीत ३५ रुपये**

पर्यावरणातील मानवेतर घटकांचं हा स्वार्थी माणूस केव्हा विचार करणार या संबंधीचं 'गाऊ जंगलगाणी' या कुमारगटासाठी लिहिलेल्या नाटुकलीतून केलं आहे. 'जंगल कसं मंगल होतं' हे पंचतंत्रातल्या खुमासदार गोष्टींच्या माध्यमातून सांगितलं आहे.

का
व्य
रं
ग

**शिक्षण नि त्याच्याशी जोडलं गेलेलं भावविश्व हा मराठी कवितेतला तसा दुर्मिळ विषय. नुकताच प्रशांत असनारे यांचा ‘वन्स मोर’ हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यांच्या या दोन कविता निसर्ग नि माणूस यांना नव्याने भिडणाऱ्या....**

# दप्तरातल्या कविता




गुरुजी,
तुम्हाला आठवतं,
शाळेत कविता शिकवताना
तुम्ही आम्हाला नेहमी म्हणायचा
‘‘मुलांनो, पक्ष्यांच्या कविता वाचताना
तुम्ही आधी पक्षी व्हा!
झाडांच्या कविता वाचताना
तुम्ही आधी झाड व्हा!
किंवा पावसाच्या कविता वाचताना
तुम्ही आधी पाऊस व्हा...
म्हणजे तुम्हाला कळेल
संपूर्ण पक्षी, झाड आणि पाऊस!’’

गुरुजी,
आजकाल मीही थोडंफार लिहितोय
आणि लिहितोय कविता
पक्ष्यांवर...झाडांवर...पावसावर!

गुरुजी,
तुम्ही सध्या कुठे आहात
मला ठाऊक नाही,
पण खरंच सांगतो :
माणसांवर कविता लिहिण्याचं धाडस मी अजूनही
केलेलं नाही!

मुलं पटापट काढतात :
सूर्य,
चंद्र,
फुलं,
झाडं,
पक्षी,
आकाश,
नदी,
पाणी
अन् बरंच काही.

मुलं चित्र काढताना
मास्तर उत्सुकतेनं बघतात
त्यांनी काढलेल्या चित्रांकडे
अन् हताशपणे जाऊन बसतात
त्यांच्या खुर्चीवर!

लहान लहान मुलांनी
निसर्गातून
माणसाला पार हद्दपार केल्याचं दु:ख
त्याच्या चेहऱ्यावर उतरत असतं
अगदी स्पष्टपणे!

**(संदर्भ : ‘वन्स मोर’, काव्याग्रह प्रकाशन)**

पावसाच्या वेगवेगळ्या भाववृत्तींचे दर्शन घडवणारा आणि निसर्गाची नानाविध स्पंदने टिपणारा काव्यमय लेख!

# नक्षत्रांकित पाऊस

**डॉ. अनुजा जोशी**

अकबर-बिरबलाची ही गोष्ट माहितेय ना?

अकबर बादशाह दरबारात एक प्रश्न विचारतो. २७ वजा ९ = किती? सगळे सरळ उत्तर देतात. २७ वजा ९ = १८ ,पण बिरबल मात्र नेहमीप्रमाणे खूप विचारपूर्वक उत्तर देतो २७ - ९= ०

सगळे विचारतात असं कसं? उत्तर 'शून्य' कसं येईल?तर बिरबल सांगतो, एकूण नक्षत्र २७, त्यातून पावसाची ९ नक्षत्रं वजा केली तर बाकी उरते 'शून्य!'

केवढा सार्थ अन् समर्पक विचार आहे हा!निसर्गाच्या चक्रातून पाऊस वजा केला तर बाकी शून्य. पावसाशिवाय सगळंच व्यर्थ!

जीवघेण्या उकाड्याने संत्रस्त झालेला प्रत्येक जीव जेव्हा पावसाची वाट बघत असतो तेव्हा बिरबलाच्या या समर्पक उत्तराचं महत्व पटून जातं.

''प्रकर्षेण वर्षति इति प्रावृषः।'' म्हणजे प्रकर्षाने वर्षणारा तो 'प्रावृष्'. प्रावृष् शब्द ओला होत-होत त्याचं भिजून गोळ्यासारखं झालेलं रुप म्हणजे 'पाऊस'असं म्हणूया हवं तर! सर्वार्थाने विलोभनीय. हा पाऊस घेऊन येणारी ९ नक्षत्रे क्षितिजावर आपलं निळं पाऊल ठेवतात. काळ्याभोर ढगांनी पावसाची 'सुलूस' लागते- पावसाच्या सालस पावलांची चाहूल लागते.

नऊ ओली-ओली नक्षत्रपावलं आभाळाच्या मनात फेर धरू लागतात. १) मृग २) आर्द्रा ३) पुनर्वसू ४) पुष्य ५) आश्लेषा ६) मघा ७) पूर्वा ८) उत्तरा ९) हस्त ही पावसाची नऊ नक्षत्रे. प्रत्येक नक्षत्राचे १५ दिवस. असा नऊ नक्षत्रांचा मिळून चार साडेचार महिन्यांचा वर्षाऋतू. अवघं आयुष्य हिरवंगार करुन सोडणारा.

शब्द, सूर, लय, ताल मिळून जशी मैफल रंगते तशी या नऊ नक्षत्रांनी पावसाची 'हिरवी मैफल' सजून जाते. चराचराला जीवन देते. नऊ नक्षत्रांकित पाऊस जीवनाचा आधार बनून राहतो.

एकेक नक्षत्र ही पावसाची वेगवेगळी भाववृत्ती आहे. सरसरणारा, झरझरणारा, कोसळणारा, हसणारा, छळवादी, समंजस अशा वेगवेगळ्या मूडची ही नक्षत्रं. त्यानुसार त्यांची नावं पडलीयत. नक्षत्रांचे रागरंग नि विभ्रम बघितले तर नेणत्या वयापासून जाणत्या वयाकडे जाणारं आपलं आयुष्यच आपल्याला पावसाच्या रुपात दिसतं. लोकमानसाने ते पाहिलं, समजून घेतलं व अवघा पाऊसच तनामनात रुजवून घेतला आहे.

१) मृगनक्षत्र - मृग येतो. रणरण तापलेल्या भुईवर मिरगाचा शिडकावा होतो.हरणाच्या पाडसासारखा सैरावैरा धावत हा बाळपाऊस येतो म्हणून त्याचं नाव 'मृग'. जणू मृगाच्या पावलांनी गोजिरे थेंब घेऊन येतो म्हणून तो 'मृग'. त्याला आपल्या बेंबीतल्या कस्तुरीची इतक्यात जाणीवही झालेली नसते, पण तिचा वास आपल्याला येतो.ओल्या मातीच्या वासाची ही कस्तुरी आपलं जन्मांतरीचं तृषार्त निववून टाकते. मखमाली मृगकिड्यांचे केशरी तांबडे मणी, माती आपल्या केसात माळून घेते. टुकुटुकू आभाळ बघणाऱ्या इवल्या कोंबांचे साज माती आपल्या अंगावर चढवते.

हा नांगरणी-पेरणीचा हंगाम. ओल्या रानात दडून, पानांच्या आडून पावशा पक्षी जिवाच्या आकांताने 'पेरते व्हा, पेरते व्हा' सांगत असतो. 'पावशा गो, पावशा गो' अशी आर्त हाक पाऊस मागत आसमंतात भिरभिरत राहते.

आमच्याकडे गोव्यात उन्हाळभर काजूचा सीझन जोरात असतो. रोज सकाळ संध्याकाळी झाडाखाली पडलेली काजूची बोंडं गोळा केली जातात. पिवळ्या तांबड्या बोंडांचा रस काढून फेणीसाठी भट्टीला पाठवलो जातो. काजुबिया वेगळ्या करून त्यांची काजूच्या कारखान्यात विक्री केली जाते. सीझन संपला की हे काम थंडावतं. शेवटी शेवटी पडलेल्या काजुबिया झाडांखाली पाला पाचोळ्यात तशाच पडून राहतात.पहिला दणदणीत पाऊस लागला की पाचोळ्यातल्या काजुबिया तडकतात, रुजतात. हिरवे ओले काजूगर बाहेर डोकावू लागतात. ही हिरवी उत्सुकशी 'कोंगलं' गोळा करुन त्याची खमंग भाजी हा आमचा मृगाच्या पावसाला पहिला नैवेद्य असतो! जळीमळी रुजून आलेल्या कोवळ्या लुकलुकीत टाकळ्याची भाजीही संगतीला असते.

अळू फोफावतं. तेरडा रुजतो. 'हंसाचे पाय' गडग्यावर उमटतात. लाजाळू शहारते. माड पोफळी नि केळी कुळागरात आबादी आबाद होतात. माडती (ऐन)- किंजळींच्या रापलेल्या त्वचा भिजून चिपचिपीत होतात. पळस पिंपळ साग सातविणी पोपटपानात झुलू लागतात. बेनुर्ली (बांडगूळं- ऑर्चिड्स) फुलते. तिच्या निळ्या जांभळ्या फुलांच्या 'द्रौपदीच्या वेण्या' रस्त्यावर रंगीत कमानी धरतात. 'सीतेचे केस' (शतावरीची बारीक काटेरी वेल) रानात न् काजूच्या बागेत तरारतात. वाटेत शतावरी उगवलेली दिसली तर तिचा तुरा माळल्याशिवाय गावातली मालन पुढे जात नाही! स्त्रीरोगांवर गुणकारी असलेल्या शतावरीची मुळं लोकमानसात अशी घट्ट रुजून राहिली आहेत.

ग्रीष्माच्या उन्हात सुकलेले कुणगे मिरगाच्या धारांत गच्च भिजून घेतात. त्यांच्यात दगडी पावलं लगबगीने वावरु लागतात. मातीचा जीव नांगरुन हलका होतो. बी कुशीत लपतं. रुजतं. टुकूटुकू

आभाळ बघू लागतं. लाल कुणग्यांना हिरवी हिरवी लव फुटते आणि वाऱ्याची लहर त्यावर लोळत सुटते! पाखरं ओलीचिंब भिरभिरत राहतात. व्हाळातून, पलतडीतून एकसारखा मोराचा टाहो.. न् त्यामुळेच की काय मृगाचं नक्षत्र निळं निळंभोर होऊन जातं!



नाना परीचे साज, नानापरीची लेणी लेऊन 'मिरग' मोठ्या डौलात येतो.या कंचहिरव्या नक्षत्रात काहीही पेरलं तरी उगवतं.आपण बी पेरावं, कोंब येतात. शब्द पेरावे, गाणी येतात. आपण जीव पेरुन मोकळं व्हावं, जिवाला रुजवा फुटतो!

२) आर्द्रा नक्षत्र- मृग पावलांनी थिरकणा-या मृगनक्षत्राचे १५-२० दिवस उलटल्यावर पाऊस थोडा जोर धरतो. संततधारेकडे बघून पडवीत बसलेला दमेकरी जाणता धास्तावून ''आता आर्द्रा लागल्या रेऽऽ'' असं म्हणतो. आर्द्रा लागल्या की सगळीकडे थपथपीत आर्द्रता येते. ओल-ओल आणि चिकचिक नुसती. हिरव्यागार भुईवर पाऊस आपलं ओलं-ओलं बस्तान बसवतो. बाकीबाब बोरकरांनी 'झाले हवेचेच दही' हे आर्द्रेच्या पावसाकडे बघूनच म्हटलेलं असेल की काय? असं मला नेहमीच वाटतं.

झाले हवेचेच दही, माती लोण्याहून मऊ
पाणी होऊनिया दूध लागे चहुकडे धावू

आज जगाचे गोकुळ, आज यमुना पांढरी
आणि कालियाच्या उरी घुमे कृष्णाची बासरी

लक्ष आचळांनी दुधे निळी आकाशाची गाय
भिजणाऱ्या तृप्तीवरी दाटे संतोषाची साय...

हवेचं थंडगार दही करणारं हे आर्द्रा नक्षत्र!आकाशाची निळी गाय या नक्षत्रात लक्ष आचळांनी दुभत असते.तृप्तीवर संतोषाची दाट साय जमत असते.

बाहेर दणकून पाऊस आणि घरात गरम मऊ गोधड्यांनी दुपार ऊबदार होते. गरमागरम भजी,भाजलेले पापड,फणसाच्या बिया, ओठांना मसाला झोंबत खाल्लेली कणसं, कोवळ्या लुसलुशीत काकड्या व फेसाळत्या चहाच्या घोटाने भिजल्या तिन्हीसांजा खुसखुशीत होऊन जातात. रात्री धुंवाधार पाऊस,लाईट गुल्ल, वादळवाऱ्याचं थैमान, मग मिटीमिटी होऊन अंधारात गुडुप्प व्हायचं! तशातच आजाराच्या साथी येतात. पांघरुणात तापाची हुडहुडी भरते. पोटात काळोखासारखा खड्डा पडतो. मग गरमागरम पेजेबरोबर तोंडाला घेतलेला नारळाचा तुकडा आणि खारातली आंबाडी मात्र आयुष्याला पुन्हा जिवंतपणाची चव आणते.

आर्द्रा नक्षत्र म्हणजे पावसाचे नि मातीचे नव्या नवतीचे दिवस. मधेच पाऊस शीळ घालतो, मधेच मातीची हिरवी काकणं बांधावर किणकिणतात. तो पुन्हा-पुन्हा भरून येतो. ती पुन्हा-पुन्हा आसुसते..! कोंबांना कोंबऱ्या फुटतात. पानांचे पिसारे होतात. फांद्यांना चवर येतात. आर्द्रेचं निळं पाणी पिऊन जीव तरारु लागतो...

३) पुनर्वसू नक्षत्र- रुजलेल्या कोंबांचं पुनर्वसन ज्या नक्षत्रात करायचं ते 'पुनर्वसू' नक्षत्र! आर्द्रेचा दमदमीत पाऊस पिऊन आता कुणगे चिखलाने गच्च, लावणीला सज्ज होतात. भाताचा तरवा काढला जातो. या नक्षत्राला 'तरणं नक्षत्र' आणि यातल्या पावसाला 'तरणा पाऊस' असंही म्हटलं जातं. तरव्याच्या हिरव्या मोटल्या इरली, कांबळ डोक्यावर घेऊन ढोपरभर चिखलात रिघतात. चार-चार काड्या अंतरा अंतराने चिखलात टेकवल्या जातात.कुणग्याच्या भाळावर हिरव्या ओळी लिहिल्या जातात.आता त्या ओळींवर 'पुनर्वसनाचा घसाघसा पाऊस'. तुडुंब पाऊस. तळं मळं एक होऊन जातं. लावणी केलेले कुणगे पाण्याखाली बुडतात. हे शेत आता इतक्या पाण्यात कसं तग धरणार अशी आपल्यासारख्याला भिती वाटते. पण भात ते! चिकट चिवट जिवट! आणि पाण्याच्या तडाख्यातूनही तरुन जातो तो 'तरवा! पाणी जरा ओसरल्यावर गच्च चिखलातून लावणी केलेला तरवा डोकं वर काढतो.अंग झडझडावतो..जीव धरतो. मातीचं नशीब होऊन उभा राहतो. कुणगे गच्च हिरवे दिसू लागतात.

अजून एक गंमतीचा विषय - नक्षत्रांच्या वाहनांचा! आपल्या शेतीप्रधान देशात जीवनदात्या मान्सूनची गणितं व पावसापाण्याचे अचूक ठोकताळे मातीत राबणाऱ्या हातांनी शोधून काढले आहेत. पावसाचं कमी-अधिक प्रमाण समजून घेण्यासाठी नऊ नक्षत्रांची वेगवेगळ्या प्राण्या-पक्ष्यांची 'वाहनं' आपल्या जाणत्यांनी ठरवली आहेत.आपला पर्जन्यराजा प्रत्येक नक्षत्रात हत्ती, घोडा, उंदीर, कोल्हा, मोर, गाढव अशा वेगवेगळ्या वाहनांवर बसून आपल्या भेटीला येतो अशी ही सुंदर 'वाहन' संकल्पना आहे. नेहमीच्या कॅलेंडरमध्ये जूनपासूनच्या चार महिन्यांत वाहन घोडा, वाहन बेडूक, वाहन मोर असं लिहिलेलं असतं नं, तीच ही गंमत! ..पण अर्थात ही काही नुसती गंमत नव्हे. हे शास्त्रशुद्ध ठोकताळे आहेत. अनुभवान्ती सिद्ध झालेले प्रयोग आहेत असं लक्षात येतं.

त्या त्या नक्षत्राचं वाहन कोणतं आहे त्यावर पावसाचं प्रमाण किती असेल हे ठरवलं जाई व त्यानुसार शेतकऱ्याला शेतीच्या कामांची आखणी करता येत असे. उदा. मृगनक्षत्राचं वाहन 'कोल्हा' असेल तर मिरगाचा पाऊस थोडा कमी पडणार असा अंदाज बांधला जाई. कोल्ह्याला पाऊस पाणी फारसं नको असतं. त्याचं लग्नच मुळात 'ऊन-पाऊस कोल्ह्याचं लगीन' अशा सरसर मंगलाष्टकांमधे लागतं नाही का? म्हणून वाहन कोल्हा असेल तर पाऊस कमी

असं नक्षीतलं अनुमान शेतकऱ्याला काढता येत असे बहुधा. नक्षत्र कोरडं असेल तर लावणी एखादा आठवडा पुढे ढकलायची असा काहीतरी बदल करणं त्याला शक्य होत असे.

उंदराला जास्त पावसात शेताची मनासारखी नासाडी करता येत नाही म्हणून त्याला पाऊस आवडत नाही, म्हणून वाहन उंदीर असेल तर पाऊस कमी पडणार हे कळतं.

गाढवाला गुळाचीही जिथे चव नाही, तिथे पावसाची काय मजा? त्याला मातीत लाथा झाडायला मिळाल्या की झालं. म्हणून त्यालाही पाऊस फारसा नको. म्हणून गाढवावर बसून येणारा पाऊसही कमी-कमी अकलेचा-गाढव!

घोडा आपल्या वेगाची वादळीवाऱ्याशी स्पर्धा करतो आणि हरतो. त्याला आपल्या वेगाला लगाम घालून पावसापुढे हार पत्करावी लागते म्हणून त्याला पाऊस आवडत नाही. घोड्यावर बसून आला तर पावसाचं प्रमाण कमी.

मोर? आभाळ भरून आलं की याचा लांडोरीसाठी केका सुरु होतो. जणू निळा टाहो ऐकून भरलेलं आभाळ खाली येतं. मोर वाहन असलं की काळजी करायची नाही. ढगांच्या पालख्या मातीवर उतरणारच. पाऊस मोरावर बसून येणार असेल तर पेरणी करुन मोकळं व्हायचं.

बटबटीत डोळ्यांच्या बेडकांना पाऊस चिक्कार हवा.त्यांची लाखोंनी अंडी नि शेपटीवाले 'टेडपोल्स्' बच्चे पाण्यातूनच वाट काढायला शिकलेले. पावसाच्या संततधारेत त्यांचं 'डराव डुरुक' हाका मारणं रंगात येतं.चार महिने भिजून वाढून त्यांना पाऊस संपल्यावर पुन्हा भूमिगत व्हायचं असतं. म्हणून बेडकावर बसून येणारा पाऊस वाजत गाजत येणार. मोठमोठ्या थेंबांच्या दणदणीत धारा घेऊन येणार, हे नक्की.

हत्तीची मजा माहीतच आहे. त्याला मुळी पावसा-पाण्याशिवाय दुसरं काही नकोच. हत्तीवर बसून येणारा पाऊस हा अनभिषिक्त सम्राटच. हत्तीच्या पायाएवढ्या मोठ्या धारा घेऊन तो येणार नि सगळं आबादीआबाद होणार ही काळ्या दगडावरची- नव्हे हत्तीच्या काळ्या पाठीवरची रेघ!

अशाप्रकारे घोडा, गाढव, उंदीर, कोल्ह्यावर बसून येणाऱ्या नक्षत्रात पाऊस कमी पडतो. आणि ज्या प्राण्या-पक्ष्यांना पाऊस मनापासून प्रिय आहे त्या हत्ती, बेडूक, मोर यांवर बसून आलेल्या नक्षत्रांत जोरदार पाऊस पडतो. इथे साहजिकच वेधशाळेचे बरेचदा चुकणारे अंदाज आठवतात न् या ठोकताळ्यांचं आणखी आश्चर्य वाटतं.

निसर्गाचाच एक भाग बनून राहिलेल्या, मातीत राबणाऱ्या निसर्गपुत्रांनी पिकांच्या राखणीसाठी लहरी मान्सूनची गणितं जगण्याशी अशी पूर्वापार छान जुळवून घेतली आहेत. उभंच्या उभं ऊन, कडाक्याची थंडी व अवघा पाऊस या सृजनपुत्रांनी आपल्या 'हिरव्या हातांनी' झेलला आहे आणि प्रसंगी परतवूनही लावला आहे.. पाऊस असा तनामनात मुरुन राहिला आहे.

४) पुष्य नक्षत्र- पुष्य हे पोषणाचं नक्षत्र. लावणीनंतर पीक पोसू लागतं.वाढत वाढत पोटरीला येतं. लोंब्या लगडतात. पुष्यनक्षत्र लागलं की पाऊस 'म्हातारा' होतो असंही म्हणतात. पाऊस असा परिपक्व होऊन बरसू लागला की कणसातल्या दुधाचा दाणा बनू लागतो. ऊन-पावसाचा खेळ करणारं हे नक्षत्र श्रावणातला कोवळा ऊन पाऊस लेवून चमचम पिवळं बरसतं. सणवार व्रतवैकल्ये आणि गोड वरणापुरणाचा घास देणारं हे उत्साहाचं नक्षत्र. भरणपोषणाच्या सरीवर सरी देणारा पुष्य नक्षत्राचा हा शहाणासुरता पाऊस. असा पाऊस आता मातीच्या मनात काठोकाठ भरून उरतो.

५) आश्लेषा नक्षत्र- आश्लेषांचा पाऊस हसत हसत घसघसत येतो. खरोखरच लक्ष देऊन ऐकलंत तर कळेल, 'खस् खस् घस् घस् हस् हस् हस्स् हस्स्...' असा आवाज करत एखादी सर येते, पाण्याचा पंखा फिरून जावा तशी बरसून झर्रकन् निघूनही जाते. म्हणून हसणाऱ्या खिदळणाऱ्या या पावसाच्या नक्षत्राचं घरातलं नाव खरं तर 'हसळसा' किंवा 'आसळसा' पण कागदोपत्री किंवा पटावर जरा दुरुस्त करून त्याच्या मास्तरांनी त्याचं 'आश्लेषा' केलं असावं, असं आपलं मला वाटतं हो! आजोबांची आठवण येते मला 'हसळसा' म्हटल्यावर. ते म्हणायचे, ''हसळसा लागल्या रेऽऽ, हा बघ हसत हसत पडून गेला पाऊस. आता खुशाल जा बाबीऽऽ शाळेत. या पावसाला छत्री बित्री न्यायला नको. एक शिंग भिजलं, दुसरं नाय भिजलं इतपतच या पावसाचं शहाणपण..!'' मग मी खरोखरच शाळेतून घरी यायची तेव्हा माझी एक वेणी भिजलेली नि एक सुकी राहिलीय की काय ते रिबिनीच्या फुलाला हात लावून-लावून बघत राहायची. आजोबा हसायचे. खांद्यावरचा पंचा डोक्यावर घालायचे. पावसाची सर घसघसून पडून गेली की पंचा झटकून आजोबा झोपाळ्यावरुन उठायचे. कोयता घेऊन अंगणात लावलेल्या पडवळ-दोडक्याच्या- काकडीच्या वेलांना काटेरी शिरं, हिरवे खूट नि टेकू द्यायला मेढी बिढी शोधू लागायचे. एव्हाना वेल चांगले गरगरलेले असत. वेलाच्या टोकांकडून, पानांच्या बेचक्यातून हिरव्या स्प्रिंगा वेटाळू लागलेल्या असत. पिवळी पांढरी फुलं, खरखरीत मोठ्ठी पसाभर पानं अशा तरतरीत झालेल्या वेली हसळसांचा पाऊस नि हसरं ऊन मनसोक्त पिऊन घेत. एक हसरी वावझड येऊन गेली की कितीतरी फुलं-पानांवर नुसतीच गळून पडलेली दिसत. जीव कावराबावरा होई, पण एकसारखं खळ्यातल्या वेलांशी जाऊन बघत राहिलं तर घरातून ओरडा पडे. वेलात अगदी आत शोधलं की एखाद्या फुलाखालच्या देठात गाभ धरलेली दिसे. मग दुसरा जाड झालेला देठ.. मग तिसरा.. वेल चिक्कार लागलेला असे. मग हायसं वाटे. अगदी खुदकन् हसायला येई. हळूहळू नखाएवढे काकडीचे मुरटे, पडवळाच्या बारीक-बारीक वाती पडलेल्या नि आकार घेताना दिसू लागत. फळं बोट-बोटभर मोठी दिसू लागेपर्यंत चैन पडत नसे, पण त्यांच्याकडे सुरक्षित राहण्याची युक्ती असे. मोठमोठ्या पानाआड लपून राहिलं की हसळसांचा हसरा तडाखा त्यांना आरामात चुकवता येई. भिंतीजवळ कडेने लावलेल्या गुलबक्षी, परसातल्या गुलाब अबोली जास्वंदीच्या फांद्या, चिकू पेरुचं नवीन लावलेलं कलम, नवी रुजलेली नि हातभर मोठी झालेली पपई, कुंपणातले फुफाट्याचे वेल सगळे कसे आश्लेषांचा सरसर

झरझर पाऊस झेलत छान डुलत असत.

६) मघा नक्षत्र– 'धारा–धारा, वारा–वारा' खेळून झालं की आता पाऊस थोडा सिरीयसली अभ्यासाला लागतो. जरा म्हणजे बराच सिरीयसली. मघा हे जोरदार पावसाचं नक्षत्र. मघा लागल्या की उभ्या–आडव्या–तिरप्या वाट्टेल तशा धारांची संततधार सुरु होते. ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट, सैतानी वादळवारा, भयाचं थैमान, महापूर, नासाडी प्रलय असा सगळा छळवाद म्हणजे मघांचा पाऊस. छळवादी सासूचा सासुरवासच जणू! खरोखरच कोकणात या पावसाला 'सासवांचा पाऊस' म्हणतात. अजून एक मजा सांगायचीय. मघा लागल्या की ती आठवतेच. 'मघा–मघा आणि चुलीकडे हगा' अशी कोकणात एक मजेशीर इरसाल म्हण आहे.मघांचा पाऊस इतका जोरदार व एकसारखा लागतो की पूर्वी प्रातर्विधीला बाहेर परड्या–परसवात जात तेवढेही तो जाऊ देत नसे. अशा सगळ्या गंमतीजंमती!

खरोखरच मुसळ्याएवढ्या धारा घेऊन आलेला मघांचा पाऊस आपलं रौद्र व कडक शिस्तीचं रुपही दाखवून जातो. आतापर्यंत हिरवा निळा झालेला आसमंत अंतर्बाह्य ढवळून निघतो. पाऊस तांबडालाल खळाळत धावू लागतो. रागलोभ, सुखदुःख, आशा–निराशा, हसू आणि आसू या सगळ्यांच्या एकजीव तांबड्या फेसाळत्या मिश्रणाने झाडपेडातली तळ्यामळ्यातली व तनामनातली सगळी खळ– मळ धुवून निघते. खेड्यापासून शहरापर्यंत गरिबापासून श्रीमंतापर्यंत, पारापासून चौकापर्यंत सारेजण पावसाच्या एका समांतर रेषेत भिजून निघतात.

७) पूर्वा नक्षत्र– हे खरं तर पूर्वा नसून 'पुरवा' असं असावं. पुरावलेला– पूर्णावलेला–पूर्ण होत आलेल्या पावसाचं हे नक्षत्र. जोरदार मघा पडून गेल्यावर पुरवा नक्षत्रात पाऊस थोडा स्थिर होतो. शांतपणे पडू लागतो. मघा नक्षत्राला छळकुट्या सासवांचा पाऊस म्हटल्यानंतर पूर्वा नक्षत्राच्या पावसाला समंजस सोशिक 'सुनांचा पाऊस' म्हटलं जातं. टपोऱ्या थेंबांचा पूर्वांचा पाऊस फार देखणा दिसतो. समाधानाचा पुरवठा करणारं हे नक्षत्र. शेतात धान्य तयार होण्याआधीचे हे दिवस असतात. परिपक्व पावसाला भरल्या दाण्यांची काळजी घ्यायचं भानही आपोआप एव्हाना आलेलं असतं. सगळे रागरंग ढंग साजश्रृंगार टक्केटोणपे नि चढउतार बघत–बघत आलेला पूर्वांचा पाऊस गरजेनुसार कमी अधिक धारांचा वर्षाव करीत राहतो. त्याला आता बरसण्याची म्हणजे जगण्याची एक लय सापडलेली असते. निर्मोही एकतानतेने तो उर्वरित वाटेवर गात–गात पावलं टाकीत असतो. समजुतीने बरसत राहतो.

८) उत्तरा नक्षत्र– उत्तरा नक्षत्रातला पाऊस आता हळूहळू उत्तरमार्गी होतो. उतरणीला लागतो! याला रब्बीचा पाऊस असंही म्हटलं जातं. कोवळा, तरणा, म्हातारा आणि आता आयुष्याच्या उतरणीला लागलेला पाऊस! जन्ममृत्यूची चक्रं, अनेक जीवनसाखळ्या पावसामुळेच जोडल्या जातात. सगळी आयुष्ये त्याच्याभोवतीच फिरत असतात. प्रश्नांच्या मुळाशी पाऊस, प्रश्नांचं उत्तर म्हणजे पाऊस, साऱ्या प्रश्नोत्तरांचा हिशेब म्हणजे पाऊस, हिशेबाची बाकी म्हणजे पाऊस! एव्हाना जलाशयं, नद्या, विहिरी तुडुंब भरलेल्या असतात. पाणी स्वच्छ स्वच्छ निळंभोर दिसत असतं. कृतार्थ आभाळ त्यात आपलं प्रतिबिंब बघत असतं. प्रत्येकाला उरलं पुरलं हवं नको बघत सामर्थ्यशाली व संतृप्तीचा पाऊस देणारं असं हे उत्तरा नक्षत्र. इथल्या जिवाजिवाच्या जीवनाचं उत्तरदायित्व ज्याच्या खांद्यावर आहे असा हा सर्व प्रश्नांच्या 'उत्तरांचा' जबाबदार पाऊस जाता–जाता एक महत्त्वाची कामगिरी बजावतो. मातीच्या पदरात सोन्याचं दान टाकतो! शेतं रुप बदलत पिवळी होत असतात. भरल्या कणसांनी त्यांचे खांदे जड होऊ लागलेले असतात. उताराला लागता–लागता उत्तरा नक्षत्रातला पाऊस शेतात मोत्याचा घास तयार करून जातो.

९) हस्त नक्षत्र– शेवटी निरोपाचा हात हलवत हस्त नक्षत्र येतं. पाऊसच तो! जाता–जाता दंगा करुन जातो. 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे' हा कवीचा बाणा पाऊस जपतो की काय कोण जाणे, हत्तीएवढे मोठमोठाले काळे ढग आकाशात पुन्हा जमू लागतात. आणि हत्तीच्या पायांसारख्या धबाधबा धारांनी वळीव कोसळू लागतो. दिव्याची ज्योती मालवता–मालवता क्षणभर मोठी होते, तसंच या नवव्या–शेवटच्या नक्षत्रात पाऊस जाता जाता थयथयाट करुन जातो. विचित्र वागतो.

नको नको रे पावसा, असा येऊस अवेळी
घर माझे चंद्रमौळी आणि दारात सायली

असं इंदिरा संतांनी हस्ताच्या पावसाकडे बघूनच लिहिलंय की काय असं मला आपलं सारखं वाटत राहतं. हस्त नक्षत्रात देशावर बायका 'हादगा' किंवा 'भोंडला' खेळतात. अंगणात भलं मोठं हत्तीचं चित्र काढून त्याभोवती हादग्याची गाणी गाणी म्हणत फेर धरतात. पिवळं चकाकतं ऊन घेऊन तोपर्यंत दारात नवरात्र येतं. दसरा आपलं सोन्याचं तोरण बांधू लागतो.

आरती प्रभूंनी 'शून्य शृंगारते आता होत हळदिवे' असं म्हणत सरणाऱ्या पावसाचं केलेलं वर्णन मनात घर करू लागतं.

आता सरी वळीवाच्या ओसरु लागल्या
भरे निळी नवलाई, जळी निवळल्या
गंधगर्भ भुईपोटी ठेवून वाळली
भुईचंपकाची पाने कर्दळीच्या तळी...

गर्द हिरवाईपासून सोनपिक्या पिवळाईपर्यंत पोचणारा पावसाचा हा परिपूर्ण जीवनप्रवास आपल्या आयुष्यरेषेला समांतर जात राहतो. या वाटेवरून पावसाच्या हातात हात घालून चालताना मनाच्या गाढ तळापासून समोरच्या निळ्या क्षितिजापर्यंत सर्वदूर आसमंतात हाच 'नक्षत्रांकित पाऊस' भरून येत राहतो...!

**– अनुजा जोशी**
भ्रमणध्वनी : ७७२१८१०९८६
dr.anupamj@gmail.com

जीवनातल्या संघर्षातून इंदिरा संतांच्या कवितेला रूपबंध प्राप्त झाला. त्यांच्या भास-आभासाच्या कवितांचा हा तरल भावानुभव!

# इंदिरा संत यांच्या भास कविता

## मधुवंती सप्रे

लेखाच्या शीर्षकाने वाचकाला दचकायला होईल. परंतु या लेखासाठी निवडलेल्या सहा-सात कविता या भास कविता आहेत. का? याचा ऊहापोह पुढे येईलच.

'मृण्मयी' या नावाने प्रा. रमेश तेंडुलकर यांनी इंदिरा संतांच्या कवितेची चिकित्सापूर्वक आवृत्ती प्रसिद्ध केली. या पुस्तकाला प्रा. तेंडुलकरांची जवळजवळ ऐंशी छापील पानांची प्रस्तावना आहे.

माधव आचवल यांनी 'जास्वंद' या पुस्तकात इंदिरा संतांच्या कवितेवर उत्कट आणि उत्कृष्ट समीक्षा लिहिली आहे. आचवल तर म्हणत, 'इंदिराबाईंचे भावविश्व म्हणजे जळते चांदणे आहे.'

'सहवास' (दोघा पती-पत्नीचा कवितासंग्रह)पासून 'शेला' ते 'वंशकुसुम' दहा कवितासंग्रह वाचताना मन त्यांच्या अनुभवाचा एकात्म व अर्थवाही परिणामाने झपाटल्यासारखं होतं. विशेषतः 'मृगजळ' आणि 'मेंदी'मधल्या कविता. इंदिराबाईंच्या 'गर्भरेशीम' या काव्यसंग्रहाला १९८४ साली साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. परंतु 'गर्भरेशीम'मधल्या कविता व 'मृगजळ' आणि 'मेंदी'मधल्या कविता यामधे भाववृत्तीचा फरक आहे. 'मृगजळ' आणि 'मेंदी'मधे तीव्रतर असलेले भाववृत्तीचे ताण इथे सामाजिकतेत बदललेले दिसतात. त्यांचं प्रतिमाविश्व निसर्ग रूपात येतं तसं ते सामाजिक जाणिवांमधूनही येताना दिसतं.

इथे फक्त मेंदी आणि मृगजळमधल्या भास कविताच विचारात घ्यायच्या आहेत. 'भास कविता' हा शब्दप्रयोग प्रथम कवी शंकर वैद्य यांनी वापरला. आणि त्या कविता वाचताना तो शब्द अधिकाधिक मनात रूतत गेला. आणि एका क्षणी लक्षात आलं अरे, हे भास इंदिराबाईंना फार पूर्वीपासून जाणवत आहेत. ते राहात्या बिऱ्हाडात आलेले अनुभव होते. त्यांनीच ते अनुभव लिहून ठेवले आहेत. वरच्या मजल्यावर कुणीतरी चालत आहे, कुणी डोकावून पाहत आहे. लहान मुलगा त्या खोलीत जायला घाबरतो आहे इत्यादी. परंतु भास कवितेतले ताण हे प्रियकराचा विरह असह्य झाल्याने आलेले आहेत. आठवणीतल्या क्षणांच्या जाणिवेतला मनाच्या सुप्तपातळीवरचा जागृत अर्धजागृत अनुभव त्या भास कवितेत मांडतात. त्या कविता म्हणजे 'ऐक जरा ना', 'उदाच्या बनात', 'मघाशीच की', 'मृगजळ', 'परकी', 'तू गेल्यावर', आणि 'सुरंगा'.

इंदिरा संतांचा विवाह हा प्रेमविवाह होता. तीन मुलं झाली. संसार बहराला येत असतानाच पतीचा आकस्मिक मृत्यू झाला. आणि त्यांचा सर्वबाजूंनी आधार कोसळून पडला. त्याचा इंदिराबाईंना इतका जबर धक्का बसला की बाह्य गोष्टी कशाबशा त्यांना सावरता आल्या. पण अंतर्मनातला कल्लोळ हा त्यांच्या भावविश्वाचं जळतं चांदणं झालं. त्यांच्यावर झालेल्या पतिनिधनाच्या आघाताने त्यांची कविता विजेसारखी सळसळून बाहेर पडली. स्वतः कवयित्रीनेच लिहिलं आहे, 'माझी कविता माझी सखी नव्हे किंवा माझी प्रतिकृती नव्हे. जीवनातील संघर्षात व्यक्तिमत्त्वाच्या ज्या ठिणग्या उडतात, त्या ठिणग्यांनी घेतलेला आकृतीबंध म्हणजे माझी कविता.'

प्रियकराचा (पतीचा) चिरविरह त्यामुळे प्रत्ययास येणारं एकाकीपण, येणारे ताण संज्ञाप्रवाहाचा दाब आणि त्यातून वर्तमानात भास होत राहिलेल्या आठवणी शब्दरूपात येतात.

'सुरंगा'सारख्या कवितेने ही भासभानाची सुरुवात होते. तीही रंगभानात,

गडद निलिमा चष्म्यावरचा  
शर्टावरची बटणे काळी  
अंगठीतला लाल खडा अन्  
बूटावरची उदी झळाळी  
पेन मुलायम हिरवट राखी  
गडद जांभळे नाजुक पाकिट  
पट्ट्यावरचा राजवर्ख अन्  
गहन रुपेरी घड्याळ चौकट  
रंग रंग हे जमती भिनती  
मीच होतसे इंद्रधनु अन्  
तुझ्या जीवाच्या आकाशावर  
अशी सुरंगा राहते रेलून

कार्यालयात जाणाऱ्या नवऱ्याची रंगसंगती साधणारी वेशभूषा कवितेत इतकी सुंदर यापूर्वी कुणी मांडली नसेल. परंतु ते फक्त वर्णनच आहे का? शेवटच्या चार ओळींमधलं वर्तमान भास आभासाच्या क्षितिजावर उभं आहे.

पतीच्या खांद्यावर रेलून मान ठेवावी किंवा त्याला चिकटून रेलून बसावं हा अनुभव 'त्याच्या जीवाच्या आकाशावर' त्या इंद्रधनुष्य होऊन रेलून राहत आहेत. आज तो स्पर्श प्रत्यक्षात नाही. पण भासमान आहे. इथे विंदांची कविता आठवते,

'अन् प्राक्तनावर रेलते । छाती तुझी ती मानुनी  
सर्वस्व तुजला वाहूनी माझ्या घरी मी पाहुणी.'

विंदाच्या कवितेतली प्रेयसी अशाच भासमान स्थितीत आहे. इथे 'प्राक्तन' तर तिथे इंदिराबाईंच्या कवितेत 'जीवाचं आकाश' आहे. विंदांच्या कवितेतला प्रियकर हयात आहे पण दुरावला आहे, तर इंदिराबाईंचा प्रियकर या जगातच नाही. आहेत ते त्याच्याबरोबर

व्यतीत केलेले असंख्य सुखावह दिवस रात्रीचे क्षण.

‘तू गेल्यावर’ या कवितेत पहिल्या तीन कडव्यांमधे कवयित्री जे जे तू आणि मी अनुभवलं ते सगळं आभाळात उडून गेलं. अगदी ‘रक्तामधली काळी बिजली डोहामधे जाते

‘मिसळून असते जे जे तुझ्याचसाठी ।
तू गेल्यावर जाते उधळून’

इथपर्यंत कविता वास्तवरूपात असते. परंतु शेवटी,

तू गेल्यावर नसते मीही
नसते माझे... माझे काही
उरलेली ही अशी कोण मी
माहीत मजला नाही... नाही

‘नसते मीही, उरलेली ही अशी कोण मी’ याही जाणिवा नष्ट होतात. त्याच्याबरोबरच त्या मिसळून गेल्या. स्वतःलाच कवयित्री ओळखत नाही. त्याच्याबरोबर तिची ओळखही संपली.

तीन मुलं वाढवायची. नोकरी करायची. संसाराचा भार एकटीने खांद्यावर घ्यायचा. वर्तमानात सर्व काही निभावून न्यायचं. पण तरीही त्याचं प्रेम, त्याचा चिरविरह असा उफाळून जेव्हा वर येतो. कवितेत उमटतो तेव्हा ती त्या भासमान जगात गुरफटून जाते.

प्रत्येक कवितेत इंदिराबाई निसर्गातून प्रतिमाविश्व घेतात. निसर्गात ते दूर गेलेलं प्रेम शोधतात. जणू अस्थिरतेत स्थिरता शोधताना दिसतात.

मृगजळमधली ‘ऐक जरा ना’ ही कविता, कवितेच्या अभ्यासकांच्या अंगावर शहारे आणते. त्याला स्तिमित करते. गदागदा हलवते आणि घेरून टाकते.

‘ऐक जरा ना’ पावसाळ्यातली एक रात्र, विजेचा कडकडाट, घनघोर पाऊस, वादळाचं भय अशा रात्रीची तो तिला भेटला ती आठवण वर्तमानात तिला करून देत आहे कोण? तर घराचं दार, आराम खुर्ची, कौलारातून ओठावर ठिबकणारा पावसाच्या पाण्याचा थेंब.

अंधाराने कडे घातले, घराभोवती
जलधारांनी झडप घातली
कौलारावर
एकाकीपण आले पसरत
दिशादिशातून
घेरायास्तवर
एकटीच मी पडते निपचित डोळे मिटूनि

आणि ‘ऐक जरा ना’ ऐक जरा ना म्हणून घरातल्या निर्जीव गोष्टी तिला तो तुला भेटायला आल्याची आठवण करून देतात.

एक असह्य ओझं दाटलेलं
काळी वीज धुमसत होती
निबिड वनातील मध्यरात्रीची वावटळ










झपाटलेली

आणि जेष्ठामधल्या रात्री त्या जलधारांनी, पावसाने त्याला कोंडलं तुझ्यापाशी. तेव्हा खिडकीतून विजा चमकताना दिसत होत्या. तेव्हा तो उठला आणि म्हणाला,

या डोळ्यांची करील चोरी
वीज चोरटी
हेच मला भय
हे ऐकताच वर्तमानात ती आली आणि,
धडपडले मी उठले तेथून, सुटले धावत
त्या वस्तूतून त्या पाण्यातून दिशादिशातून
हात ठेवूनी कानावरती, ऐकू न यावे शब्द कुणाचे
कुणा.. कुणाचे.. कोणते शब्द? ऐक जरा ना...
ऐक जरा ना...
ऐक जरा ना...

या कवितेवर भाष्य करायची आवश्यकता नाही.

इतकी ती विस्तारत जाते. क्षितिजापासून क्षितिजापर्यंत आणि ‘ऐक जरा ना... ऐक जरा ना’ याचे प्रतिध्वनी आपल्याही मनात उमटत राहतात.

या भास कविता वाचताना प्रत्येक वेळी एक जाणीव मनाला व्यापून टाकते. इतकं इतकं एकमेकांना बांधून टाकणारं अफाट प्रेम असू शकतं? पुनःपुन्हा हा विचार सतावतो आणि वाटतं असं असलंच पाहिजे. त्याशिवाय इतकी उत्कट शब्दकळा, इतका उत्कट भाव, इतका उत्कट आशय कसा मांडता येईल?

‘मृगजळ’ या कवितेत त्यांनी प्रकट केलेला भास कवयित्रीलाच सहन होत नाही. तडफडतं मन तिलाच विचारतं, इथे कशी मी... इथे कशी मी, कुठे गेली असते ती?

ती भेटायला जाते त्याला. दारावरची घंटा वाजवते, आतली चाहूल, श्वास ऐकते, दरवाजावर डोळे खिळलेले, दरवाजाच्या बंद फळ्यांचा मोर पिसारा होता. तो कसा? तर थयथयणारा, झगमगणारा, आणि तिचे डोळे दिपतात. पुढे काय घडतं कळत नाही, वाट संपते आणि असंख्य अनोळखी वाटा दिसतात. जिथे.. खूप गर्दी... काय त्यानं भूल घातली भेटायला गेल्यावर? जेव्हा तिला भान येतं,

तेव्हा मन तडफडत असतं
काचेच्या बरणीत उन्हाच्या.
इथे कशी आले? त्याची भेट कुठे घडली?
सगळा भासच का?

‘उदाच्या बनात’ या कवितेत तर स्वप्न आणि वास्तव याचा भास कवयित्रीला होत असला तरी कविता सहज आताच हे घडतं आहे अशीच येते. लग्नापूर्वीच्या प्रियकराच्या सर्व भेटीगाठी, दोघांमधले तरल संवाद, प्रसंग जसेच्या तसे वर्तमानात तो नसतानाही ती अनुभवत असते. कवयित्री म्हणते,

किती युगांनी आले पुन्हा उदाच्या बनात

झाकळलेल्या हवेत होता
ओला गंध उदाचा
पाऊस होता जरा थांबला
अजून तरीही
निथळत होते पाणी
पानावरून उदाच्या
संथ लयीवर टप टप टप
किती युगांनी फिरले पुन्हा
उद बनातून

इथे कवयित्रीला अनेक युगांची स्मृती होते आहे हा भास की आभास की वर्तमान?

ते उदाचं झाड त्यावर शुभ्र उन्हाची शिंपण झाली. इतकंच काय हिरवी पिवळी अरास चमचमणाऱ्या गवतावर ती आहे आणि गवतावरती दोन सावल्या,

मधल्या अडव्या फांदीवर रेलून
दोन सावल्या
तो होता खोवित
घोस फुलांचा
सावलीतल्या अंबाड्यावर

इकडे तिकडे कुणीच हे दृश्य पाहत नव्हते तरी उरात धस्स झालं. आणि ती धडपडली परत फिरण्यासाठी आणि एक आश्चर्य समोर आलं,

झगमगला पण दिवा विजेचा
मच्छरदाणीच्या जाळीतून

तो दिवा, पलंग, मच्छरदाणी हे वास्तव पाहून जीव शांत झाला. 'वाटलं' इथेच तर होते मी. उगाच काहीतरी! आणि एक मग सुखाचा निःश्वास. पण अजून एक आश्चर्य पुढेच होतं. उरात धस्स करणारं.

तिने मग - सहज फिरवला केसावरूनी हात
हात गोठला
वेणी मधल्या फूल घोसावर
दुज्या कराने घट्ट खेचला
काळोखाचा पडदा
लपावायला लपलेल्यांच्या पासून

कविता या लपण्यावर संपते आणि तो भास न उरता सहज वाटत राहतं. एक अदृश्य नातं असं परत येऊन भेटू शकतं? की तो मनाचा खेळ कारण फुलांचा घोस हाताला लागला.

कदाचित तो आदल्या दिवशी केसात माळलेला तसाच राहिला असेलही पण आचवल म्हणतात, ''बाई एखाद्या लहानशा घटनेतील अनुभवाचं स्पंदन पकडतात आणि ते पसरून देतात क्षितिजापासून क्षितिजापर्यंत.'' तसं इथे उदाच्या बनात युगायुगांचा उल्लेख आणि स्वप्न भास यात त्यांचं मन क्षणात भूतकाळात जाऊन येताना तो भास बरोबर घेऊन प्रकटतं.

गवतावरती दोन सावल्या
तो होता खोवित घोस फुलांचा
सावलीतल्या अंबाड्यावर

मी तिथे कुठे आहे हे कवयित्री लपवते किंवा दूरान्वयाने सूचित करते. ग.दि.मां.चं एक गीत आहे.

'माजघरातील उजेड मिणमिण
वृद्ध कांकणे करिती किणकिण
किणकिण ती हळू ये कुरवाळू
दूरदेशीचे प्रौढ लेकरू'

इथे वृद्ध काकणे नाहीत हात वृद्ध झाला. आई वृद्ध आहे. ती बांगड्यांची किणकिण दूरदेशीच्या प्रौढ लेकराच्या पाठीवर हात फिरवते आहे. किती शब्द, आशय आणि भावना यांची विलक्षण गुंफण. तेच इथे. सावलीतला अंबाडा. आणि प्रत्यक्षात तर वेणीवर फुलांचा घोस होता. हे कसं?

यापुढची कविता 'मघाशीच की' ही कविता म्हणजे 'उदाच्या बनात' या कवितेचा उत्तरार्ध आहे किंवा दुसरा भाग म्हणता येतो. आता इथे बना ऐवजी माळ आहे पसरलेला. पण इथे गवत आहेच. इथेही पुन्हा अनेक वर्षांनी भेट हा संदर्भ आहेच.

पण यातलं नावीन्य म्हणजे सरळ दोघांचे संवाद आहेत. ही आहे माळावरची भेट.

आलीस केव्हा?
आताच ही ना, तुझ्यापुढे मी
तू आल्यावर
'किती वर्षांनी भेट पुन्हा ही'
''वर्षे कुठली ... मघाशीच की
होतो आपण त्या माळावर

मग ती त्या माळाचं वर्णन करते. करडं विरळ गवत, एक रोपटं, नुसत्या फांद्याच फांद्या, एक करडं काळं पाखरू बसलं होतं तारेवर. भरारणारा काळा वारा होता.

माझ्या भुरभुर उडणाऱ्या केसांची शपथ घालताना
विचारलेस तू
आठवते ते धूसर धूसर
त्यानंतर कितीक अघटित गोष्टी घडल्या
कितीक वर्षं गेली, वर्षं गेली.

ती म्हणते, ''उगाच काय मघाशीच तर मी त्या गवतातून परतले. खोटं वाटतं? बघ ही पदरावरती कुसळं आहेत तू कितीतरी काढलीस तरी आहेत. पहा! चाचपून.

हे खोटे? हे खोटे तर मग तू इथे उभा आहेस गवतावरच्या थेंबाचा हा रंगच! हा रंग हे खोटे?''

गवतपात्याच्या रंग थेंबावर कविता संपते. पण दृश्य संपत नाही. मघाशीच तर भेटलो आणि अजून ही भेट सुरूच आहे, संपलीय कुठे?

अनेक वर्षं गेली. अघटित गोष्टी घडल्या. अघटित म्हणजे प्रियकराचा मृत्यू असावा, जो तिच्या मनाने मानलाच नाही. मनाला बसलेल्या चटक्यांवर मलमपट्टी करून तो अजून आहेच. भेटतोच आहे. कितीक वर्षं लोटली तरी. पण माळरानावर काळ्या तारेची गुंतावळ आहे. काळं करडं पाखरू आहे. काळा वारा आहे. कुसळं आहेत. असे काळा रंग दर्शविणारे शब्द आयुष्यातल्या अप्रिय गोष्टींची जाणीव करून देतात. दोघांचं भावजीवन निसर्गाबरोबर बहराला आलं. नंतर तो दृष्टिआड झाल्यावरही तो तिथेच आहे. अशी सूक्ष्म.... जाणीव पुनःपुन्हा विशाल रूप घेऊन अभिव्यक्त होत राहते. आणि ती

लिहिते, 'मघाशीच तर मी आले.' आणि ही भास कविता आपल्या तरल जाणिवांना धक्का देते.

इंदिराबाईंची 'परकी' ही कविता स्वतःला अनोळखी करून टाकते.

दमले चालून
आणि परतले घराकडे मी
अजून होते पायावरती
ढगाढगातले धुके पिंजले
अजून होते केसामधे
निळ्या विजेचे केसर उरले
अजून होत्या डोळ्यामधे ओल्या तारा..
भरली रक्तामधे ऊब घराची
येता दारापाशी
समोर ते पण शून्य रिकामे
अनोळखीसे

इथपर्यंत इंदिराबाई काव्यात्म, तरल शब्दकळा वापरतात.

आणि पुढे त्यांचीच प्रतिकृती असलेला दोन स्त्रिया त्यांना घरात दिसतात. एक हातात भांडं घेऊन, ओचे सावरून घामाने डबडबलेली, तिचे शब्द पोरके, थोडे परके. विचारते कोण तुम्ही? दुसरी तिच्या मागून आली. तिच्या हातात कागद, डोळ्याखाली काळा शिणवटा. तिचे शब्द कोरडे. थोडे करडे, ती विचारते कोण तुम्ही?

त्या दोघी दारात उभ्या आणि ते दारही कवयित्रीकडे टकमक बघत राहते, अनोळखीसे. कवयित्री म्हणते, ''मला कळेना. मला कळेना.''

या कवितेचा पहिला भाग कवयित्रीचं रूप आकाशातून उतरलेलं कारण पायावर ढगांचं धुक, केसात निळ्या विजेचे केसर आणि डोळ्यात ओल्या तारा पण घराची ऊब रक्तामधे जाणवत होती. म्हणून त्या आल्या तर घर अनोळखी, दोन स्त्रिया अनोळखी. त्यातली एक लेखिका, दुसरी घरकामात मग्न. ही पहिली कवयित्री स्वतःचे तीन जन्म कवयित्रीने पाहिले आणि पुन्हा ती परकीच राहिली. घर अनोळखी कारण तिथे प्रियकर नव्हता, असे हे जन्मजन्मांतरीचे भास.

हे संपत नाहीत तेव्हा ती व्रत स्वीकारते. कसलं? तर कधी तिला साक्षात्कार होतो. आता तो नाही याचा. मग ते भास आभास निग्रहाने दूर सारून ती म्हणते,

कधी कुठे न भेटणार
कधी न काही बोलणार
कधी न अक्षरात।
मन माझे ओवणार
निखळे कधी अश्रु एक
ज्यात तुझे बिंब दिसे
निखळे निःश्वास एक
ज्यात तुझी याद असे
पण तिथेच ते तिथेच
मिटून ओठ संपणार
व्रत कठोर हे असेच
हे असेच चालणार

तरीही अश्रूच्या थेंबात तो दिसतो आहेच. निःश्वासात आठवण गच्च भरलेली आहेच. पण आता भेटणार नाही, बोलणार नाही. ओठ मिटून घेणार. या भास आभासाला स्वतः पूर्णविराम दिला. तरी ती निसर्गात परतली की तो निसर्गच तिला पुनःपुन्हा भुलवतो. प्रियकराच्या वाटेत आणून सोडतो.

प्रियकराचे अमूर्त अस्तित्व कवयित्रीला पुरते व्यापून टाकणारे या अर्थाने ते अलौकिक होतं कारण ही कविता म्हणजे एकाकीपणाचे दुःख नाही की विलापिका नाही.

भूतकाळ आणि वर्तमानकाळ याच्यामधे ताणले गेलेले क्षण शब्दात भास आभासाचं रूप घेतात.

काळाची अशी जाणीव पूर्वी कधी कवितेतून प्रत्ययाला आली नव्हती. क्षितिजापलीकडचं भवतालं इतकं जवळ येऊन भिडलं की कवयित्रीच्या वेदनेला विरहाला शब्द मिळाले, त्यातून कधी त्यांना काळोखाचा प्रत्यय आला तर निसर्गात खेळणारं चैतन्य, त्यांना वीज, वारा, ऊन, पाऊस यांच्या साहचर्यात प्रियकराच्या अस्तित्वाच्या खुणा दाखवून गेलं. प्रियकराच्या चिरविरहाच्या वेटोळ्यात त्यांना वीज संदेश पाठवणारी सखी वाटते.

त्यांच्या अनेक कवितातून जवळजवळ पंधरा वेळा विजेचे उल्लेख वेगवेगळ्या प्रतिमातून व्यक्त होतात.

गर्द विजेचा मत्त केवडा, रक्तामधली काळी बिजली, सोनुकले फूल विजेचे, कणाकणातून वीज रुतलेली, कुंपण तारावरून विजेच्या, वीज विजेचे मादक पाणी, डोह विजेचे, सोनतुऱ्याच्या फुलात पिवळी वीज, केसात निळ्या वीजेचे केसर, वीज दाटला कडूनिंब, नागमोड्या पापण्यानी वीज पेलली, डोळ्यात विजेचं काजळ, नको पाठवू वीज सुवासिक, डोळ्यांची चोरी करणारी चोरटी वीज, धुमसणारी वीज, सख्याच्या डोळ्यात विजेला पूजीन.

या सर्व भास कवितांना अंतर्गत लयीने नियंत्रित होणारा मुक्त घाट इंदिराबाईंनी वापरला. फक्त 'व्रत'साठी नेहमीचा अष्टाक्षरीचा उपयोग केला आहे.

या भास कवितांच्या निमित्ताने इतकंच म्हणावसं वाटतं की प्रियकराचा स्पर्श, त्याचा शरीरगंध, त्याचे बोल, डोळ्यातले भाव, त्याच्या लकबी, सगळं त्याचं व्यक्तिमत्त्वचं त्यांच्या अंगात मनात अगदी भिनलेलं आहे. रक्ताचे सगळे प्रवाह त्याचंच गीत गात असत. इतकंच काय, कवयित्री स्वतःला पुनःपुन्हा मोडणाऱ्या आणि घडवणाऱ्या क्रियेत, एकाच रेषेत खोल जात राहते. ती आपले कलात्मक व्यक्तिमत्त्व निराळ्या तऱ्हेने घडवते. बरोबर प्रियकर असतोच त्याच्या स्मृती घनगर्द अरण्यात वावरताना कवयित्री क्षणाक्षणाला जाणिवेच्या डोहातून वर येण्यासाठी तडफडत असते. त्याच त्यांच्या कवितेच्या ठिणग्या भास कवितेत तेवत राहतात. आणि सतत भासमान होतात.

**– मधुवंती सप्रे**
भ्रमणध्वनी : ९८२११७५३४९
madhuvanti.sapre@yahoo.com

नव्वदोत्तर साहित्य, लेखकांचे लेखन आणि नियतकालिक यांची सांस्कृतिक मीमांसा अधिक व्यापकपणे झाली पाहिजे.

# नव्वदोत्तर मराठी साहित्य काही प्रश्न

## डॉ. प्रभाकर देसाई

**म**राठी साहित्याच्या बाबतीत नव्वदोत्तर कालखंडाची म्हणता येईल अशी काही लक्षवेधी निर्मिती ह्या नव्वदीच्या तोंडावर झालेली नाही. त्यामुळे वाङ्मयीन घटितांच्या अनुषंगाने नव्वदोत्तर असे विवक्षितिकरण करण्यात अतिरेकीकरणाचाच दोष येणे अधिक शक्य आहे. पण साहित्य ज्या स्थल, काल व अवकाशाच्या परिमाणात आकार घेते, त्यात मात्र एक मोठा उलटफेर ह्या कालबिंदूवर दिसतो. १९९०च्या आसपासचा कालखंड हा राजकीय, आर्थिक व सामाजिक घटितांच्या अनुषंगाने आमूलाग्र बदलांचा आणि स्थित्यंतरांचा आहे. महाराष्ट्राच्या व भारताच्याच नाही तर संपूर्ण जगाच्याच उलथापलथीचा हा काळ आहे. ह्या दोन्ही आघाड्यांवर ज्यावेळी बदल होतात त्यावेळी त्यांचे सांस्कृतिक पर्यवसान तात्काळ दृग्गोचर होणे अपरिहार्य नसले तरी तशा अभिसरणाला किमान एक स्थळ व अवकाश प्राप्त होतो. म्हणून नेहमीच काही लिहिले गेले नाही, रचले वा साकारले गेले नसले, तरी सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक बदलांची उपस्थिती टाळता येत नाही. अशावेळी अर्थात सांस्कृतिक प्रतिधुरिणत्वाच्या निर्माणात्मक व चर्चात्मक अपरिहार्यतेची बाबही तितकीच महत्त्वाची आहे, पण मराठी साहित्यव्यवहारात फुटकळ प्रतिक्रिया आणि आवेगी वा चर्वितचर्वणात्मक मंचीय भाषणे ह्या पलीकडे फारशी मजल गेली नाही. त्यातून जडलेले असाध्य रोग मग साहित्यव्यवहाराला आतून पोखरतात हा इतिहास आहे.

कोणत्याही कालखंडातील व्यक्तीला स्वत:च्या सामाजिक अस्तित्वाची, दायित्वाची आणि अस्मितांची ओळख इतिहासातूनच होते. समकालीन नव्या सामाजिक अस्मितांच्या उभारणीसाठी आणि दायित्व जागरणासाठी आपापल्या पातळीवर इतिहासाची नवी मांडणी किंवा किमान आकलन तरी आवश्यक असते. समाज ही स्थितिशील संकल्पना नाही. समाज ही कायम बदलणारी गतिकी आहे. अशा गतिकीच्या ऐतिहासिक विश्लेषणातून सामाजिक गतीनियम मिळवता येतात. ह्या सामाजिक गतीनियमांच्या साह्याने वास्तवाचे आकलन, आपल्याला पडलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची दृष्टी प्राप्त होते किंवा प्रेरणा मिळते. सभोवतालच्या माणसांमधील नातेसंबंधांचे, त्यातील गुंतागुंतीचे, त्याभोवतीच्या पर्यावरणाचे तितकेच गुंतागुंतीचे संरचन समाज नावाच्या गतिकीत असते. समाज ह्या स्थिर संकल्पनेचाच जर का लेखकावर अधिक प्रभाव असेल तर मग त्याच्या साहित्यकृतीत अशाच प्रकारच्या स्थिर समाजवास्तवाचे बिंब-प्रतिबिंब अवरूद्ध होते आणि सामान्य वाचकसुद्धा अशाच प्रवृत्तीचा असतो, किंवा घडवलेलाही असतो, त्यामुळे तोही तेच अधोरेखित करतो किंवा तसेच काही पडताळून बघतो. मराठीतील साहित्याचे बहुतेक अभ्यास हे अशा प्रकारचे पृष्ठस्तरीय आहेत, पण साहित्य आणि समाज हे द्वंद्व केवळ पृष्ठस्तरीय नाही. सुरुवातीला सांस्कृतिक पार्श्वभूमी दिली की मग धर्म, अर्थ, संस्कृती वा राजकारण इत्यादी सामाजिक प्रक्रियेतील क्षेत्रांचा साहित्यप्रकारात्मक वा साहित्येतिहासिक विवेचनात फारसा संबंध नसतो, अशी आपली गत आहे.

कोणत्याही कालखंडातील साहित्यव्यवहाराचे त्या काळातील एकूणच पर्यावरणाशी कोणत्या प्रकारचे संबंध आहेत, हे तपासताना काही गोष्टी नेमकेपणाने आकलानातच आणाव्या लागतात. सामाजिक शास्त्राच्या अभ्यासकाची साहित्याकडे पाहण्याची दृष्टी आणि एखाद्या लेखकाची आणि साहित्यसमीक्षकाची दृष्टीसुद्धा मुळात भिन्न असते. लेखकाला समाजशास्त्रीय दृष्टी असू शकते पण तो साहित्यव्यवहाराकडे किंवा कलाकृतीकडे त्या दृष्टीने पाहीलच असे नाही. लेखकाचा कल हा मानवी जीवनातील द्वंद्वे व्यक्तिनिष्ठ पातळीवर रेखाटण्यावर अधिक असतो. सामाजिक अंगाने साहित्याचा अभ्यास करणारा जो अभ्यासक त्याचेही समाजशास्त्रीय आकलन अपुरे असण्याचा संभव अधिक असतो. खरे पाहता लेखकाच्या व्यक्तिनिष्ठ अनुभवाचे सामाजिक स्रोत कोणते आहेत, त्याचे ऐतिहासिक व सांस्कृतिक संदर्भ काय आहेत याकडे कालखंडात्मक साहित्याभ्यासाचे लक्ष गेले पाहिजे. लेखकाच्या अनुभवांचे भौतिक अधिष्ठान, त्यांचे सत्तासंबंधात्मक रूप व हितसंबंधात्मक आविष्कार ह्या बाबींकडेही अशा अभ्यासात दुर्लक्ष होते. समाज हे व्यामिश्र द्वंद्वरूप आहे, ह्याचे भान राहत नाही. साहित्याच्या ऐतिहासिक आकलनात ही शक्यता असते, ती असायला हवी; पण साहित्याभ्यास आणि समाज हा अनुबंधही पुष्कळदा दुर्लक्षित होतो. दुसरीकडे सामाजिक शास्त्राचा अभ्यासक साहित्याकडे मुख्यत्वे सामाजिक व्यवहार म्हणूनच बघतो. साहित्यकृतीच्या अंगभूत कलागुणांपेक्षा ती विशिष्ट साहित्यकृती कोणत्या सामाजिकतेचा आविष्कार करते, ह्या सामाजिकतेची निवड लेखक कसा करतो, त्यासाठी तो कोणती प्रकारात्मकता वापरतो, ही निवड व प्रकारात्म रूप त्या विशिष्ट कालखंडातील किंवा कालखंडात्मक परंपरेत कोणत्या सामाजिक संबंधात अवतरतात आणि त्याद्वारा कोणत्या मानवी मूल्यांचे भरण-पोषण वा

खंडनमंडन केले जाते, हे प्रश्न त्याच्या केंद्रस्थानी असतात. साहित्य आणि समाज ह्यांचे संबंध केवळ पृष्ठस्तरीय नाहीत, त्या केवळ स्थिर संकल्पना नाहीत तर तो एक बदलणारा, परिवर्तनीय असा साहित्य व समाजप्रक्रियात्मक व्यूह आहे, हे भान जर साहित्याचा व सामाजिक शास्त्राचा अभ्यासक म्हणून आपणास यायचे असेल तर आपल्याकडे ऐतिहासिक दृष्टिकोन हवाच. ह्याचा अर्थ साहित्य आणि समाज ह्यांच्या परस्पर-संबंधांचे नेमके भान आणून देण्यात साहित्येतिहासाची उपस्थिती आणि भूमिका खूप महत्त्वाची आहे. सामाजिक इतिहास लिहिणारे साहित्येतिहासाला दुय्यम व साधनरूप मानतात आणि साहित्येतिहास लिहिणारे सामाजिकतेला पार्श्वभूमीवर ठेवतात. ह्या अशा मतमतान्तरांमुळे समाज व साहित्येतिहासविषयक विविध सिद्धान्तने आणि पद्धती-दृष्टिकोनांमध्ये टोकाचे अंतर पडत जाते. पण एखाद्या कालखंडातील साहित्याचे महत्त्वमापन करायचे तर त्याचे समकालीन संबंध व सामाजिक प्रयोजन बाजूला सारता येत नाही, ह्याचे कारण साहित्य हे समाजाच्या कालखंडात्मक अक्षावरच निर्माण झालेले असते आणि स्वत: अशा अक्षाची निर्मितीही करीत असते.

विशिष्ट काळातील साहित्य व समाज यांच्यातील संबंधाचा शोध घेण्यासाठी त्या काळातील साहित्याला समाज या संकल्पनेपासून अर्थपूर्ण रीतीने वेगळे करणे आवश्यक ठरते. यामुळे साहित्य व समाज यांच्यातील संबंधात साहित्याचा सक्रिय सहभाग असतो हे स्पष्ट करणे शक्य होईल. हरिश्चंद्र थोरात यांनी ही प्रक्रिया संस्कृती या संकल्पनेच्या मदतीने साधता येईल असे स्पष्ट म्हटले आहे. कोणत्याही काळातील साहित्यनिर्मितीची कारणमीमांसा हा काही केवळ जिज्ञासेचा भाग नसतो. विशिष्ट काळात, विशिष्ट परिस्थितीत विशिष्टच साहित्य का निर्माण होते; विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट लेखक विशिष्ट प्रकारची मूल्यव्यवस्था का अधोरेखित करतो, असे प्रश्न खूपच महत्त्वाचे आहेत. केवळ साहित्यकृती, लेखक, चळवळी आणि साहित्याचे वितरण म्हणजे साहित्याचा अभ्यास नाही. विशिष्ट काळातील समाज, संस्कृती, धर्मव्यवस्था, तत्त्वज्ञान, आर्थिक स्थिती, राजकीय घडामोडी, वर्ग-वर्ण-जातीव्यवस्था वाङ्मयीन व कलापरंपरा, नैसिर्गिक पर्यावरण इ. गोष्टींचे नेमके ज्ञान साहित्याच्या अभ्यासकाला असलेच पाहिजे.

विसाव्या शतकाच्या ह्या अखेरच्या टप्प्यावर नवभांडवली व्यवस्थेचा उगम झाला आणि जगात सर्वत्र जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. ह्या वीसपंचवीस वर्षांत केवळ भांडवलवादी देशातच नव्हे तर एकूण समाजवादी व साम्यवादी देशांतही खाजगीकरण, उदारीकरण आणि आर्थिक पुनर्रचना ह्या संज्ञा अगदी परवलीच्या झाल्या. आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील अनेक देशांनी ह्या जागतिक भांडवलशाहीला सामोरे जात आणि ह्या ग्लोबल अर्थव्यवस्थेशी जोडून घेत आपला अर्थिक पुनर्रचनेचा उद्योग पूर्णत्वास नेला आहे. नव्वदीच्या सुरूवातीला भारताच्या नव्या अर्थनीतीचा आराखडा व स्वीकार ह्याच प्रक्रियेचा भाग आहे. आजही ही आर्थिक संक्रमणाची प्रक्रिया जगात सर्वत्र दिवसरात्र चालू आहे आणि आपणही ह्या संक्रमणाला अज्ञानातून सामोरे जात आहोत. परिणामी आपल्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावर त्याचे दूरगामी परिणाम होत आहेत. जगभरातील कोणकोणत्या घटकांना ह्या परिणामांना सामोरे जावे लागले, आर्थिक विकासाच्या नव्या संधी व वाटा जरी ह्या काळात तयार झाल्या तरी कोणत्या समाजघटकांच्या वाट्याला त्या आल्या हे पाहणे फार गरजेचे आहे. विशेषत: वंचित व शोषित घटकांचा बळी घेत ह्या नवभांडवलशाहीच्या आर्थिक पुनर्रचना झाल्या आहेत. जातवर्गलिंग अशा तिन्ही पातळ्यांवरील हे वंचित व शोषित घटक अधिक कठोरपणे भरडले गेले आहेत. अर्थात नवभांडवलीकरणपूर्व काळातही भांडवलीकरणाचा परिणाम म्हणून अगोदरचेच जात, वर्ग व लिंगपातळीवरील आंतर्विरोध अधिक तीव्र झाले होते. भांडवलदार वर्ग आणि उच्च जाती ह्यांचे हितसंबंध भांडवली विकासात नेहमीच परस्परपूरक असतात. उदाहरणार्थ दलित जातींमधील शोषित वर्ग भांडवलशाहीचे सर्वाधिक बळी ठरले. एका बाजूला विकासप्रक्रियेत ते खेड्यांतून उखडले गेले व दुसरीकडे शहरांनी त्यांना नाकारले, पण दलित विद्रोह व दलित साहित्याच्या चळवळीने ह्याबाबत आवाज उठवला. ही चळवळ म्हणजे पारंपरिक जातव्यवस्थेबरोबरच भांडवली जातवर्गशोषणाचेही परिणामस्वरूप आहे. ह्याच भानातून पाठोपाठ आदिवासी, भटकेविमुक्त आणि स्त्रियांच्या विद्रोहाने आकार घेतला. अर्थार्जन करून व सार्वजनिक जीवनात प्रत्यक्ष प्रवेश मिळूनही आपण अजून वंचित व शोषित आहोत हे भान आले. एका अर्थाने अर्थार्जनाचा पोकळपणा लक्षात येऊ लागला. आर्थिक स्वातंत्र्याचा फोलपणा आणि त्यासंदर्भातले राजकारण ध्यानात आले. व्यक्ती म्हणून प्राप्त झालेले अधिकार ह्या सामाजिक व सांस्कृतिक शोषणामुळे वापरताच येत नाहीत हे प्रकर्षाने जसे स्त्रीला कळले तसे इतर वंचित समूहांनाही कळले. परिणामी जात व इतर सरंजामदारी सामाजिक घटकसंस्थांचा पोकळपणा तीव्रतेने साठोत्तरी चळवळींमधून व्यक्त होऊ लागला. उपरोल्लेखित सर्व चळवळी व साहित्यातून हा आशय पहिल्यांदाच व्यक्त व्हायला लागला. इतकेच काय तर स्त्रीवादी चळवळीने स्त्रीचे सामाजिक, आर्थिक व लैंगिक शोषण हे वर्ग व जातनिहाय वेगळे असते हे अधोरेखित करायला सुरुवात केली. साहित्यव्यवहारात संसर्गित झालेला सांस्कृतिक क्षय, निदान आटोक्यात ठेवण्याचे महत्त्वाचे प्रयत्न म्हणूनही ह्या चळवळींकडे पाहता येते. अर्थात नव्वदपूर्व लगतच्या काळात इथेही ह्या चळवळींना परित्यक्त ठरवून सौंदर्यशास्त्रीय प्रश्न उपस्थित केले गेले आणि चळवळीनेही बळी पडून किंवा आपणहून पर्यायी सौंदर्यशास्त्राची मांडणी करायला बरीच शक्ती खर्च घातली. (सौंदर्यशास्त्र हे संकल्पनांच्या मांडणीचे तर्कशास्त्र आहे आणि त्याचे महत्त्व आपण नाकारत नाही पण सांस्कृतिक राजकारणाद्वारे कृतक प्रश्न तयार करून निर्मितीचे व विश्लेषणाचे स्वरूप सुलभपणे मांडण्यात कलाव्यवहार रोगावतो एवढेच सुचवायचे आहे.) मग अनुषंगाने चळवळीही उघड्या पडल्या. ऐंशीच्या दशकात भारतात जमातवादाचा उद्रेक आणि त्यातून धार्मिक अल्पसंख्यांकांचे दोन

प्रकारचे ध्रुवीकरण झाले. काही मंडळी धर्माला अधिक चिकटली तर काहींनी जमातवादाच्या मर्यादा ओळखून मुख्य भाषिक प्रवाहात सामिल होण्याचा निर्णय घेतला. खरेतर पहिल्या मूलतत्त्ववादी ध्रुवापेक्षा हा सर्जनशील ध्रुव आपण स्विकारायला हवा होता पण तसे झाले नाही. आपण नतद्रष्ट ठरलो. ह्या सर्जनशील ध्रुवाने मुस्लिम मराठी साहित्याची मोठ्या प्रमाणावर निर्मिती झाली.




डॉ. यशवंत सुमंत ह्यांच्या मते, मुस्लिम मराठी साहित्य संमेलनांतून तसेच जैन, ख्रिश्चन अल्पसंख्यांकांची भाषाधिकारावर हक्क सांगण्याची धडपड झाली. त्यांच्या या प्रयत्नांचे स्वागत ना मुख्य प्रवाहाने केले, ना परिवर्तनवाद्यांनी. अशा रितीने एकीकडे साठोत्तर भक्कम आशय गमवायला सुरुवात झाली आणि नव्वदपूर्व कालखंडातील अतार्किकता व असहिष्णुता घेऊनच आपण नव्वदीच्या दशकात प्रवेश केला. ह्याचा अर्थ नव्वदीच्या दशकात नवभांडवलशाहीने आर्थिक पातळीवर ग्रासले असले तरी वर उल्लेखल्याप्रमाणे सांस्कृतिक पातळीवर हे संसर्गीकरण अगोदरच मोठ्या प्रमाणात झाले, ही वस्तुस्थिती आहे.

नवी आर्थिक नीती आली आणि चंगळवाद वाढला. उपभोगाच्या सातत्यवादी अवस्थेमुळे सामाजिक जाणिवा बधिर झाल्या. गरीब-श्रीमंत, उच्चनीच तफावत वाढतानाच जातिभेदही अधिक काटेकोर झाला. एका अर्थाने जातिभेदाचे पुनरुज्जीवन झाले. भांडवलशाही अजिंक्य म्हणून घोषित झाली. साम्यवादाचा पराभव झाला. वैश्विक संस्कृती व वैश्विक खेड्याचा रोमँटिसिझम सुरू झाला. विचारप्रणाली व इतिहासाच्या अंताच्या मांडणीतून उत्तरआधुनिकता अवतरली आणि आधुनिकतेच्या प्रकल्पातील क्रांतिकारी विचारांवर तिने मात केली. हे सगळे खरे आहे, पण ते ऐंशीच्या दशकातही सुनियोजितपणे आकाराला येत होते, ह्याकडे दुर्लक्ष करता कामा नये.

भांडवलदार, सत्ताधीश व लाभार्थ्यांचे सांस्कृतिक धुरिणत्व हे अशा मोठ्या आर्थिक स्थित्यंतराच्या थोडे अगोदरच आर्थिक उदारीकरणाच्या चंगळवादी वेष्टणातून आपल्याशी समागम करते आणि आपण त्यांच्या पिलावळी तयार करण्यात आपली प्रतिधुरिणत्वाची रासायनिकता निकामी करत जातो. मग आपण जीवनाची व एकूणच विचारांची समग्रता नाकारायला लागतो. चळवळी रोगट व्हायला लागतात आणि ह्यातून त्यांचे तात्काळ विघटन व्हायला लागते, चळवळींचा आवाका व पैस आखडतो. समग्र आयुष्याचे रणकंदन घडवणाऱ्या चळवळी एकेका प्रश्नाच्या डबक्याभोवती घोंगावायला लागतात. परिणामी चळवळींचे तत्त्वज्ञान खुजे होते आणि त्यांच्यातील बहुसमुहात्मक व आंतरसमुहात्मक देवाणघेवाण संपुष्टात येते. संवादच तुटतो. त्या एकाकी वाटचाल करायला लागतात असे जे म्हटले जाते, त्याचे कारण ह्या सांस्कृतिक धुरिणत्वाच्या राजकारणातच सापडते. (समग्रतेला खंडित करणे, समुहाला एकावयवी करणे ही तत्त्वज्ञानाच्या पातळीवर एखाद्या संकल्पनेला आणि व्यवहाराला अपरिचित अशा दुसऱ्या ध्रुवावर जाऊन बघण्याची गरज व संकल्पनेची-व्यवहाराची बहुबिंदूमयता पाहण्याची तार्किक अपरिहार्यता म्हणूनही पाहता येते आणि त्या प्रक्रियेतील एकसत्त्वीकरण रोखता येते; प्रतिधुरिणत्वाच्या लढाईचे एक शिंगही फुंकता येते हे खरेच. इथे मात्र आपण सत्ताधीश, लाभार्थी व भांडवलशाहीच्या सांस्कृतिक राजकारणाचा पोत कसा कालानुक्रमे आपल्याला गाडत जातो ह्यासंदर्भात ही मांडणी करीत आहोत.)

चळवळी विघटित करणे आणि व्यक्तीचे अतर्क्य व अनाकलनीय उदात्तीकरण करणे हा नवभांडवलशाहीच्या महाधुरिणत्वाचा अजेंडा असतो. मूळच्या समाजशील समूहांचे विघटन करणे आणि व्यक्तीला एकाकी पाडणे, त्याला भोगवादी बनवणे, भ्रमित करणे अशा प्रक्रियेतून समाजाचे आपोआप विघटन व गुन्हेगारीकरण घडते आणि अहिंसेच्या तत्त्वज्ञानावर अतिविद्रोही हिंसेची मांडणी केली जाते. मूलतत्त्ववादाचे सिद्धान्तीकरण घडवून जगाला अराजकतेच्या खाईत लोटले जाते. सांस्कृतिक भांडवलशाही ही नवभांडवलशाहीचे आणि पुरस्कृत नवसांस्कृतिकवादाचे भक्कम राजकारण करते.

आता प्रश्न असा आहे की भारताच्या व महाराष्ट्राच्या बाबतीत हे धुरिणत्वाचे व्यापक राजकारण जर अस्तित्वात आहे आणि त्याचा अतिरेकी वावर आपल्याला अधिक रोगट करीत असेल तर आपण आज प्रतिधुरिणत्वाच्या लढाईचे मजबुतीकरण करीत आहोत की त्या दिवास्वप्नातून स्खलित होत जाऊन अधिकाधिक क्षयग्रस्त होत आहोत? ह्या क्षयग्रस्ततेचा अधिक विचार करायची आज वेळ आली आहे. आता प्रश्न असे आहेत की, आपण वर सूत्ररूपाने मांडलेले सर्व सामाजिक, राजकीय संदर्भ, एकूणच सांस्कृतिक परिस्थिती नव्वदोत्तर मराठी साहित्यात आली आहे का? मुख्य प्रवाहातील साहित्याने नाही तरी परिघावरच्या परिवर्तनवादी साहित्याने तरी ही मांडामांड केली आहे का? भारतीय पातळीवर परिणामकारक ठरलेल्या काही घटनांचा ओझरता उल्लेख करून बघू. उदाहरणार्थ, ऐंशी-नव्वदीच्या दशकात जमातवाद व धर्म मोठ्या प्रमाणात केंद्रस्थानी आणला आणि बाबरी मस्जिदीचा पाडाव करून रथयात्रेच्या निमित्ताने कारसेवकांच्या सर्जनशील उन्मादाला विघातक वळण देत हिंदुत्ववादाचे शिंग फुंकले गेले. १८९३ मधील हिंदू-मुस्लिम दंगलीपासून ते १९९२-९३ च्या मुंबई दंगलीपर्यंत शंभर वर्षांचा कालखंड व पुढील दशकभरात गुजरातच्या दंगली अशा एकशे दहा वर्षांच्या धार्मिक मूलतत्त्ववादाकडे मराठी साहित्य कसे पाहते; म्हणजे ह्या प्रश्नाकडे पाहते की नाही, की पाहतच नाही की एकाच साच्यातून पाहते, ह्याचा विचार आपण फारसा करत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मांडणीपर्यंत

आपण धर्माबद्दल काटेकोरपणे बोलत राहिलो. पण मग दलित साहित्यात तरी पुढे धर्माची चिकित्सा अधिक झाली की जातीची, ह्या अनुषंगाने आपण विचारच करत नाही. खरेतर भारतात धर्म ही गोष्ट अनेक रूपांनी आढळते; जातीयता हा धर्माचाच आविष्कार आहे. मग आजच्या चळवळी आणि त्यांचे साहित्य धर्माच्या ह्या विविध प्रारूपांकडे चिकित्सेने पाहत आहेत का? तर दुर्दैवाने नाही. आपण प्रतिक्रियावादी जरूर आहोत पण वर्तमानकाळातील आपल्या आजूबाजूच्या जिवंत घटिताला, इतिहासाला साहित्यात परावर्तित करण्याची कुवत मात्र आपल्यात नाही. आर्थिक उदारीकरणाच्या रेट्यातून आर्थिक विकासाची गती वाढल्याचे अहवाल प्रसिद्ध झाले पण भारताच्या शेतीप्रधानतेची दुर्दशा झाली. शहरीकरणाचा प्रकल्प जोमात सुरू झाला पण खेडी बकाल पडून शहरांच्या फुगवट्याचा रोग जडला आणि पर्यावरणावर सतत बुलडोझर फिरत राहिला. मंडल कमिशनचा रिपोर्ट, भारताचे जातकेंद्री राजकारण, राममंदिराचा प्रश्न, भारतीय जनता पक्षाचे सरकार, आण्विक चाचण्या, रोजचे बॉंबस्फोट, टोळीयुद्धे, अतिरेकी हल्ले, प्रशासकीय भ्रष्टाचार, कायदाव्यवस्थेतील दिरंगाई अशा अनेक स्थितिगतीतून भारताचे व महाराष्ट्राचे घटित मांडता येते. आणि ह्या सर्वांना प्रभावित करणारे, व्यापणारे आणि दशांगुळे उरणारे वास्तव म्हणजे धार्मिक असहिष्णुता.

नव्वदीनंतरच्या काळात तर ह्या धार्मिक मूलतत्त्ववादातून जगभरातच वास्तवाला इतिहासविरहित करण्याचे भरपूर प्रयत्न झाले आहेत, आजही ते चालले आहेत. भारतात ह्या गोष्टी तर अधिक जोमाने सुरू आहेत, अशावेळी तर लेखकाने आपल्या अनुभवांमध्ये समकालीन इतिहासाला वास्तवबद्ध करून त्याला वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व देणे अधिकच गरजेचे असताना ह्या पार्श्वभूमीवर मराठी साहित्यात मात्र ह्याचे दुर्भिक्ष्य दिसते. मराठी कविता साठसत्तरीच्या दशकात तरी ती उर्मीच्या आणि प्रसवाच्या बाबतीत अतिशय ठसठोंबस होती. म्हणजे तिची जातिधर्माच्या बाबतीतील प्रतिकारक्षमता आणि समकालीन इतिहासाला वास्तवबद्ध करण्याचे प्रयत्न खरोखरच लक्षात घेण्यासारखे होते. पण आता ती अपवादाने तशी राहात पूर्णांशाने अधिक तांत्रिक, गळेकाढू, वर्तमानपत्री भाषेसारखी आणि अंगभूत उर्जाच क्षीण झाल्यासारखी पण तरीही मरणासन्न गतिमानतेने बहुप्रसवेत रमणारी मात्र झाली आहे. कथा, कादंबरीबाबत आशयसूत्रांचे, शैलीचे अंधानुकरण आणि आयत्या मिळालेल्या अहवालांमधली पानेच्या पाने भरून उथळ, चतुर व खुसखुशीत राहण्यात अधिकांश कादंबरी धन्यता मानते. नाटकात जरा बरी गती दिसत असली तरी नाटककार म्हणून संहितेतून दिसण्याची कादंबरीकारासारखी किंवा बातमी लिहिणाऱ्या बातमीदारासारखी धडपड इथेही दिसते. ह्याचा अर्थ मराठी साहित्यव्यवहारात काहीच घडत नाही असे म्हणायचे नाही. नव्वदीनंतर काही साहित्यिक आपल्या अंगभूत मर्यादा ओलांडण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण हे प्रामाणिक प्रयत्नही हास्यास्पद व चेष्टेचे वाटावेत इतके नगण्य आहेत. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, भटके-विमुक्त, बहुजनवादी, आंबेडकरी, महानगरीय, प्रादेशिक, पुरोगामी, समतावादी, समरसतावादी अशा अनेक प्रभागांमधून जोरदार साहित्यनिर्मिती सुरू आहे. विचारांची रणदुदुंभी वारेमाप धुरळा उडवते आहे हे खरे, पण तिथे प्रदूषणच अधिक डोळ्यात भरणारे आहे. दोनचार कवी, कथाकार, कादंबरीकार, नाटककार आणि समीक्षक, विचारवंत आपल्या निर्मितीतून संस्कृतिविश्लेषणाचे कार्य चोखपणे करताना ह्या धुरळ्यातही आपले भूमीसातत्य टिकवून आहेत, हे आशादायी चित्र आहे खरे, पण ही संख्या लाजिरवाणी आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर आपल्याकडे एखादी लक्ष्यवेधी साहित्यकृती निर्माण झाली आहे काय? जागतिकीकरण आणि जमातवादाचा विळखा कुणी सांस्कृतिक अंगाने व्यामिश्रतेसह मांडला आहे काय? नवभांडवलशाहीने लादलेली सांस्कृतिक गुलामगिरी किती लेखकांच्या चिंतनाचा विषय आहे? मागच्या पाचेक वर्षांत कुत्र्याच्या छत्रीसारख्या उगवलेल्या प्राध्यापकभूषणजनमंडळीहिताय नियतकालिकांच्या एकसाची आवृत्त्या कोणते सांस्कृतिक मर्दन करताहेत? खरेतर साहित्याच्या परिघाबाहेरचे समाज व समूह आपले अनुभव आणि ज्ञान जितक्या अधिक प्रमाणात व्यक्त करीत राहतील तितके मराठी साहित्य अधिक सकस, सांस्कृतिक प्रतिधुरिणत्व साकारणारे आणि समाजाभिमुख होत जाईल; पण आज ह्या समूहांमध्येही साचलेपणा आला आहे. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी इत्यादी उपेक्षित समूहांना आपली साहित्यनिर्मिती आतापर्यंत तरी बहुतांशत: निवेदन-वर्णनाच्याच पातळीवर मांडता आली आहे. आत्मकथन हा साहित्यप्रकार अतिशय प्रभावीपणे मांडण्यातील ह्या समूहांच्या प्रयत्नांची खरी वस्तुस्थिती काय आहे? तर आत्मकथने किंवा अनुभवकथनपर कथा-कादंबऱ्या ह्या वास्तवाचे यथातथ्य फक्त वर्णन करू शकतात आणि ह्या समूहांनी ते इमानेइतबारे केले ह्यात शंका नाही; पण ह्या वास्तवाच्या मूळाशी असलेल्या मूलतत्त्ववादी, पुरूषसत्ताक व सरंजामदारी शक्तींचा वेध घेणे आणि त्यांच्या प्रतिकारासाठी सांस्कृतिक प्रतिधुरिणत्वाच्या उपायांचे वैचारिक अधिष्ठान बांधणे; ह्यात मात्र हे उपेक्षित व वंचित समूह अजूनही चाचपडत आहेत. म्हणून आपल्या दु:स्थितीच्या चित्रीकरणातून पुढे जाणेही आपल्याला जमले पाहिजे. इतरांच्या दांभिकपणाचे मुखवटे मिशांसकट खाली खेचून काढणे केव्हाही चांगलेच पण आपणही इथल्या सांस्कृतिक सापेक्षतेचे आणि एकारलेपणाचचे नवे बुद्धिवादी सरंजामदार होत आहोत त्याचे काय करायचे? डॉ. भा. ल. भोळ्यांनी ह्याबाबत महारोग्याची प्रतिमा वापरली आहे. सादृशत: महारोगी पण आतून असाध्य क्षयाने पोखरलेले पोकळ अवडंबर आणि थोडीफार प्रसिद्धी, मानमरातब, बक्षिसे, सत्कार अशी मलमपट्टी ह्यातून आपले सत्त्व तर गमावतच आहोत; पण आपले झोत विझून जाऊन आता आपण जुन्या मळलेल्या वाटाच तुडवतो आहोत आणि उत्खननाच्या आवेशात त्या उकरतही बसलो आहोत, हे वास्तव किती काळ आपण नाकारणार आहोत, हा खरा प्रश्न आहे.

नवभांडवलशाही व्यवस्थेत जसजशी अर्थव्यवस्था वाढत





जातेय तसतसा मध्यमवर्गाचा पायाही विस्तृत होत आहे, त्याचे प्रभावक्षेत्र वाढू लागले आहे. राजकीय समाजशास्त्रज्ञ ई. श्रीधरन ह्यांच्यामते मध्यमवर्गाच्या विस्ताराने भारतीय वर्गरचनेत खूप बदल घडून आला आहे. पूर्वी छोटेखानी बुद्धिजीवी वर्ग आणि अफाट दरिद्री वर्ग अशी एकमेकांपेक्षा पूर्ण भिन्न अवस्था होती. आता ह्या दोहोंत एक विस्तृत असा मध्यमवर्ग आहे आणि आपल्याला असे म्हणता येईल की असा हा आताचा मध्यमवर्ग ह्या दोहोंना जोडणारा सामाजिक व सक्रिय घटक आहे आणि तो जातिधर्माच्या सर्व प्रकारच्या मांडण्यांत विखुरला गेला आहे. ह्याला आपण ह्या अर्थाने नवमध्यमवर्ग म्हणू. तर हा जो नवमध्यमवर्ग आहे त्याला ह्या नव्या भारतीय अर्थव्यवस्थेत ज्या उपभोग्य वस्तू व सेवा तयार केल्या आहेत त्यांनी आपले लक्ष्य केले आहे. भारतात आता जवळपास सात कोटीहून अधिक टीव्ही केबलधारक आहेत. १९९२ मध्ये ते केवळ ४१०,००० म्हणजे चार लाखाच्या आसपास होते. त्याहीपुढे एक अब्जाहून अधिक लोकांकडे आज मोबाईल आहे. ह्या सेवा झपाट्याने वाढत आहेत. आधुनिक जीवनाला साजेशा उपभोग्य वस्तूंचे उत्पादन व खरेदी प्रचंड वाढली आहे. रामचंद्र गुहा म्हणतात त्याप्रमाणे, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात मध्यमवर्गावर गांधीप्रणित साधेपणाचा जबरदस्त पगडा होता. आपल्यासारख्या गरीब देशात खूप श्रीमंत असणे अभिप्रेतच नसायचे. १९९० च्या दशकात मात्र अर्थव्यवस्था खुली झाल्यावर उपभोगावर असलेले अपराधित्वाचे सावट झपाट्याने नष्ट झाले. आज ग्रामीण भाग आणि छोटी शहरे बेमालूमपणे एकमेकांत मिसळून गेली आहेत. उपभोक्तेपण केवळ शहरांची मिरासदारी उरली नाही. आजचा उपभोक्ता त्याची जीवनशैली व रूची ह्या गुणवत्तेत विभागला गेला आहे. प्रत्येक उत्पादनाच्या ब्रँडला महत्त्व आले आहे. कित्येकवेळा आपण आपल्या वस्तूवरचे लेबल दीर्घकाळ काढत नाही. प्रतिष्ठेच्या गोष्टी आणि सवयी बदललेल्या आहेत. मग ह्या वास्तवाचे केवळ पृष्ठस्तरीय वर्णन करून व केवळ उरबडवे आकार घडवण्यात आमचे ग्रामीण, दलित, प्रादेशिक साहित्य आज का धन्यता मानत आहे? हा प्रश्न विचारला पाहिजे.

आर्थिक वाढीचा दुसरा परिणाम म्हणजे दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण घटले, पण आजही जवळपास तीस कोटीहून अधिक लोक गरीब आहेत आणि ह्यातील बहुतांश लोक शहरात आहेत. झगमगणारे मॉल्स आणि भव्य कार्यालयांच्या वळचणीला ज्या झोपडपट्ट्या व गलिच्छ वस्त्या आहेत त्यात हे गरीब राहतात. महत्त्वाचे म्हणजे हेच लोक मध्यमवर्गाला सेवा पुरवतात पण ते मात्र कधीही मध्यमवर्गाचा भाग बनू शकणार नाहीत. ते वर्तमानपत्रे विकतात पण स्वत: वाचू शकत नाहीत. फॅन्सी कपडे शिवतात पण स्वत: घालू शकत नाहीत. गाड्या धुतात पण त्या त्यांच्या मालकीच्या असत नाहीत. कित्येकदा प्रकृतीला अपायकारक कामे करत मरून जातात. ग्रामीण भागातही बहुतांश गरीब आहेत. त्यांच्या शेतीबाबत काही धोरणात्मक निर्णय मोठ्या प्रमाणावर न घेता काही पिके बदलण्यासारखे नाठाळ प्रयोग राबवले गेले. स्थानिक व परदेशी बाजारपेठा पुढे आणल्या गेल्या पण त्यासंदर्भातील मूलभूत सोयीसुविधांना मात्र हरताळ फासला गेला. ह्याबाबतीत मराठी लेखक किती संवेदनशील आहे? तर तो केवळ फारतर भाबडा आहे आणि त्याला डोक्यावर घेणारी काही गंभीर नियतकालिकेही तितकीच भाबडी आहेत असे फार तर म्हणता येईल पण ह्या सर्व गोष्टींची सांस्कृतिक मीमांसा अधिक व्यापकपणे झाली पाहिजे.

सारांश, आपल्या आजच्या जगण्याचे, आपल्या अनेकविध व्यवहारांचे नीट भान आपल्याला यायचे असेल तर हा भारतीय परिप्रेक्ष्यातील कालखंड आणि जागतिकीकरणासारखी संकल्पना ह्या सर्वांचे आकलन अगोदर आपल्या विचारांच्या आराखड्यात आले पाहिजे. मानसिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, बौद्धिक, लोकसंख्याशास्त्रीय, राजकीय असे अनेक प्रकारचे संदर्भ आपण आपल्या आकलनाला पुरवले पाहिजेत. नव्वदोत्तर वैश्विक सांस्कृतिकतावादाचे राजकारण म्हणजे जागतिकीकरण, हे ध्यानात आले, की मग स्वाभाविकच इतर अनेकविध संदर्भ असलेल्या ह्या प्रक्रियेचे साहित्यक्षेत्रातही पडसाद उमटणे अत्यंत स्वाभाविक असते. पण जर ते पुरेशा प्रमाणात उमटत नसतील तर मात्र ती विकृती ठरायला हवी. नव्वदोतर महाराष्ट्रीय व भारतीय साहित्यव्यवहारात ही विकृती आहे. आताच्या कोणत्याही साहित्यप्रवाहाला आपली वैचारिक किंवा सामाजिक दिशाच अजून नीट गवसायची आहे. पण आज ती गवसल्याच्या अतिरेकीपणात आणि आभासात आपण स्वत:भोवतीच घिरट्या घालत आहोत. साहित्य-संस्कृती संबंधाच्या सृजनात आणि एकूणच प्रतिधुरिणत्वाच्या मांडणीत आपणच वाढवलेले अशा प्रकारचे कृतक पुरोगामित्व आता एकदाचे लक्षात घेतले पाहिजे.

**– डॉ. प्रभाकर देसाई**
भ्रमणध्वनी : ९८८१९०८०२०
prabhakardesai@unipune.ac.in

5G म्हणजे 5th Generation. मोबाईल फोन आणि त्यासंदर्भातील तंत्रज्ञानाची पाचवी पिढी. सतत काहीतरी वेगाने घडण्याच्या काळात आपण जगतो आहोत. पिढी दर पिढी तंत्रज्ञानाचे, मोबाईलचे चमत्कार अनुभवतो आहोत.

# 5G "व्हावे"!

डॉ. मोहन द्रविड

आतापर्यंत आपण फोनच्या चार पिढ्या पाहिल्या. फोनमध्ये सातत्याने सुधारणा होत असल्या तरी काही सुधारणा 'क्रांतिकारक' होत्या. आणि तेथे नवीन पिढी जन्माला आली असं म्हणण्याचा प्रघात तिसऱ्या पिढीपासून म्हणजे 3G पासून सुरू झाला. 1G आणि ही 2G नावं नंतर दिली गेली. एक पिढी साधारण ८-१० वर्षांची.

मोबाईल फोनसाठी तीन गोष्टींची आवश्यकता आहे. रेडिओलहरी, नेटवर्क आणि हँडसेट. रेडिओलहरींचे अस्तित्व मॅक्सवेल या शास्त्रज्ञाने गणिताच्या सहाय्याने १८६५ साली सिद्ध केले व प्रकाश हा रेडिओलहरींचाच एक प्रकार आहे हे दाखवले. हर्ट्झ या जर्मन शास्त्रज्ञाने प्रयोगशाळेत रेडिओलहरी निर्माण करून दाखवल्या (१८८८) तर मार्कोनीने रेडिओलहरीमार्फत संदेश पाठवता येतो हे दाखवले (१८९५). रेडिओलहरीमार्फत दुतर्फी संवाद साधणे ही गोष्ट लगेचच आली. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीची रणनीती पायदळ, रणगाडे आणि विमाने यांच्या एकत्र संयुक्त हल्ल्यावर अवलंबून असल्यामुळे त्या सर्वांमध्ये समन्वय असणे अत्यंत गरजेचे होते. त्याकरता संवाद साधण्यासाठी प्रत्येक रणगाड्यावर एक ट्रान्समीटर व रिसिव्हर बनवला जात असे.

इतर लहरींप्रमाणे (उदाहरणार्थ आवाज) रेडिओ लहरींची दोन लक्षणं म्हणजे उच्चनीचता (volume) आणि स्वर (pitch). स्वर लहरीच्या कंपनसंख्येमध्ये (frequency) मोजतात किंवा लहरीच्या लांबीमध्ये (wavelength) मोजतात. उदाहरणार्थ, मुंबई ब या रेडिओ स्टेशनच्या प्रक्षेपणाची कंपनसंख्या सेकंदाला ५५८ हजार (म्हणजे ५५८ किलो हर्ट्झ) आहे तर लहरीची लांबी ५४० मीटर आहे. या दोनपैकी एक गोष्ट कळली तर दुसरी गोष्ट काढता येते, कारण दोघांचा गुणाकार प्रकाशाच्या वेगाएवढा- म्हणजे सेकंदाला साधारण ३ लाख किलोमीटर असतो.

मुंबई आणि तत्सम AM प्रक्षेपणाच्या लहरी मध्यम लहरी (medium wave) मध्ये मोडतात. आपल्या रेडिओवर जी शॉर्ट वेव्ह स्टेशने असतात त्यांच्या लहरीच्या लांबी काही मीटरच असते, तर कंपनसंख्या काही मेगा (म्हणजे दशलक्ष) हर्ट्झ (MHz). यांना High frequency असेही संबोधले जाते. यापेक्षा जास्त frequency असलेल्या लहरी - VHF आणि UHF - टीव्ही आणि FM रेडिओ प्रक्षेपणास वापरतात. याहीपेक्षा अधिक गीगा (म्हणजे अब्ज) हर्ट्झ GHz च्या लहरी मायक्रोवेव्ह भट्टीत आणि वायरलेस संवादासाठी- उदा. कॉर्डलेस फोन, मोबाईल फोन, ब्लूटूथ, wi-fi - वापरल्या जातात.

लहरींची कंपनसंख्या जितकी जास्ती तितक्या जास्त प्रमाणात माहितीची देवाणघेवाण. माहिती पाठवायचा वेगही जास्त. एकाच वेळी ट्रान्समीटर अधिकाधिक रिसिव्हरशी संबंध ठेवू शकतो. पण प्रक्षेपणाचा पल्ला मात्र (Coverage Area) कमी होतो. दुसरा तोटा म्हणजे त्या लहरी भिंतीसारख्या लहानसहान अडचणींनी क्षीण होतात. शिवाय प्रक्षेपणाचा ओढा एका दिशेकडे (Unidirectional) असतो. त्यामुळे प्रक्षेपणसामुग्री अनेक पटीने वाढते.

मोबाईल फोनसाठी लागणारी दुसरी गोष्ट म्हणजे नेटवर्क. नेटवर्कमध्ये अनेक सेल साईट्स किंवा प्रक्षेपण-ग्रहण केंद्रे (tranceivers) दिलेल्या क्षेत्रात विखुरलेली असतात आणि एकमेकांना तांब्याच्या तारांनी (cable) किंवा optical fiber नी जोडलेली असतात. मोबाईल फोनशी असलेला साखळीतील शेवटचा दुवाच फक्त वायरलेस असतो. सन १९७०च्या दशकाच्या शेवटी जपानमधल्या NTT या कंपनीने पहिले नेटवर्क चालू केले. प्रक्षेपण आणि ग्रहण याकरता लागणारी मोबाईल फोनमधली साधनसामुग्री अर्थातच फार बोजड असायची. साधारण एका फ्रिझएवढ्या आकाराची आणि वजनाची. त्यामुळे या सर्व तंत्रज्ञानाचा उपयोग हातात राहू शकतील अशा वैयक्तिक मोबाईल फोनसाठी होणे अशक्यप्राय होते. (विनोदाने या तंत्रज्ञानाला शून्य G म्हणतात!)

आधुनिक मोबाईल फोनच्या कल्पनेला मोटरोला या अमेरिकन कंपनीतील मार्टिन कूपर या अभियंत्याने जन्म दिला. त्याच्या टीमने १९७३ साली कामाला सुरुवात केली. मोबाईल फोनची कल्पना समूर्त व्हायला तब्बल दहा वर्षे लागली. जवळजवळ १० कोटी डॉलर खर्च झाले. मोबाईल फोनच्या धंद्यात त्या काळात उत्पन्न अर्थातच नव्हते. तरी कंपनीने कळ सोसली. मोबाईल फोनच्या पहिल्या पिढीला (1G) इथे सुरुवात झाली.

मार्टिन कूपरचा पहिल्या हँडसेटचा आकार होता तब्बल दहा इंच बाय साडेसात इंच बाय अडीच इंच. वजन एखाद्या विटेसारखे चांगले सव्वा किलो. (त्या फोनला कुचेष्टेने 'वीटच' म्हणत.) त्याची बॅटरी चार्ज व्हायला दहा तास लागत आणि ती जेमतेम अर्धा तास टिके. आणि त्या काळच्या इतर (म्हणजे कॉर्डलेस) फोनप्रमाणे तो फोन analog होता. त्यामुळे त्यावर SMS (Texting)ची सोय नव्हती. माहिती प्रक्षेपणाचा वेग होता सेकंदाला जास्ती जास्त २.४ kbits (२.४ kbs). या गतीने दोन तासाचा चित्रपट

डाउनलोड करायला (जर करता आला असता तर) सात आठवडे लागले असते!

2G ची सुरुवात युरोपमध्ये-विशेषत: फिनलंडमध्ये-१९९२च्या सुमारास झाली. फिनलंडमधला नोकिआ ब्रँड हा अनेक वर्षे आघाडीवर होता. 2G चे तंत्रज्ञान डिजिटल होते. त्यामुळे SMS (लेखी निरोप) आणि MMS (चित्रे) पाठवण्याची सोय झाली. माहिती प्रक्षेपणाचा वेग होता सुरुवातीस ५०kbs. तो पुढे २००kbs पर्यंत - म्हणजे 1G च्या शंभरपट वाढला. त्यामुळे दूर अंतरावरचे फोन आणि कॉन्फरन्स कॉल्स करणेही शक्य झाले.

२००० नंतर जमाना आला 3G चा आणि स्मार्टफोनचा. यांची सुरुवात जपानमध्ये झाली. फोनवर इंटरनेट आले. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग चालू झाले. स्काइप २००३ साली सुरू झाले. वाहते चित्रपट (streaming video) आले. यूट्यूबचा उदय याच सुमारास सन २००५ मधला. माहिती प्रक्षेपणाचा वेग चालत्या वाहनात ३८०kbs तर एरवी १Mbsपर्यंत. फोनच्या क्षेत्रात क्रांती करणारा आय-फोन २००७ मध्ये प्रगट झाला. वायरलेस इंटरनेट (wifi) याच काळातले. इराकबरोबर झालेल्या दुसऱ्या युद्धात (२००३-१०) अमेरिकेन सैन्याने या तंत्रज्ञानाचा उपयोग केला.



प्रक्षेपणाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला तो 4G मध्ये. आता आला Apps चा जमाना. 4G ची सुरुवात दक्षिण कोरियात २००९-१०च्या सुमारास झाली. दक्षिण कोरियाच्याच सॅमसंगने गॅलक्सी सीरीज चालू करून फोनच्या बाजारात धडक मारली. हल्ली लोकप्रिय असलेली अँडरॉइड ही प्रणाली जरी २००७ मध्ये निघाली असली तरी ती आताशा परिपक्व होत होती. ती वापरण्यात सॅमसंगने पुढाकार घेतला. 4G मध्ये सुधारणा होऊन आजमितीस प्रक्षेपणाचा वेग १००Mbs पर्यंत पोचला आहे. २०१८पर्यंत wifi ने सुद्धा १००Mbs पर्यंत मजल मारली. 4G मध्ये फोनने इंटरनेटबरोबर दुतर्फा संपर्क साधता येतोच पण शिवाय गाडी (car), फ्रिजसारख्या इतर वस्तूंशी दुतर्फा संपर्क साधता येतो.

यातूनच Internet of Things (IoT) या कल्पनेचा उगम झाला. या कल्पनेचा विकास आणि 5G यांचा घनिष्ट संबंध आहे. आणि 5G व 'व्हावे' (Huawei) या चिनी कंपनी यांचा घनिष्ट संबंध आहे. 5G हे 4G च्या जवळजवळ १०० पट वेगवान आहे. २ तासाचा चित्रपट डाउनलोड करायला 3G मध्ये २६ तास लागतात, तर 4G मध्ये ६ मिनिटे आणि 5G मध्ये अवघे ३.६ सेकंद! पाठवलेला सिग्नल आणि त्यावर होणारी प्रतिक्रिया यामधील वेळ (Latency time) काही मिलिसेकंद, म्हणजे एक हजारांश सेकंद असेल. (माणसामध्ये ही वेळ साधारण १/१० सेकंद असते.) स्वयंचलित गाड्या त्याचप्रमाणे AR (Augmented Reality) Glasses, VR (Virtual Reality) Headsets यांची स्वप्ने अत्यंत कमी अशा Latency time मुळे साकार होणार आहेत.

5G कंपनसंख्येच्या दोन श्रेणीमध्ये येणार आहे. एक २.४ GHz च्या खाली. ही 4G च्या जवळपास असल्याने वेळ पडली तर 4G आणि 5G यांची अदलाबदल करता येईल. आणि दुसरी ३६ GHz च्या वरती. दुसऱ्या श्रेणीस मिलिमीटर लहरी असेही म्हणतात आणि प्रक्षेपणाचा वेग त्यात जास्त राहणार असून त्याची उभारणीही अधिक गुंतागुंतीची असणार आहे. सध्या 5G च्या प्रकल्पाच्या स्पर्धेत आहेत अमेरिकेतील AT&T सारख्या कॅरिअर कंपन्या, दक्षिण कोरियातील SK सारख्या कॅरिअर कंपन्या. त्यांचा भर आहे नेटवर्क बांधणीवर. नोकिआ, एरिक्सन, सॅमसंग या कंपन्या आहेत फोन तयार करण्यामागे. (सॅमसंगचा गॅलक्सी १० हा 5Gशी सुसंगत आहे असं कंपनीचं म्हणणं आहे.) पण सध्या फॉर्मात आणि प्रकाशझोतात असलेली कंपनी म्हणजे चीनची 'व्हावे' (Huawei).

ही कुठली कंपनी जिचे नाव दोन वर्षांपूर्वी कुणास ठाऊक नव्हते आणि आज ते सर्वमुखी आहे? व्हावे नेटवर्किंगची सामुग्री तर बनवतेच पण फोनही बनवते. गेल्या दशकात फोनच्या उत्पादनात तिने २०१० साली ३० लाखापासून २०१८ साली २०.६ कोटी अशी मोठी मुसंडी मारलेली आहे. (आयफोन आणि सॅमसंग यांचे २०१८ सालचे उत्पादन अनुक्रमे २०.८ आणि २९.२ कोटी.) तिचे 5G चे फोन आणि नेटवर्किंग सामुग्री तयार आहे आणि २०२० मध्ये सर्व यंत्रणा चालू होईल. हे सर्व या कंपनीला शक्य कसे झाले?

इथे भारत देशाला शिकण्यासारखे भरपूर आहे. व्हावेच्या १,८८,००० कर्मचाऱ्यांपैकी ७५,००० संशोधनात (R&D) आहेत. संशोधनावरचा त्यांचा आहे खर्च वर्षाला १५.३ अब्ज डॉलर्स. (तुलनेसाठी : मायक्रोसॉफ्ट १४.७ अब्ज डॉलर्स, इंटेल १३.५ अब्ज डॉलर्स) आणि चीनमध्ये १ डॉलर खर्च म्हणजे अमेरिकेत ५ डॉलर खर्च करण्यासारखे आहे. चीन अमेरिकेचे तंत्रज्ञान पळवतो हा अमेरिकेचा लाडका आरोप असतो. मग आता 5G आम्ही कुणाकडून चोरली असा चीनचा प्रश्न आहे. रशिया आणि ५० इतर देशांनी व्हावेबरोबर कॉंट्रॅक्ट केले आहे. अमेरिकेने मात्र व्हावेवर बंदी घातली आहे आणि आपल्या मित्र राष्ट्रांनासुद्धा बंदी घालायचे आवाहन केले आहे.

अमेरिकेतल्याच काही तज्ज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे व्हावेला सोडून 5G अंमलात आणायचे असेल तर २०२५ साल उजाडेल. तोपर्यंत रशिया आणि उत्तर कोरियासारखी शत्रू राष्ट्रे तंत्रज्ञानात

अधिक प्रगत होतील आणि चीन 6G सुद्धा चालू करेल! तेव्हा मित्र राष्ट्रांची 'करू की नको' अशी हॅमेलटसारखी द्विधा परिस्थिती झाली आहे. ऑस्ट्रेलिया, जपान वगैरे राष्ट्रांनी व्हावेबरोबर केलेले करार रद्द करून अमेरिकेच्या बाजूने राहायचे ठरवले आहे. असाच निर्णय इतर प्रगत राष्ट्रांनी घेतला तर ते चीनला भारी पडणार आहे.

सध्या चीनची कॅनडाबरोबर मारामारी जुंपली आहे. चीनचे इराणबरोबर व्यापारी संबंध आहेत हा अमेरिकेच्या दृष्टीने गुन्हा आहे या कारणास्तव कॅनडाने व्हावेच्या सीएफओ (CFO) श्रीमती मेंग यांना अटकेत ठेवले आहे. तेव्हा भडकून चीनने कॅनडातून आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर बंदी घातली आहे. त्यामुळे कॅनडाही मोठ्या खड्ड्यात पडला आहे. 'ब्रेक्सिट' भोवऱ्यात सापडलेल्या ब्रिटनचा अमेरिकेच्या बंदीमुळे अधिकच गोंधळ उडाला आहे. मे यांच्या राजीनाम्यानंतर आधीच अनेक आठवडे पंतप्रधानाचा पत्ता नव्हता. आता आलेला जॉन्सन बदनाम झालेला माणूस आहे. व्हावेवरच्या बंदीमध्ये आपण भाग घेऊ नये असा दबाव व्होडाफोनसारख्या कंपन्या सरकारवर आणत आहेत. त्यांनी नुकतीच व्हावेच्या मदतीने 5G त मोठी गुंतवणूक केली आहे. या सर्व वादावादीत ब्रिटनच्या संरक्षणमंत्र्याचा बळी गेला आहे. नुकत्याच व्हावे संदर्भात झालेल्या युरोपियन युनियन (EU) च्या बैठकीत इतर देशांनी ब्रिटनला हाकलून लावले.

खुद्द अमेरिकेतल्या अनेक कंपन्या व्हावेवरील बंदीने हैराण झाल्या आहेत. मुख्य म्हणजे बंदीचे सयुक्तिक कारण दिले जात नाही. ''देशाच्या सुरक्षेला धोका संभवतो'', हे कारण अस्पष्ट आहे. अमेरिकेने जेव्हा 4G तंत्रज्ञान जगाला दिले तेव्हा कसा सुरक्षेचा प्रश्न आला नाही? खुद्द व्हावेने अनेक देशांना 4G तंत्रज्ञानावर आधारीत साधनसामुग्री दिलेली आहे. त्यांनाही हा सुरक्षेचा बागुलबुवा अजिबात पटत नाही. रेडिओलहरी विद्युतचुंबकीय असल्याने 5Gमधील चुंबकीय लहरी प्रकृतीला धोक्याच्या आहोत असाही अपप्रचार चालू आहे. वास्तविक रेडिओ लहरीतील विद्युत आणि चुंबकीय भाग वेगळे होऊ शकत नाहीत. प्रकाशाचा चुंबकावर किंवा चुंबकाचा प्रकाशावर परिणाम होत नाही, हे सर्वश्रुत आहे.

नुकतेच चीनने अंतराळात आतापर्यंत कुणालाही जमलेले नाही असे अचाट कृत्य करून दाखवले आहे ते म्हणजे चंद्राच्या नेहमी अदृश्य असलेल्या पृष्ठभागावर यान उतरवले. चीनचे म्हणणे चीन किंवा एक बिगरगोरा देश-पाश्चिमात्य देशांच्यापुढे चालला आहे हे अमेरिकेला बघवत नाही. वेळप्रसंगी आपणही इंटेल, ॲपल या कंपन्यांवर बंदी घालू अशी नुसतीच धमकी चीनने दिली आहे असे नाही तर रशियामध्ये मोठे तंत्रज्ञान केंद्र बांधायला घेतलं आहे. जगातले १/३ आयफोन चीनमध्ये खपतात हे लक्षात घेतलं म्हणजे या बंदीचा ॲपलवर आणि अमेरिकेच्या एकूण अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होईल यात शंकाच नाही.

एकूण 5G चा जन्म वादळी ठरणार असे दिसते आहे.

**– मोहन द्रविड**
भ्रमणध्वनी : ९८२०५६३१३०
mohan.drawid@gmail.com

**मन:पूर्वक**




**डॉ. वसुधा सरदेसाई**

मनातील भावभावनांशी हितगुज करणारी ही कविता 'मन:पूर्वकते'ने रसिकांसमोर येत आहे.

**– सौ. शैलजा देशमुख**

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

ग्रंथाली

**व्हाईट लिली**




**जितेंद्र कुवर**

सहज ओघवत्या शैलीत लिहिलेल्या ह्या प्रेमकविता आहेत. वास्तवापासून दूर असल्या तरी त्या एका वेगळ्याच दुनियेत घेऊन जातात.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

**फक्त सैल झालाय दोर**



**पद्मरेखा धनकर**

कवीचा भवताल कवितेत येतो तो जसाच्या तसा येत नाही. पद्मरेखा धनकर यांच्या कवितेत हा भवताल आलेला आहे.

**– वसंत आबाजी डहाके**

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

> ‘मार्टीयरडम टू फ्रिडम’ या राजेश रामचंद्रन यांच्या इंग्रजीतील पुस्तकाने जालियनवाला बाग हत्याकांडाचे अनेक संदर्भ जागे केले आहेत.

# मार्टीयरडम टू फ्रिडम

**गणेश कुलकर्णी**


**जा**लियनवाला बाग हत्याकांडावर प्रकाश टाकणारे एक वेगळेच पुस्तक प्रकाशित झाले आहे त्याचे नाव Martyrdom to Freedom (100 years of Jalianwala Bagh) त्या घटनेच्या आगेमागे घडलेल्या त्या घटना, त्या काळातला वार्तापत्रांचा धांडोळा आणि काही अभ्यासू लेख असे या पुस्तकाचे एकंदर स्वरुप आहे. अर्थात त्या काळात ट्रिब्युन वृत्तपत्राने फारच ठाम भूमिका घेतली होती. त्यातले निवडक लेख या पुस्तकात आहेत.

१९१८ साली नुकतेच पहिले महायुद्ध संपले होते. १० मार्च १९१९ ला काळा कायदा (‘रौलेक्ट अॅक्ट’) लष्करी कायदा पारीत केला गेला. या अंतर्गत पोलीस आणि लष्कराला अमर्याद अधिकार प्राप्त झाले. कुणालाही विना चौकशी अटक, तुरुंगात टाकणे, शिक्षा करणे, चाबकाने फटके मारणे अशा अनेक अमानुष शिक्षा सरसकट दिल्या जात होत्या. हा कायदा इतका कठोर होता की, आपल्या अनेक नेत्यांना भारतीयांवरचा अत्याचार सहन होत नव्हता. या सगळ्याचा प्रतिकार कसा करावा हा विचार करताना महात्मा गांधींनी ६ एप्रिलला हरताळ जाहीर केला. याचे लोण थोड्याच दिवसात सगळीकडे पसरले. या दरम्यान जनरल ओडवायरच्या हाताखाली पंजाब प्रांत होता. या कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी त्याने डायरला बोलावले. या हरताळाच्या दरम्यान अचानक हिंसाचार उसळला. तीन-चार पोलिसांचा खून झाला. एका इंग्रजी मिशनरीला मारण्यात आले. यामुळे गव्हर्नर ओडवायरने पंजाबची सगळी सूत्रे क्रूरकर्मा जनरल डायरकडे सोपवली. डायरने अमृतसरला अक्षरश: छावणीचे स्वरुप आणले. प्रचंड अत्याचार सुरू झाले. अमृतसरच्या मुख्य रस्त्यावरून रांगत जाण्याचे आदेश सर्वांना देण्यात आले. यात कसूर झाली तर चाबकाचे फटके मारण्याची शिक्षा दिली जायची. या हिंसाचाराचा स्वत: महात्मा गांधीनीही निषेध केला होता. अमृतसरमध्ये जमाव बंदी लादली गेली. दरम्यान पंजाबी लोकांचा बैसाखी सण जवळ आला. या दिवशी काही क्रांतिकारकांनी जालियनवाला बागेत जमायचे ठरवले. अमृतसरला गुरुद्वाराच्या बाजूलाच ही बाग आहे. बैसाखीच्या दिवशी अनेक साधी माणसं देखील आपल्या परिवाराबरोबर गुरुद्वाराला श्रद्धेने भेट देऊन या बागेत फिरत होती. डायरने आपली गुरखा आणि पठाणांची फौज जालियनवाला बागेच्या गेटवर नेऊन उभी केली. डायर स्वत: जन्माने पंजाबीच होता. त्यामुळे त्याला पंजाबची खडान्खडा माहिती होती. बागेला चारी बाजूंनी भिंत आणि एकच चिंचोळे प्रवेशद्वार होते. त्या दरवाजावरच डायरने एक तोफ ठेवली आणि नि:शस्त्र / निष्पाप लोकांवर बेछूट गोळीबार करण्याचा आदेश दिला. १६५० गोळ्यांच्या फैरी झाडण्यात आल्या. तब्बल ४०० माणसं जागीच मेली तर बाराशेच्या वर जखमी झाली. उद्दाम डायर चौकशी दरम्यान असेही म्हणाला की माझ्या जवळचा दारुगोळा संपला म्हणूनच मी थांबलो.

या सगळ्याची बातमी दोन तीन महिने पंजाबच्या बाहेर सुद्धा गेली नव्हती. सप्टेंबरनंतर हळूहळू ही बातमी पसरत गेली. कठोर अशी आणीबाणी वृत्तपत्रांवर, विचार स्वातंत्र्यावर लादली गेली होती. क्रांतिकारकांशी नुसत्या संबंध असल्याच्या संशयावरून देखील घरांचे पाणी व वीज तोडण्यात येते होते. त्यावेळी ’ट्रिब्युन’ या वृत्तपत्राने क्रांतिकारकांचा आवाज बनून सातत्याने त्यांची बाजू प्रामाणिकपणे सगळ्या जगासमोर आणण्याचा प्रयत्न केला होता. या कारणाने संपादक ‘कालीनाथ रे’ यांना इंग्रजांनी अटक केली व तुरुंगात धाडले, तरीही या वृत्तपत्रातून सातत्याने या हिंसेच्या चौकशीची मागणी लावून धरण्यात आली. महात्माजींपासून सगळ्यांनीच रेंच्या अटकेचा जाहीर निषेध केला. महात्माजी स्वत: पंजाबला भेट द्यायला निघाले. पण ब्रिटिशांनी त्यांना पंजाबला जाण्याची बंदी घातली. नंतर काही महिन्यांनी महात्माजी सरळ लाहोरला टागोरांच्या बहिणीकडे उतरले. तिथून ते अमृतसरला रवाना झाले. (लाहोरमधील सरलादेवींच्या सहवासाबद्दल खूप छान लेख स्वत: महात्माजींनीच लिहिले आहेत!) असे म्हणतात की, महात्माजींनी जेव्हा अमृतसर स्टेशनवर पाय ठेवला तेव्हा त्यांना भेटायला इतक्या माणसांची गर्दी झाली होती की गांधीजींना आपल्या कारपर्यंत पोहचायला तब्बल ४० मिनिटे लागली होती.

ट्रिब्युनचा धोशा आणि सर्व नेत्यांचा आग्रह म्हणून या हत्याकांडाची चौकशी करायला स्कॉटीश न्यायाधीश हंटर यांची नेमणूक करण्यात आली. त्याचा रोजचा वृत्तांत ट्रिब्युनमध्ये छापून येऊ लागला. लोकांच्या मनात इंग्रजांबद्दल वाढत चाललेला असंतोष बघून महात्माजींनी आपल्या तऱ्हेने या सगळ्याला एक विधायक वळण लावून भारतीय स्वातंत्र्य चळवळ व्यक्तीकडून

समष्टीकडे नेण्यात यश मिळवले. या घटनेनंतर महात्माजींचे नेतृत्व अखिल भारतीय पातळीवर स्विकारले गेले. जालियनवाला बाग हत्याकांडानंतर म हात्माजींनी मृत पावलेल्या लोकांचे स्मारक बनवण्याची अभिनव कल्पना मांडली व यासाठी देशभर फिरून वर्गणी गोळा केली. त्यावेळी कुठलेही संपर्काचे माध्यम सहज उपलब्ध नसताना स्वत: देश पालथा घालून लोकांना या उपक्रमाशी जोडून घेण्याचे अभूतपूर्व काम महात्माजींनी केले, स्वातंत्र्यचळवळ लोकाभिमुख केली. सर्वांच्या सहभागाने आपण देश स्वतंत्र करू शकतो ही भावना, हिंमत प्रत्येक भारतीयाच्या मनात रुजवली. 'गांधीपर्व' मध्ये गोविंदराव तळवळकर म्हणतात की जालियनवाला बागेच्या चौकशीचे प्रमुख मोतीलालजींनी खूपच आक्रमक पद्धतीने लिहिलेला रिपोर्ट महात्म ाजींनी नाकारला आणि ती भाषा सौम्य करायला लावली. याच सौम्य भाषेतल्या रिपोर्टने इंग्लिश पार्लमेंट हादरले होते. या अहवालाच्या भाषेबद्दल सुरुवातीला सगळे रागावले पण गांधीजी मात्र ठाम होते. द. ना. गोखले आपल्या गांधी पुस्तकात लिहितात की, महात्मा गांधी सुरवातीला तसे फार अभ्यासू, हुशार नव्हते. म्हणजे पहिल्यांदा जेव्हा ते राजकोटहून लंडनला निघाले तेव्हा स्वत:च्या भाषते वाक्य तयार करून नंतर त्याचा अनुवाद इंग्रजीत करायचे पण नंतर त्यांची प्रतिभा फुलत गेली. त्यांनी काढलेला १९१७ सालातला दक्षिण आफ्रिकेतला लाँग मार्च, १९१९ सालचा अखिल भारतीय हरताळ, १९३० सालची दांडी यात्रा आणि १९४२ सालची चलेजाव चळवळ, 'करेंगे या मरेंगे' हा दिलेला नारा त्यांच्या प्रतिभेची वेगळीच साक्ष पटवतात. त्यांच्यावर टिका करणाऱ्यांमध्ये अनेक जण होते. अगदी चर्चिल देखील! दक्षिण आफ्रिकेचा गव्हर्नर जनरल – स्मट्स यांना चर्चिल एकदा म्हणाले होते की, तुमच्या तुरुंगात असतानाच तुम्ही या माणसाचा निकाल लावला असता तर आपले साम्राज्य जगावर आणखी काही काळ टिकले असते. सुरेश द्वादशीवार 'आपले गांधीजी आणि त्यांचे टिकाकार' या पुस्तकात गांधीजींचा साक्षेपी वेध घेताना म्हणतात की, गांधी लोकांमध्ये आजही रुजला आहे, जिवंत आहे कारण सतत बदलत राहणे म्हणजेच गांधी विचार. गांधी स्वत:ला कुठल्याही 'इजम'मध्ये बांधून घेत नाहीत. ते आयुष्यभर आपल्या चुकांमधूनही शिकत राहिले, सतत बदलत राहिले त्यामुळे त्यांचे जीवन अखेरपर्यंत लोकांना गूढच वाटले. कुठल्यातरी एका भूमिकेत हे व्यक्तिमत्त्व सामावले जाणे म्हणजे तो गांधींचा, त्यांच्या विचारांचा ढळढळीत अपमानच आहे. एकट्या गांधींवर आजतागायत एक लाखाहून अधिक पुस्तके लिहिली गेली आहेत. जगातल्या सहाशेहून अधिक विद्यापीठात गांधी आणि गांधी




विचार आजही शिकवला जातो. (सुदेश द्वादशीवार यांच्या या पुस्तकाला नुकताच मॅजेस्टिकचा कोठावळे पुरस्कार मिळाला आहे!) डी. जी. तेंडुलकरांनी 'महात्मा' या नावाने ८ खंडात अगदी साक्षेपी असे त्यांचे चरित्र लिहिले आहे. हे आठ खंड अस्मदिकांनी साबरमतीच्या आश्रमातून विकत आणले तिथे त्याची शेवटची आवृत्तीच शिल्लक होती. हे डी. जी. तेंडुलकर रत्नागिरीचे! खूपच साधे होते. या चरित्राचे वैशिष्ट्य म्हणजे स्वत: महात्माजींनी याची प्रुफे नजरेखालून घातली होती आणि पं. जवाहरलाल नेहरूंनी स्वत: या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे. एखाद्या जिवंत माणसाचे तेही गांधीजींसारख्या महात्म्याचे चरित्र शब्दबद्ध करणे खूप जिकिरीचे आणि कष्टाचे काम होते. पण जेव्हा चरित्र छापून आले तेव्हा भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद डी. जी. तेंडुलकरांना भारावून म्हणाले, 'तुम्हाला सरकारतर्फे पद्मश्री देऊन तुमचा सत्कार करूया.' तेव्हा तेंडुलकर नम्रपणे इतकेच म्हणाले की मला यापेक्षा खिशात ठेवायचे घड्याळ देता आले तर बघा, माझ्याकडचे घड्याळ बिघडले आहे. इतका साधेपणा गांधीजींच्या सहवासातल्या इतरांकडे देखील होता आणि हाच गांधींचा प्रभाव जगभर अनेकांनी मान्य केला आहे. तर अशा गांधींचे नेतृत्व जालियनवाला बागेच्या हत्याकांडाने भारतीय राजकारणाच्या पृष्ठभागावर आणले.

'ट्रिब्युन'च्या या लेखांनी अशा अनेक पुस्तकातल्या गांधींची सहज आठवण करून दिली. या पुस्तकात रामचंद्र गुहा, सध्याचे संपादक राजेश रामचंद्रनपासून अनेकांचे लेख आहेतच, सोबत त्या काळातल्या ट्रिब्युनमध्ये आलेल्या खटल्याची बातमी देणारी वार्तापत्रे देखील आहेत. शंभर वषापूर्वी क्रांतिकारकांच्या वतीने बोलणारी, त्यांचा आवाज मांडणारी वृत्तपत्रे कमीच होती. त्यात ट्रिब्युनचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. असे म्हणतात की नंतरच्या पिढीत त्यांच्या अगोदरच्या पिढीत झालेल्या क्रांतिकारकांचे फोटो देखील नव्हते. कारण फोटो काढून घरात ठेवणे हे घरात बॉम्ब ठेवल्यासारखेच होते. खूप वर्षांपूर्वी बहुतेक साहित्य अकादमीने 'फाँसी अंक' म्हणून एक अंक प्रकाशित केला होता. त्यात फाशी गेलेल्या क्रांतिकारकांची थोडक्यात माहिती आणि मिळाल्यास त्याचा फोटो असे त्या अंकाचे स्वरुप होते. त्याही अंकाची या पुस्तकाने आठवण करून दिली.

**– गणेश मनोहर कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९८१९९५७८५२
magnakul@rediffmail.co

भारतीय कुटुंबव्यवस्थेतील पुरुषांचे प्रतिनिधित्व करणारा ‘कुम्बलंगी नाईट्स’ हा मल्याळम चित्रपट आदर्श नायकांच्या प्रतिमेला छेद देतो.

# कुम्बलंगी नाईट्स

## आधुनिक काळातील पुरुषसुक्त

संतोष पाठारे

**‘म**र्द को दर्द नही होता’ अशी एक आदर्श नायकाची प्रतिमा आपल्या व्यावसायिक चित्रपटांनी रुढ केलेली आहे. नायक हा मदनाचा पुतळा, सद्‌गुणी, सद्वर्तनी, दुर्बलांचा उद्धारकर्ता, नायिकेचं संकटातून रक्षण करणारा व दुष्टांच निर्दालन करणारा पराक्रमी पुरुष! चित्रपटातून प्रस्थापित झालेल्या पुरुष प्रतिमेला छेद देण्याचं काम मधु सी. नारायण याचा ‘कुम्बलंगी नाईट्स’ हा मल्याळम चित्रपट करतो. या चित्रपटातील पुरुष पात्रे मानवी स्वभावधर्माचे अस्सल नमुने आहेत. एकमेकांच्या उरावर बसणारे, हिंस्त्र होणारे हे पुरुष प्रसंगी हळुवार होतात, आपल्याला रडता येत नाही म्हणून हवालदिलही होतात. परंपरेनं लादलेल्या पुरुषी जबाबदाऱ्या सांभाळताना होणारी कुतरओढ सहन करतात व प्रिय व्यक्तीसाठी प्राणाची बाजीसुद्धा लावतात.

केरळमधील कुम्बलंगी बेटावर राहणाऱ्या साजी (शोबीन शाहीर), बॉबी (शेन निगम), बोनी (श्रीनाथ भासी) आणि फ्रँकी (मॅथ्यू थॉमस) या चार भावांची ही गोष्ट आहे. साजीच्या वडिलांनी बोनीच्या आईबरोबर लग्न केल्यानंतर बॉबी आणि फ्रँकीचा जन्म झालायं. नात्याने ते एकमेकांचे सावत्र भाऊ, मात्र वडिलांच्या निधनानंतर आईने स्वच्छेने एका आश्रमात सेवा करण्यासाठी गेल्यामुळे साजीला धाकट्या भावंडांचा सांभाळ करावा लागतोय. साजीने वयाची पस्तीशी ओलांडली आहे पण मासेमारी करून येणारं तुटपुंज उत्पन्न आणि घरात असलेली तीन अतरंगी भावंड यामुळे त्याने लग्नाचा विचारच केलेला नाही. बॉबीशी तर त्याचं अजिबातच पटत नाहीय. छोट्या छोट्या कारणावरून दोघांमध्ये गुद्दागुद्दी होतेय. बोनी मुका आहे व तो स्वतंत्रपणे एक म्युझिक क्लब चालवतोय. तेव्हा भावांमधील भांडण असहाय्यपणे बघण्याशिवाय त्याला पर्याय उरत नाही. कुम्बलंगी बेटावर येणाऱ्या पर्यटकांना माहिती देण्याचं काम करणाऱ्या बेबी (अँना बेन) वर बॉबी प्रेम करु लागतो. बेबीचा तिरसट मेहुणा शम्मीला (फहाद फासिल) बेबीचे बॉबी बरोबर असलेले प्रेमसंबंध मान्य नसतात. मासेमारी करणाऱ्या कनिष्ठ वर्गातील मुलाशी बेबीने लग्न करावं याचा त्याला विरोध असतो. बॉबीला आपल्या आई व मोठ्या भावाने शम्मीकडे जाऊन लग्नाची रितसर बोलणी करावी असं वाटत असतं. त्याची आई यासाठी नकार देते. बॉबीचं शुभमंगल लावण्याची जबाबदारी साजीवर येऊन पडते. साजी बॉबीच्या आनंदासाठी ही जबाबदारी घ्यायला तयार होतो मात्र शम्मी त्यांचे मनसुबे आपल्या कपट कारस्थानांनी उधळून लावतो. विक्षिप्त स्वभावाच्या शम्मीशी चारही भावंड सामना करतात व बेबीला आपल्या घरी सून बनवून आणतात.

‘कुम्बलंगी नाईट्स’चं हे कथासूत्र एकरेषीय आणि परिचित वळणाचं असलं तरीही त्यातील खरी गंमत दिग्दर्शकाने केलेल्या हाताळणीत आहे. पटकथाकार शाम पुष्करने व्यक्तिरेखा लिहिताना त्यांचा आलेख आरंभापासून शेवटापर्यंत चढता ठेवला आहे. प्रत्येक व्यक्तिरेखेला असलेले कंगोरे त्याने दृश्यांमधून खुलवले आहेत. पुरुषी स्वभावाचे वैविध्यपूर्ण नमुने हे कुम्बलंगी नाईट्सचे मुख्य वैशिष्ट्य आहे.


साजी हा सर्वात मोठा भाऊ, अघळपघळ वागणारा, घरात अस्ताव्यस्त पसरणारा आणि क्षुल्लक कारणावरून लहान भावंडाशी भांडणारा! फ्रँकीवर हात उचलल्याची शिक्षा म्हणून बोनी त्याला झोडपून काढतो, आपली भावंडे आपल्याला समजून घेत नाहीत याची त्याला खंत आहे व त्या निराशेपोटी दारुच्या नशेत असताना तो आत्महत्येचा प्रयत्न करतो. त्याला वाचवताना त्याच्या मित्राचा, विजयचा हकनाक बळी जातो. विजयच्या अपघाती मृत्यूनंतर त्याच्या बायकोची व नवजात बाळाची जबाबदारी तो स्वीकारतो. बॉबीसाठी शम्मीकडे मनधरणी करतो. साजीच्या व्यक्तिरेखेत असलेली कुटुंबप्रमुखाची सगळी लक्षणं आपल्या देहबोलीतून शोबीन शाहीर या अभिनेत्याने कमाल दाखवली आहेत. शोबीन शाहिर हा मल्याळम चित्रपटसृष्टीतील सध्याचा आघाडीचा दिग्दर्शक व अभिनेता आहे. दुसऱ्या दिग्दर्शकांच्या हाताखाली तो तेवढ्याच उत्स्फूर्तपणे अभिनय करतो. गेल्यावर्षी प्रदर्शित झालेल्या झकारिया दिग्दर्शित सुदानी फ्रॉम नायजेरियातील अविस्मरणीय भूमिकेनंतर त्याची दखल घ्यावी अशी ही दुसरी भूमिका आहे. ज्यांच्यासाठी आपण आयुष्यभर खस्ता खाल्ल्या ती भावंडं आपल्याला समजून घेत नाहीत याची बोच साजीचं मन खात असते. ज्याच्याजवळ मन मोकळं करावं असा मित्र विजय ही मृत्यू पावलेला असतो. आपण रडलो नाही तर वेडे होऊ याची जाणीव होऊन तो मानसोपचार तज्ञाकडे जातो. मनातील गोष्टी बोलून ढसाढसा रडतो. अहोरात्र मेहनत करून कुटुंबाची जबाबदारी पेलणाऱ्या, मनातील दुःख

मनातच ठेवणाऱ्या तमाम भारतीय पुरुषाचं प्रतिनिधीत्व साजीची व्यक्तिरेखा करते.

बोनी आणि फ्रँकी ही या कुटुंबातील शेंडेफळ आहेत. फ्रँकी सर्वात लहान असल्यामुळे त्याला स्वतःच मत व्यक्त करण्याचाही अधिकार नाही. बोनीला भाषेतून व्यक्त होता येत नाही मात्र तो आपल्या रासवट कृतीतून आपल्या भावना व्यक्त करतो. फ्रँकीवरील प्रेम आणि साजीवरील राग, या दोन्ही भावनांचं प्रदर्शन तो आक्रस्ताळेपणे करतो. घरात भावंडानी मांडलेल्या उच्छादाला कंटाळून तो घरापासून दूर राहणे पसंत करतो व नायला या परदेशी पर्यटक तरुणीमध्ये गुंतत जातो.

बॉबी हा स्वप्नाळू आहे. बेबीच्या प्रेमाला तो प्रतिसाद देतो. परंतु प्रियकरापेक्षाही त्याच्यातील पुरुष प्रबळ आहे. सिनेमागृहातील एकांतात त्याला बेबीला किस करायचं आहे पण पहिल्याच भेटीत बॉबीच्या या मागणीला ती नकार देते. बॉबी हा नकार पचवू शकत नाही. प्रेयसीने अशा प्रकारे नकार देणं त्याच्यातील पुरुषी अहंकाराला आव्हान दिल्यासारखं वाटतं. तो तिला सोडून निघून जातो. आपलं असं वागणं प्रगल्भ नसल्याचं लक्षण आहे याची त्याला जाणीव आहे मात्र त्या क्षणापुरता का होईना त्याच्यातील पुरुष प्रगल्भतेवर मात करतो. बेबीशी लग्न करण्यासाठी त्याला वडिलधाऱ्या मंडळीचा होकार हवाय. त्यासाठी तो दुरावलेल्या आई व साजीशी समझोता करायला तयार होतो. मासेमारी सोडून कारखान्यात नोकरी सुद्धा पत्करतो.

साजी, बॉबी, बोनी व फ्रँकी हे भाऊ भारतीय कुटुंबव्यवस्थेत असलेल्या सर्वसामान्य पुरुषाचं प्रतिनिधित्व करतात. त्याच्या आशा आकांक्षांचं, त्यांनी पत्करलेल्या जबाबदाऱ्यांचं चित्रण 'कुम्बलंगी नाईट्स'मध्ये येतं. या पुरुषांच्या स्वभावधर्माच्या विपरीत असलेल्या पुरुषाचं चित्रण शम्मीच्या व्यक्तिरेखांतून दिग्दर्शक घडवतो.




शम्मीचं पात्र चित्रपटात सर्वप्रथम दिसतं ते, तो स्वतःला आरशात निरखत असताना! स्वतःच्या देखण्या रुपाचा, गोऱ्या रंगाचा, झुपकेदार मिशिचा असलेला गर्व त्याच्या चेहऱ्यावरून दिसतो. आरशाला बायकोने चित्रटवून ठेवलेली लाल टिकली तो काढतो व बेसिनमध्ये टाकून देतो. त्याच्यातील पुरुषी वर्चस्वाची घमेंड या एका दृश्यातून पूरेपुर व्यक्त होते. शम्मी या पात्राची विकृत मानसिकता फहाद फासिल त्याच्या अभिनय कौशल्याने जिवंत करतो. अभिनयासाठी राष्ट्रीय पुरस्कार पटकवणारा फहाद फासिल जी भूमिका स्वीकारतो त्या भूमिकेचं सोन करतो. 'थोंडिमुत्तलम'मधील चोर असो की 'टेक ऑफ'मधील राजदूत, त्याच्या भूमिकेतील वैविध्य चकित करणारं आहे. शम्मीची भूमिका ही त्याच्यातील चतुरस्त्रपणाची ग्वाही देते. या चित्रपटाच्या निर्मितीत त्याचा व त्याची पत्नी नझारिया नजीमचाही सहभाग आहे.

अनेक वर्ष सहाय्यक दिग्दर्शन करणाऱ्या मधु सी. नारायणने 'कुम्बलंगी नाईट्स' दिग्दर्शित करण्याआधी त्या बेटावर राहून तिथल्या माणसांच्या जीवनशैलीचा अभ्यास केला, याचा प्रत्यय या चित्रपटाच्या प्रत्येक दृश्यातून येत राहतो. शाजू खालिद याने प्रकाशचित्रणातून कुम्बलंगीचा परिसर व तिथली माणसं मोठ्या नजाकतीनं टिपली आहेत. चार भावंडाची गोष्ट दिग्दर्शकाने संथ लयीत, काहीशी रेंगाळत सांगितली आहे. त्यात येणाऱ्या दृश्यांना सुशील शामच्या संगीताने खुलवलं आहे. साजी, त्याची भावंडं, शम्मी यांच्या बरोबरीनेच येणारी विजय, प्रशांत ही पात्र सुद्धा पुरुषांच्या स्वभावाचे वेगळे पैलू दाखवतात. नायकांची लार्जर दॅन लाईफ प्रतिमेची चाकोरी सोडून आधुनिक काळातील पुरुषसूक्त सांगणारा 'कुम्बलंगी नाईट्स' आवर्जून पहायला हवा.

**– संतोष पाठारे**

भ्रमणध्वनी : ८१६९१७०८२७

santosh_pathare1@yahoo.co.in

# मराठीपणाची सर्जनशील गजबज

अभिजित हेगशेट्ये
अजित आचार्य

साऊथ अमेरिकेतील औद्योगिक आणि सांस्कृतिक पातळीवर प्रगत असणाऱ्या डॅलस या शहरात बृहन्महाराष्ट्र मंडळाचे १९वे द्वैवार्षिक अधिवेशन ११ ते १४ जुलै या काळात उत्साहात आणि थाटात साजरे झाले. अठराव्या शतकातील अलामोच्या ऐतिहासिक क्रांतीनंतर स्वतंत्रपणे उदयाला आलेल्या टेक्सासचे वैशिष्ट्य म्हणजे काऊबॉय अॅन्ड गन. या काऊबॉयसोबत मराठमोळा मावळा असे या दोन संस्कृतींचे अभूतपूर्व संमिश्रण होत टेक्सासमध्ये मराठी बांधवांनी आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. याचे प्रत्यंतर या भव्यदिव्य अशा साऱ्या अमेरिका-कॅनडातील मराठमोळ्या बांधवांना एकत्रित करून साजऱ्या होणाऱ्या बीएमएम अधिवेशनात दिसत होते.

महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील सुशिक्षितवर्गामध्ये इंग्रजी भाषा आणि अमेरिकन संस्कृतीचे विलक्षण आकर्षण वाढत असताना अमेरिकेतील डॅलसमध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे अत्यंत वैभवशाली, दिमाखदार द्वैवार्षिक अधिवेशन साजरे करत मराठीची सांस्कृतिक परंपरा पुढील पिढीकडे संक्रमित करण्याचा उपक्रम विशेष उल्लेखनीय होता. अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनात सातत्याने मराठी भाषेच्या भावी काळातील अस्तित्वाचा प्रश्न उपस्थित होतो. मात्र डॅलसमधील हजारो अमेरिका-कॅनडास्थित मराठी भाषकांचा अभूतपूर्व उत्साह आणि मराठी भाषा आणि परंपरा जपण्यासाठीची त्यांची धडपड आणि प्रयत्न पाहता सातासमुद्रापार मायमराठीच्या परंपरेची जपणूक आणि संवर्धनाची ओढ विलक्षण असल्याचे जाणवले.

अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाची गेली ३८ वर्षे होणारी द्वैवार्षिक अधिवेशने म्हणजे जगभरातील मराठी भाषकांचा आनंदसोहळा हे समीकरण झाले आहे. अमेरिका, कॅनडा या देशांतील विविध भागांत दर दोन वर्षांनी ही अधिवेशने होतात आणि जगभरातील मराठी माणसे हजारोंच्या संख्येने या चार दिवसांच्या सोहळ्याला हजर राहतात. या वर्षी हा मान डॅलस-फोर्टवर्थ महाराष्ट्र मंडळाकडे होता. १९व्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाच्या उद्घाटक होत्या यावर्षीच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा ढेरे. या अधिवेशनानिमित्ताने मंडळाने प्रकाशित केलेल्या 'गुंजन' स्मरणिकेवरील घोषवाक्य होते, 'सूर गुंजती अभिनवतेचे, फुलवित नाते परंपरेचे' हाच धागा पकडत अरुणाताई यांनी सांगितले, दीडशे वर्षांपूर्वी डॉक्टर होण्यासाठी अमेरिकेत आलेल्या आनंदीबाई जोशी यांना त्यांचा पोशाख आणि आहार यातील मराठीपणाच्या नवऱ्याच्या अट्टहासापायी आपली कर्तबगारी भारतात दाखविण्यापूर्वीच आपला जीव गमवावा लागला होता. मराठीपणाचा धागा पक्का करण्यासाठी आपण सारे येथे एकत्र आलो आहोत. आज अमेरिकेत महाराष्ट्रातील खानदेश, विदर्भ, मराठवाडा, कोकण, कोल्हापूर, सातारा आदी विविध



'कवितांजली' हा पु.ल. आणि सुनीताबाई यांच्या आवडत्या कवितांचा कार्यक्रम सादर करताना डॉ. अरुणा ढेरे, सुबोध भावे आणि स्पृहा जोशी

भागांतून आपल्या परंपरेचे, मराठीपणाचे, जगण्याचे गाठोडे घेऊन प्रत्येकजण येथे आले आहात. आपल्या परंपरेतील नकोसे वाटणारे बाजूला करत, नव्याची जोड करत आपण आपले मराठीपण घट्ट करत आहात. या साऱ्या परदेशस्थ मराठी माणसांनी निर्माण केलेली सर्जनशील गजबज ही मराठीपणाच्या जिवंतपणाची लक्षणे आहेत.

परंपरेच्या आधुनिकीकरणात परदेशस्थ भारतीयांचा वाटा मोठा आहे. हे सांगताना त्यांनी सांगितले, तुम्ही इतक्या लांब राहून विश्वाचे नागरिकत्व मिळविण्यात खूप पुढे आहात. जागतिकीकरणाचे फायदे आपणाला माहीत आहेत. दुष्परिणामही आपण जाणून आहात. विविधतेने टिकून राहणारी एकता हे आपल्या देशाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. एकमेकांना जोडणे महत्त्वाचे आहे. विविध कला, सिनेमा, आविष्कार या माध्यमातून ते पुढे जात रहाते. मात्र माझी अपेक्षा आहे, अनुवादित साहित्य अधिक प्रमाणात येणे हे भाषेचे नाते जगाशी जोडू शकते, यासाठी आपण मंडळींनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. संमेलनाचे प्रमुख पाहुणे विख्यात प्लास्टिक सर्जन डॉ. रविन थत्ते यावेळी बोलताना म्हणाले, मराठी भाषा समृद्ध करण्याचा पाया संतसाहित्याने घातला. कोणतीही भाषा असो तिचा विकास हा मौखिक व लिखित स्वरूपात जेवढा वाढेल तेवढी ती भाषा समृद्ध होत जाते, यात ज्ञानेश्वरीतील अनेक दाखले देता येतील. महाराष्ट्रात जन्माला आलेली मराठी भाषा सातासमुद्रापलीकडे स्थिर होत आहे. मानवाचे स्थलांतरित जीवन यास कारणीभूत आहे, मग ते शिक्षणासाठी, नोकरी किंवा उद्योगधंद्यासाठी असो.

डॅलसमधील 'के बेली ह्युच्सन कन्व्हेंशन' सेंटरच्या अतिभव्य वास्तूत हे संमेलन ११ ते १४ जुलै २०१९ रोजी आयोजित केले होते. अमेरिका-कॅनडाच्या विविध भागांतून येथे मराठीजन उपस्थित होते. यातील बिझनेस कॉन्फरन्स आणि इतर विविध साहित्यिक आणि कलात्मक कार्यक्रमांची रेलचेल पाहता अमेरिकेत मराठीपणाची जपणूक किती अगत्याने केली जाते याचे आश्चर्य वाटत राहते. संमेलनाचा उद्घाटनसोहळा तर प्रेक्षणीय अमेरिकेतील मराठीजन पारंपरिक पोषाखात होता. आलेले स्त्रिया तर अगदी शालू आणि पारंपरिक साजशृंगाराने नटलेल्या; अगदी नाकात नथसुद्धा. पुरुषांचा पेहराव झब्बा, पायजमा, उपरणे. अधिवेशनाची सुरुवात आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर झाली. मुख्य दालनात खास उभारलेल्या ('ग्रंथाली' पुस्तक स्टॉलच्या शेजारीच) विठ्ठलमंदिरासमोर दणक्यात आरती झाली, 'विठूचा गजर' दुमदुमला. दुसऱ्या दिवशी सकाळी डॅलस शहराच्या रस्त्यावरून गौरवयात्रा निघाली. छत्रपती शिवाजीमहाराज, संत आणि मराठी साहित्यातील दिग्गजांची दिंडी ते लेझीमपथक डॅलसवासीयांचेही आकर्षण झाली होती.

हजारोंचा माहोल आणि मराठी परंपरेशी सांगड घालणारे या संपूर्ण संमेलनातील जेवणाचे मेन्यूही अगदी अस्सल मराठी खानदेशी पीठवड्या, ओल्या नारळाच्या करंज्या, बटाटारस्सा भाजी, कारळ्याची चटणी, भोकराचे लोणचे, तिखटमिठाची पुरी असा भन्नाट बेत असे. प्रत्येक दिवशी वेगळा मेन्यू. कधी पुरणपोळ्या, मोदक वगैरे. या अधिवेशनातील कार्यक्रमही विशेष आकर्षक होते. त्यात सुबोध भावे, स्पृहा जोशी, अशोक पत्की, ऋषीकेश रानडे, आर्या आंबेकर, संजय उपाध्ये, संजय मोने, विशाखा सुभेदार, देवकी पंडित, हेमांगी कवी आदी मान्यवर निमंत्रितांनी बहार आणली. त्याहीपेक्षा महत्त्वाचे होते ते स्थानिक कलाकारांचे कार्यक्रम. यात अटलांटा, न्यूजर्सी, कॅनडा, सीएटल अशा विविध राज्यांतील मंडळांचे विविध कार्यक्रम होते.



**संमेलनात रमलेले लेझीम**



**'एशियाटिक लायब्ररी'चे परिपत्रक विनता कुलकर्णी यांना देताना सुदेश हिंगलासपूरकर. सोबत धनश्री धारप, डॉ. रविन थत्ते आणि अरविंद कुलकर्णी**

परंतु डॅलसच्या कन्व्हेशनमध्ये मराठमोळा ढोल-ताशा कडाडला हे खरे! त्यासोबत मकरंद अनासपुरेंचे अस्सल गावरान कॉम्पेअरिंग होते, त्यामुळे कार्यक्रमाची बहार विलक्षणच.

ह्या अधिवेशनाचे वैशिष्ट्य होते 'एनजीओ समिट', भारत-अमेरिका येथील विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांचा परिचय. यात महाराष्ट्र फाऊंडेशन, पाणी फाऊंडेशन, हॅलो मेडिकल फाऊंडेशन, मराठी विज्ञान परिषद आदी संस्थांनी आपल्या कार्याचे प्रेझेंटेशन केले. महाराष्ट्रात उत्तम काम करणाऱ्या एनजीओ आणि त्यास अर्थसाहाय्य देऊ इच्छिणाऱ्या अमेरिकेतील व्यक्ती व संस्था यांना भेट घडवणारा हा उपक्रम स्तुत्य होता. यातील पाणी फाऊंडेशनचे सत्यजित भटकळ यांनी राजस्थान येथील कन्या भ्रूणहत्येच्या धक्कादायक वास्तवातून सुरू झालेला सत्यमेव जयतेचा टीव्ही शो ते सत्यमेव जयते वॉटरकप स्पर्धा हा प्रवास उलगडून सांगताना महाराष्ट्रातील भीषण पाणीदुष्काळ आणि त्यावरील सुरू असणाऱ्या व्यापक कार्याची ओळख दिली.

कवितांजली हा पु.ल. आणि सुनीताबाई यांच्या आवडत्या कवितांचा कार्यक्रम संमेलनाच्या अध्यक्षा अरुणा ढेरे, सुबोध भावे आणि स्पृहा जोशी यांनी सादर केला. यावेळी

मस्तक ठेवून गेलीस जेव्हा
अगतिक माझ्या पायांवर
या पायांना अदम्य इच्छा
ओठ व्हायची झाली होती

या कुसुमाग्रजांच्या ओळींनी स्पृहा जोशी यांनी मैफल अधिक रोमांचित केली.

अमेरिकेतील स्थानिक लेखकांचे पुस्तकप्रकाशन सोहळा हा या अधिवेशनातील एक महत्त्वाचा भाग असतो. यावेळी शिकागोच्या विनता कुलकर्णी यांचे 'पुस्तकचोर' हे 'द बुक थीफ'चा (ले. मार्क्स झुसाक) मराठी अनुवाद, प्रगती कोळगे यांचे 'का घडतंय हे?', रमेश वाघमारे यांचे 'हिंदुस्थानी रागदारी संगीतातील सुवर्णयुगाचे मानकरी', विद्या हर्डीकर यांचे सामाजिक कार्यकर्त्यांसाठी कौशल्यप्रशिक्षण, डॉ. अनंत लाभसेटवार यांचे 'संगणकक्षेत्रातील काही प्रज्वलित दिवे', डॉ. विजय ढवळे यांची 'मार्मिकताय नमः' व 'शब्दांच्या फुलवाती', त्यासोबत महाराष्ट्रातील ज्येष्ठ अभिनेते दीपक करंजीकर यांचे 'घातसूत्र' आणि संदीप काळे यांचे 'मु.पो. आई', तर शून्यातून विश्वात उद्योगविस्तार करणारे प्रकाश अंबुरे यांचे 'अरावली ते आरवली' ही पुस्तके यावेळी प्रकाशित करण्यात आली. त्याचवेळी 'ग्रंथाली'च्या 'शब्द रुची' विशेषांकाचे

माझ्या मित्राची बहीण मिनल लोथे-पाडगावकर या अटलांटा येथे डेंटिस्ट आहेत. एका नाटिकेत त्यांनी आणि त्यांच्या मुलाने भाग घेतला होता. त्या कार्यक्रमाची त्यांची प्रॅक्टिस आणि धावपळ सुरू होती. आमचे दुसरे स्नेही विकास बावधनकर हे न्यूजर्सीहून सहकुटुंब आले होते. त्यांचाही नाट्यप्रयोग होता. डॅलसवासीय सलील जोशी हा तर डॉ. सुरेश जोशी (माजी प्राचार्य, देवरुख) यांचा मुलगा, घरचेच संमेलन असल्याने फारच धावपळीत होता. बृहन्महाराष्ट्र नियतकालिकेचे संपादन करणाऱ्या आणि 'पुस्तकचोर' या अनुवादित कादंबरीच्या लेखिका विनता कुलकर्णी (शिकागो), हॉलिवूडचे कलाकार मूळ पाचलवासीय सुनील नारकर (लॉस एंजेलिस), विद्या हर्डीकर, डॉ. अनंत लाभसेटवार, विश्वस्त आशिष चौघुले (रत्नागिरीचे जावई) अशी सारी आपलीच मंडळी भेटत होती. त्यांचा संमेलनाच्या कार्यातील उत्साह असा काही अफाट होता, की वाटत होते माझ्या महाराष्ट्रात मराठीची परंपरा जपण्यासाठी होणाऱ्या धडपडीपेक्षा या परदेशस्थ मराठीजनांना या परंपरेची जोपासना करण्याची विलक्षण काळजी आहे.

या कार्यक्रमात एक लक्षवेधी कार्यक्रम होता तो ढोल-ताशा स्पर्धेचा. यात आत्मीय ढोल ताशा (अटलांटा), स्पार्टन (सॅनफ्रान्सिको), शिवम ढोल (डॅलस), मोरया ढोल (ह्युस्टन) या चार स्पर्धकांनी भाग घेतला होता. या साऱ्यांनी अप्रतिम परफॉर्मन्स केला. मला प्रश्न पडला यांनी हे ढोल कोठून आणले आणि याची प्रॅक्टिस कशी केली असेल. त्याची कथा आणखीच खास आहे.

प्रकाशन झाले.

अमेरिकेतील जवळपास चार ते पाच हजार मराठी बांधवांच्या या महामेळ्यात मराठी पुस्तकांची ही ग्रंथदिंडी घेऊन जाणारी एकमेव प्रकाशन संस्था होती ती 'ग्रंथाली'. ही सारी पुस्तके 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेली. साहजिकच साऱ्या संमेलनात ग्रंथाली वाचक चळवळीचा बोलबाला आणि अपेक्षा प्रत्येक मराठी माणसाच्या चर्चेत होती.

येथील आणखी एक वैशिष्ट्य आहे मराठी शाळांचे. अमेरिकेतील मराठी मुलांना मराठी भाषा अवगत व्हावी यासाठीची ही धडपड. आज येथे ६० मराठी शाळा विविध प्रांतात सुरू आहेत. तेथे मुलांना मराठी भाषा शिकविली जाते. महाराष्ट्रात मराठी शाळा बंद होत असताना अमेरिकेत मराठी शाळा सुरू होत असल्याचा आनंद सुखद वाटला. ऑस्टिनच्या आरती परळकर यांनी त्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. येथील मुलांना मराठी शिकताना अवघड संकल्पना सोप्या व्हाव्यात म्हणून त्यांनी हस्तकलेच्या माध्यमातून विविध प्रणाली तयार केल्या आहेत. मराठीचा हा जागर परदेशातील मराठी बांधव मोठ्या आत्मीयतेने जपत आहेत हे निश्चित अभिमानास्पद आहे.

मराठी भाषा आपल्या पुढील पिढीकडे असणे याची जाण अमेरिकेतील मराठीजनांना प्रकर्षाने जाणवत आहे. यासाठी मराठीचे हे मराठमोळेपण जपणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाला आणखी एक साथ आहे ती 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकरांची. सलग १५ बीएमएम संमेलनांत ते सातत्याने 'ग्रंथाली'ची पुस्तके आणि लेखक यांना सोबत घेऊन अमेरिकेतील प्रत्येक संमेलनातून मराठीची पताका घेऊन जातात. आजपर्यंत त्यांनी अमेरिकेतील अनेकांना लिहिते आणि वाचते केले. अमेरिकेतील यशस्वी मराठी उद्योजकांच्या प्रेरणादायी कथा पुस्तकरूपाने प्रकाशित केल्या. अमेरिकेतील मराठी लेखकांची अनेकविध विषयांवर पुस्तके प्रकाशित केली आहेत. हजारो मराठी बांधव ग्रंथालीशी जोडले आहेत. शेकडो मराठी पुस्तके या माध्यमातून अमेरिकेतील मराठी घराघरात जात आहेत. यावेळी तर सुदेश हिंगलासपूरकर, धनश्री धारप आपल्यासोबत मोहन आणि संध्या-रुचिका खैरे, अरुण जोशी, शोभा-सई हिंगलासपूरकर, अजित आचार्य, प्रकाश अंबुरे (उद्योजक, लेखक), भगवान आणि आशा इंगळे, श्रीधर आणि स्वप्ना पाटील, संदीप काळे (संपादक सकाळ), अभिजित-सीमा हेगशेट्ये, रोहित भानुशाली, शिल्पा अग्निहोत्री, भारती वालावलकर, नीलिमा आढाव आदी २० जणांच्या, ग्रंथाली प्रकाशन विभागातील प्रकाशन, संपादन, लेखक यांच्या, काफिल्यासोबत डॅलस संमेलनाला उपस्थित होते. अमेरिका-कॅनडा येथील मराठी भाषेच्या संवर्धनात 'ग्रंथाली'चा हा सहभाग फार मोलाचा आणि महत्त्वाचा ठरला आहे.

**– अभिजित हेगशेट्ये, अजित आचार्य**
भ्रमणध्वनी : ९४२२०५२३१४, ९०२८००४२६१
abhijit.shriram@gmail.com / ajit780@gmail.com

## 'चार सख्य चोवीस' दुसऱ्या आवृत्ती प्रकाशन

'ग्रंथाली' प्रकाशित 'चार सख्य चोवीस' या कथासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचा नावीन्यपूर्ण प्रकाशन सोहळा दि. ३० जुलै रोजी, ठाण्याच्या डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाच्या मिनी थिएटरमध्ये दिमाखात संपन्न झाला. संपदा जोगळेकर कुळकर्णी, हर्षदा बोरकर, सोनाली लोहार आणि निर्मोही फडके या चार लेखिकांनी लिहिलेल्या या प्रयोगशील कथासंग्रहाची अवघ्या चार महिन्यांत पहिली आवृत्ती संपली. वाचकांची उदंड पसंती मिळालेल्या या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशनही एका वेगळ्या प्रयोगाने झाले. या पुस्तकातील 'सख्य'सूत्रावर आधारित चारही लेखिकांच्या चार कथांचे लेखिकांकडून अभिवाचन व त्याच वेळी चार चित्रकारांचा त्या कथांशी संबंधित समांतर चित्रप्रयोग अशा अनोख्या पद्धतीने हा प्रकाशन समारंभ झाला.

लेखनकलेशी चित्रकलेचा असा संगम घडवून आणणारे ते चार दिग्गज चित्रकार होते, डॉ. चंद्रकांत चन्ने, विजयराज बोधनकर, रवी जाधव व नीलिमा कढे. चित्रकारांनी कथांविषयी व आपल्या चित्रांविषयी अतिशय मनमोकळ्या पद्धतीने मनोगते म ांडली. तर लेखिकांनीही आपल्या कथांवर तयार होत गेलेल्या सुंदर चित्रकृतींविषयी आपले विचार व्यक्त केले. 'ग्रंथाली'चे विश्वस्त श्री. सुदेश हिंगलासपूरकर, ठाण्यातील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. अशोक चिटणीस, लेखक, समीक्षक चांगदेव काळे, लेखक विक्रम भागवत, प्रसिद्ध अभिनेते उदय सबनीस इत्यादी कला व साहित्यक्षेत्रातील अनेक मान्यवरांनी, रसिकांनी या आगळ्यावेगळ्या प्रयोगाला मुसळधार पावसाळी संध्याकाळ असूनही 'हाऊसफुल' हजेरी लावली. रंगरेषांच्या आकारांना साकारणा-या चित्रकारांना बोलतं केलं, हर्षदा बोरकर यांच्या नेमक्या प्रश्नांनी. संपूर्ण कार्यक्रमाचे खुमासदार सूत्रसंचालन करत त्यांनी या प्रयोगाचे नावीन्य रसिकांपर्यंत पोहोचवले.

'चार सख्य चोवीस'च्या 'पुस्तक-गप्पा' या कार्यक्रमातून या चारही लेखिकांनी 'ग्रंथाली'च्या वाचन चळवळीचा धागा पुढे नेत एक नवा मार्ग चोखाळला आहे. तसेच चित्रकारांच्या साथीने प्रत्यक्षात आणलेली पुस्तक प्रकाशनाची त्यांची ही अभिनव कल्पनाही कौतुकास्पद अशीच आहे. कलांमधील हे सख्यत्व अतिशय रंगतदार पद्धतीने रसिकांपर्यंत पोहोचवल्याबद्दल या चारही लेखिकांचे व त्यांना रंगसाथ देणाऱ्या चारही दिग्गज चित्रकारांचे मनःपूर्वक आभार.

## 'सृजनशील जगन्मित्र'

''सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांनी विचारांचा आनंद घेत जगले पाहजे. स्पर्धेच्या युगात सध्या नोकरीची अनिश्चितता आणि आव्हानांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे शाश्वत ध्येय गाठण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना स्वत:मधील कौशल्यांचा विकास करायला हवा'', असे प्रतिपादन माजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.




शुभांगी मुळे लिखित 'सृजनशील जगन्मित्र' या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. 'दी युनिक ॲकॅडमी'तर्फे यावेळी 'स्पर्धा परीक्षा : आजचा विद्यार्थी आणि मी' या विषयावर डॉ. मुळे यांचे व्याख्यान झाले. यावेळी उद्योजक नितीन मुळे, रवी धोत्रे, नागेश गव्हाणे आणि 'ग्रंथाली' प्रकाशनाच्या धनश्री धारप आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी नवनवीन क्षेत्रांचा शोध घ्यावा, असे आवाहन यावेळी डॉ. मुळे यांनी केले. तसेच, शास्त्रज्ञांच्या देशात असलेल्या कमतरतेबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. शुभांगी मुळे म्हणाल्या, ''ज्ञानेश्वर मुळे यांच्या जीवनातील विविध पैलूंचा समावेश या पुस्तकात करण्यात आला आहे.''

## 'दिनाकाका'

तृषा नवगिरे यांनी आपले बंधू दिनेश जाधव (माजी उपायुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका) यांच्या पंच्याहत्तरीच्या निमित्ताने लिहिलेले 'दिनाकाका' हे पुस्तक दि. १३ जुलै २०१९ रोजी हॉटेल ऑर्किडच्या सभागृहात डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले.




ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्रांतर्गत प्रकाशित झालेल्या या पुस्तकात एकूण २२ लेखांचे संकलन आहे. यापैकी पंधरा लेख मराठीत आहेत तर सात लेख इंग्रजीत आहेत.

डॉ. नरेंद्र जाधव संपादित 'आमचा बाप आन् आम्ही' या बहुचर्चित आत्मकथांतील चार भावांपैकी एक म्हणजे दिनेश जाधव होय. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपायुक्तपदी विराजमान होण्यापूर्वी दिनेश जाधव यांनी मुंबईतील अनेक संवेदनशील विभागात 'वॉर्ड ऑफिसर' म्हणून जबाबदारी सांभाळली. एन वॉर्ड, सी वॉर्ड, आर नॉर्थ, जी नॉर्थ आणि नायर हॉस्पिटल या ठिकाणी त्यांनी केलेल्या कामांची आठवण आजही अनेकांच्या स्मरणात आहे. त्यांच्या या कारकिर्दीचा आढावा त्यांचे वरिष्ठ अधिकारी तसेच त्यांचे स्नेही यांनी लेखरूपात घेतलेला आहे.

या लेखात बृहन्मुंबई महानगरपालिकेचे माजी आयुक्त शरद काळे, हॉटेल उद्योजक विठ्ठल कामत, माजी आयकर आयुक्त टंडन अशा अनेकांनी दिनेश जाधव यांच्याविषयीच्या आपल्या भावनांचं शब्दचित्र 'दिनाकाका' या पुस्तकात चितारले आहे.

या प्रसंगी श्री. पाटणकर (Addl municipal commissioner), राजेंद्र टंडन (Income tax commissioner), विठ्ठल कामत, डॉ. लतिका भानुशाली, डॉ. नरेंद्र जाधव, व्ही. भालचंद्रन (Dy municipal commissioner) यांनी आपले विचार व्यक्त केले.

## 'मन:पूर्वक'

'ग्रंथाली'तर्फे डॉ. वसुधा सरदेसाई लिखित पहिला कवितासंग्रह मन:पूर्वक प्रकाशित झाला. हा सोहळा अतिशय भावपूर्ण असा होता. डॉ. वर्षा दंडवते यांनी त्याचे सूत्रसंचालन केले.

डॉ. वसुधावरील आई व बाबा यांनी पाडलेला साहित्यविषयक प्रभाव, वाचनाची लावलेली आवड, वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व दिलेले अमाप प्रोत्साहन या सगळ्यांचा उल्लेख अपरिहार्य होता. तसेच डॉ. नितीन सरदेसाईंच्या आईंनी दिलेले प्रोत्साहनही या साहित्यिक जडणघडणीत मोलाचे ठरले. तसेच वृषाली व ऋतुजा यांनी करून दिलेला इंग्रजी काव्यपरिचय ही भाव खाऊन गेला.


डॉ. वसुधाचे वडील डॉ. आफळे यांनी हा काव्यसंग्रह प्रकाशित केला.

'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, साहित्यिक शैलजा देशमुख, कवयित्री आश्लेषा महाजन, मुखपृष्ठकार सुभाष कुलकर्णी हे मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व वक्ते होते तीन कवी

व संगीतकार सलील कुलकर्णी, शास्त्रीय गायिका आरती अंकलीकर, डॉ. अशोक निरफराके या सर्वांनी व्यक्त केलेले कवितांबद्दलचे व वसुधाच्या पुस्तकावरील विचार हे साधेसोपे, कालानुरूप व भविष्यवेध घेणारे होते. कविता का व कशी यापासून कुठले काव्य खरे इथपर्यंत विषयांवर बोलले गेले. तसेच वसुधाचा स्वभाव, तिचे छंद व तिने डॉक्टर म्हणून केलेले कार्य या बाबींवरही तिन्ही वक्ते बोलले.

डॉ नितिन सरदेसाईंनी या सोहळ्याचे फारच छान नियोजन केले. बरेचसे व्यावसायिक, मित्र तसेच नातलग यांच्या उपस्थितीत हा सोहळा छान रंगला.

पुढील साहित्यिक वाटचालीसाठी वसुधा व नितीन या दोघांनीही शुभेच्छा!




मी माझ्या कवितांना बजावलंय
फसव्या शब्दांच्या वाटेनं कधी जायचं नाही
मृगजळी अर्थाच्या मोहात पडायचं नाही
आणि सोनेरी शब्दांची शाल पांघरून
माझ्या मनात रुजायचं नाही
मनातील भावभावनांशी हितगुज करणारी कविता

कवितेतील अगदी आतला सच्चा सूर वाचणाऱ्याला जाणवला की तो अलगद 'स्व'चा उंबरठा ओलांडून दुसऱ्याच्या अंत:करणापर्यंत पोहोचतो. ही अनुभूती वसुधा सरदेसाई यांच्या प्रस्तुत कवितासंग्रहातील कविता वाचताना येते. संवेदनशील माणसाचा आपलेपणा या कवितांमध्ये आहे.

निसर्गाने विभ्रम टिपणाऱ्या कविता, आत्मपर उद्गाराच्या कविता, प्रेमकविता, मनाच्या अवकाशाचा वेध घेणाऱ्या भावकविता या सर्वांचा रसपूर्ण मेळ येथे आहे.

मूल्यविचारांचे भान सतत जागे असल्याने वास्तवाच्या दर्शनाने ग्रासलेल्या मनाला उभारी देण्याचे आश्वासक बळ या कवितांमधून दिसून येते.

## 'फक्त सैल झालाय दोर'

समकालीन स्त्रीवादी कवितेत डॉ. पद्मरेखा धनकर यांची कविता चाकोरीच्या बाहेर पडून वास्तवाचा परिचय देणारी आहे. मराठी साहित्यात त्यांची कविता निश्चितच आशावादी आणि समृद्ध करणारी आहे. त्यामुळे 'फक्त सैल झालाय दोर' हा कवितासंग्रह साहित्य प्रांतात गाजेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवयित्री आणि लेखिका नीरजा यांनी केले.

'ग्रंथाली'च्या वतीने कवयित्री डॉ. पद्मरेखा धनकर लिखित 'फक्त सैल झालाय दोर' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन रविवारी ज्येष्ठ कवयित्री आणि लेखिक नीरजा, मुंबई यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या. सरदार पटेल महाविद्यालयातील शांताराम पोटदुखे सांस्कृतिक सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवयित्री आणि लेखिका नीरजा होत्या. विशेष अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. राजेश इंगोले, कवी डॉ. भूषण रामटेके, कादंबरीकार आणि लेखक रवींद्र शोभणे, डॉ. पी. विठ्ठल उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना नीरजा म्हणाल्या, 'फक्त सैल झालाय दोर' या कवितासंग्रहातील कविता मराठी साहित्याला नवा आयाम देणारी आहे. विदर्भातील आदिवासीबद्दल भागातून ही कवयित्री कवितेतून फक्त बोलत नाही तर, समग्र विश्वासाचा जागर करेल. म्हणून हा कवितासंग्रह महत्त्वाचा वाटतो, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी कवी व समीक्षक डॉ. पी. विठ्ठल, लेखक रवींद्र शोभणे, प्रसिद्ध कवी व समीक्षक डॉ. भूषण रामटेके यांनी भाष्य केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन गीता रायपुरे यांनी केले.

## पुस्तक पुरस्कार





'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या रविराज गंधे यांच्या माध्यमरंग या पुस्तकाला 'महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे' या संस्थेचा 'ललितेतर उत्कृष्ट साहित्यकृती'चा १९१८ चा 'गणेश सरस्वती ठाकूरदेसाई पुरस्कार' गुजराती साहित्यिक सितांशु यशचंद्र आणि डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते देण्यात आला. सोबत मिलिंद जोशी, प्रकाश पायगुडे आणि इतर.




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

**अनवट निवडक गोखले**
**लेखन-संपादन**
**नीला वसंत उपाध्ये**




**बिनीच्या नवकथांचे भांडार!**

भय्याच्या लेकीचे म्हणजे चित्राचे लग्न ठरले आहे ते केसकरांच्या बाळासाहेबाबरोबर. सगळी तयारी झाली आहे. भय्याच्या घरी त्याची धांदल सुरू आहे. मात्र केसकरांच्या वाड्यात सगळी सामसूम आहे कारण दत्तूकाकांची प्रकृती अॅटॅकमुळे शेवटच्या घटकेवर आलेली आहे. त्यांना वाचवण्यासाठी तिकडे धावपळ सुरू आहे. भय्याला वाटतं, दत्तूकाकाला दवाखान्यात दाखल करावे आणि औषधपाण्यावर जगवण्याचा प्रयत्न करा व त्या वेळेत लग्नाचा बार उडवून मोकळे व्हावे. त्याला लेकीच्या लग्नाची चिंता तर तिकडे दत्तूकाकाच्या जीवाची चिंता. शेवटी दत्तूकाकांची पत्नी पुढाकार घेते, असे हे 'विघ्नहर्ती' कथेचे कथानक. परंतु यात आलेले ताणतणाव, मानवी समूहाचे वागणे, शेवटपर्यंत खिळवून ठेवणारी भयानकता यांची ताकद वाचकाला आपल्या कवेत घेण्यास पूर्णपणे सक्षम ठरलेली आहे. या कथेच्या अनुषंगाने सुप्रसिद्ध साहित्यिक भारत सासणे यांनी केलेले वर्णन पहा, '' 'चित्रदर्शी रेखीवता' हे या कथेचे गुणवैशिष्ट्य असल्यामुळे मनःपटलावर ही कथा सुस्पष्ट अशी उमटलेली आहे. व्यक्ती आणि व्यक्तीचे मन याबाबत आधुनिक कथाकारांनी आस्था दाखविण्यास सुरुवात केल्यानंतर प्रामुख्याने अरविंद गोखले यांनी व्यक्तीचे मनोविश्लेषण आपल्या लघुकथांतून सखोल पद्धतीने मांडण्यास सुरुवात केली. मनाच्या अथांग अशा विश्वाची ओळख तत्कालीन आधुनिक वाचक-रसिकांना करून देण्याचे श्रेय अरविंद गोखले यांना द्यावेच लागते.'' (पृ.क्र.११७)

छबू डोईफोडे हा गाव सोडून मुंबईत आला. जगण्यासाठी इथे धडपडल्याशिवाय काहीच मिळत नाही. छबू एक छानसा व्यवसाय सुरू करतो. प्रेतावर घातलेली फुले उचलून बाजूला करायची, तीच फुले बाजारात जाऊन विकायची. एक कायमचा व्यवसाय. या कथेस अनुसरून कवयित्री 'नीरजा' लिहितात, ''अरविंद गोखले 'फूलछबू' या कथेत मानवी श्रद्धांनाच छेद देताना दिसतात. जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षात, शेवटी स्वतःला जिवंत ठेवणं, हेच माणसासाठी जास्त महत्त्वाचं ठरतं. आयुष्यातील ही व्यस्तता (अॅबसर्डिटी) गोखले यांनी 'फूलछबू' या कथेत नेमकी टिपली आहे.'' (पृ.क्र.२४८)

'मांसाचा गोळा' म्हणजे बाळ; आईबापांना कृतार्थतेचा आनंद, समाधान देणारे पोटचे पोर, परंतु दुष्काळ वणव्यासारखा पेटलेला. खायला अन्नाचा कण नाही. आईच्या पोटातच काही नाही तर या बाळाला ती दूध कुठून, कशी पाजणार. त्याला जगवायचे आणि स्वतःही जगायचे तर हे बाळ विकायचे. त्यातून येणारे पैसे गुजराण करण्यासाठी वापरायचे. पारूला आई म्हणून हा निर्णय अमान्य आहे परंतु नवरा रामापुढे तिचे काही चालत नाही. दुष्काळी वातावरण, जगण्याची भ्रांत आणि मानवी मनाची तडफड याविषयी कवी व कथाकार किरण येले लिहितात, ''अरविंद गोखले त्यांच्या कथेत भावनांचे उदात्तीकरण करायचं टाळून, सतत आपल्या कथेचा प्रकाशझोत कथाबीजावरच ठेवताना दिसतात. वाचकांना भावविभोर करतील अशा अनेक जागा 'मांसाचा गोळा' मध्ये आहेत; पण वाचक शरणता नेहमीच निर्धाराने टाळणारे गोखले त्या साऱ्या जागा सहजपणे टाळतात. 'मांसाचा गोळा' ही कथा गोखल्यांमधील ठाम व धाडसी लेखकाचं अप्रतिम दर्शन घडवते. (पृ.क्र. २८०-२८१)

'वैर' या कथेतील अकुंशराव देसाई अजात शत्रू, सगळ्यांचे स्नेही, व्यक्तीद्वेष नावाची गोष्टच त्यांच्या कोशात नसलेले, एक वेगळेच प्रसन्न, तत्पर, आजर्वी व्यक्तिमत्त्व. सुचेता ही त्यांची मुलगी. तिच्या सुखाचा सतत विचार करणारे. तिच्यासाठी सुधीर हा योग्य वर आहे, त्याच्याशी तिचे लग्न व्हावे ही त्यांची इच्छा. परंतु सुधीर शामा नावाच्या मुलीशी लग्न करून येतो. शामाने जणू सुचेताचे सर्वस्व हिरावून घेतले अशी समजूत करून घेणारे अंकुशराव पुढे पूर्णपणे बदलतात. सुधीर व शामा यांच्याशी वैर धरल्यासारखे वागू लागतात. या कथेविषयी सुप्रसिद्ध लेखक गणेश मतकरी मत व्यक्त करतात, अरविंद गोखल्यांची 'वैर' ही कथा एका सज्जन माणसाच्या नैतिक ऱ्हासाचा वाचकाला अस्वस्थ करणारा आलेख आहे. ती जितकी घटकांमधून उलगडते, तितकीच अंकुशरावांच्या मनातही नीतिमत्तेबद्दलच्या आपल्या पारंपरिक कल्पनांना हादरा देणारी 'वैर' ही कथा निःसंशय अरविंद गोखले यांच्या श्रेष्ठ कथांमधली एक आहे. (पृ.क्र.३०४)

'अनवट निवडक गोखले' हा नीला उपाध्ये यांनी अरविंद गोखले यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सिद्ध केलेला हा दुसरा ग्रंथ होय. अरविंद गोखले हे नवकथाकारांमधील एक बिनीचे नाव. त्यांच्या कथा वाचकांची एक पिढी होती. त्या कथांनी जे वेगळेपण या साहित्य क्षेत्रात सिद्ध केलेले आहे, त्याची मोहिनी आजही कायम आहे. नीला उपाध्ये यांनी पहिल्या खंडात अरविंद गोखले यांच्याविषयीचा समग्र धांडोळा घेतला होता. त्यात साहित्य, समीक्षा, व्यक्तिमत्त्व, आठवणी यांचा समावेश होता. या दुसऱ्या खंडात मात्र पंचवीस कथा आहेत. मात्र त्या निवडण्यात एक वेगळा प्रयोग केला आहे. 'कथा' या विषयाशी ज्याचे नाते जवळचे आहे, अरविंद गोखले यांच्या कथा ज्यांनी वाचलेल्या आहेत, अशा साहित्यिकांकडून, अरविंद गोखले यांच्या आवडलेल्या कथा, त्यांच्या मतासह मागविल्या आणि त्या आवडलेल्या, वेगळेपण असलेल्या कथांचा हा संग्रह वाचकांच्या हाती दिलेला आहे. या कथांचे वेगळेपण, त्यांच्यातील विविधता, लेखक म्हणून केलेले प्रयोग, हे सगळे वाचताना आपण एका वेगळ्याच जाणिवेने चिंब होतो. कथा हा प्रकार कशा अंगांनी समृद्ध करता येतो याचे पाठ हा संग्रह देतो. एक उत्तम संग्रह वाचकाच्या हाती देताना उपाध्ये यांनी जणू समग्र गोखलेच हाती दिले आहेत असे वाटते. सुरेखा सबनीस आणि किरण येले आणि नीला उपाध्ये यांनी व्यक्त केलेल्या विवेचनातून गोखलेंचे समृद्धपण अभ्यासपूर्णपणे व्यक्त झालेले आहे. सतीश भावसारांनी मुखपृष्ठावर अरविंद गोखले यांचे छायाचित्र घेतले आहे, जे व.पु. काळे यांनी टिपलेले आहे.

**मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**



# ग्रंथपान

**सृजनशील जगन्मित्र**

**शुभांगी नितीन मुळे**



**‘स्वत:तील अवकाश’**

‘‘खेडं कशाशी खातात याची कल्पना नसलेले लोक जर भारतीय प्रशासकीय सेवेत येत असतील तर कसं काय होणार? टाय बांधणं काय सहज शिकता येण्यासारखी गोष्ट आहे, पण तुम्हाला खेडं समजलं नाही तर निर्णय कसे घेणार?’’ (पृ.क्र.३५) प्रशासकीय सेवेची प्रदीर्घ काळ सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झालेल्या डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या प्रशिक्षण काळातला त्यांच्या सहकाऱ्यांना केलेला रोकडा सवाल. या सवालात त्यांचा आपल्या जाणिवांचा, कार्याचा दृष्टिकोन व्यक्त होतो, तसा खेडे, आपली माती यांच्याविषयी असलेल्या नात्याचा घट्ट पीळ लक्षात येतो.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांची प्रदीर्घ प्रशासकीय सेवा ही विदेशात झाली. जपान, सिरिया, रशिया, अमेरिका, मॉरिशस, मालदीव हे त्यातले प्रमुख देश. अनेक जबाबदार व महत्त्वाच्या पदांवर सेवा पूर्ण केली. डिप्लोमॅट, सचिव, अवर सचिव, परराष्ट्र सेवा सल्लागार, काऊन्सिल जनरल ऑफ इंडिया ही ती पदे होत. याविषयी त्यांचे विश्लेषण लक्षात घेण्यासारखे आहे, ‘‘एक आदर्श डिप्लोमॅट जो असतो तो आपल्या देशाचं विश्लेषण, महत्त्व अधिक अचूक दुसऱ्या देशापुढे ठेवतो, जिथे त्याची नेमणूक होते. एका अर्थानं डिप्लोमॅट हा पूल असतो आणि तो किती विविध प्रकारचे पूल आपल्या कारकिर्दीत बांधतो याच्यावरून त्याच्या यशाचं खरं मूल्यमापन करता येतं.’’ (पृ.क्र.५४)

डॉ. ज्ञानेश्वर मुळे हे ग्रामीण भागातून आलेले, मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेले चौथी, एसएससी, बीए आणि एमएलएस या सारख्या सर्व परीक्षांमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेले, हीच परंपरा त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतही कायम राखली. १९८२ साली या परीक्षेत ते भारतात सर्वप्रथम आले होते. पुण्यात डेप्युटी कलेक्टर म्हणून नेमणूक झाली आणि त्याच दरम्यान १९८३ला त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या आयएफएसला गवसणी घातली. तल्लख, कुशाग्र, तैलबुद्धी असलेल्या डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी यशस्वी कारकीर्द, यशस्वी समृद्ध जीवन आणि समर्पित भावना यांच्या सर्व मर्यादा कसाला लावल्या. एक उत्तम व्यक्तिमत्त्व म्हणून लौकिक प्राप्त केला, उत्तम प्रशासक म्हणून ओळख निर्माण केली. अमेरिकेत ‘कॉन्सुलेट तुमच्या दारी’ ही आगळीवेगळी योजना राबविण्याचा पहिला मान त्यांच्याकडे आहे. भाषा, संस्कृती यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य त्यांनी केले. जपानमधील वास्तव्यात त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळे टोयोटो, होंडा, सुझुकी इ. कंपन्यांच्या भारतातील गुंतवणुकीचा मार्ग अधिक सुकर झाला.

२०१३ साली मालदीव इथे घडलेला प्रसंग हा त्यांच्या प्रशासकीय आणि माणसुकीच्या कसोटीचा क्षण होता. मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद नशीद यांनी भारतीय दूतावासात स्वतःचा जीव वाचविण्यासाठी आश्रय मागितला, तेव्हा या आकस्मिक संकट कोसळलेल्या राष्ट्राध्यक्षांना पाहुणा म्हणून नऊ दिवस सुरक्षित आपल्या कार्यालयात राहण्याची व्यवस्था डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केली होती. इतकेच नव्हेतर या राष्ट्राध्यक्षांना गुप्त इच्छित स्थळी सोडण्याची जबाबदारी पार पाडली.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे हे उत्तम कवी आहेत. कविता हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषेत त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. ‘जोनाकी’, ‘रस्ताच वेगळा धरला’, ‘स्वतःवरील अवकाश’, ‘श्री राधा’, ‘ऋतू उग रही है’, ‘अंदर एक आसमान’, ‘मन की खलीहानोने’, ‘सुबह है की होती नही’, ‘शांती की अफवाये’, या कवितासंग्रहां सोबतच त्याची गद्य लेखनाची सहा पुस्तके प्रकाशित आहेत. इंग्रजी, मराठी, हिंदी वर्तमानपत्रातूनही त्यांनी सदर लेखन केलेले आहे.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या कारकिर्दीत अनेकांचा त्यांच्याशी अनेक कारणांनी संपर्क राहिला. विदेश भेटीवर असताना मुख्यमंत्री, पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री यांच्या भेटीचे नियोजन करण्याची जबाबदारीही त्यांना पार पाडावी लागलेली आहे. या सगळ्यांचे वेगवेगळे अनुभव इथे आलेले आहेत. राष्ट्रपती ग्यानी झेलसिंग, राष्ट्रपती प्रतिभा पाटील, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढलेले गौरवोद्‌गार, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयीची आदरयुक्त भावना, हे सारे अभिमान वाटावा असेच आहे. डॉ. मुळे यांच्या पत्नी साधनामॅडम यादेखील इंडियन रिव्हेन्यू सर्व्हिसमध्ये इन्कम टॅक्स विभागात प्रिन्सिपल कमिशनर म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी डॉ. मुळे यांच्याविषयी व्यक्त केलेल्या भावना व त्यांना भावलेले डॉ. मुळे यांचीही नोंद या पुस्तकात घेतलेली आहे.

एक प्रशासक, साहित्यिक, कुटुंबवत्सल गृहस्थ, सामाजिक–राजकीय जाणिवा जागृत असलेला सजग, सकारात्मक ऊर्जा असलेला प्रेरणा स्त्रोत, अनेक वैशिष्ट्यांचा मेरू असलेले डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचा समग्र परिचय करून देणे अवघड आहे. पस्तीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव सविस्तर मांडायचा तर तो खंडात्मक ग्रंथातून मांडावा लागेल. कर्तृत्ववान माणसाचे कर्तृत्व हे त्याच्यासारखेच मोठे असते. ते मोठ्या नेटाने आणि प्रयत्नपूर्वक लेखणीत पकडण्याचा प्रयत्न शुभांगी नितीन मुळे यांनी केलेला आहे. अनेकांच्या मुलाखतींमधून अनुभवांच्या आधाराने हे व्यक्तिमत्त्व पूर्णत्वाने साकारलेले आहे. प्रत्येक प्रकरणाला त्यांनी दिलेली शीर्षकं अतिशय सुंदर आणि योग्य आहेत, ज्यातून त्यात्या वैशिष्ट्यांची ओळख स्पष्ट होते. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर हा डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या सुंदर–सुंदर वैशिष्ट्यपूर्ण छटा पुस्तकाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा अल्पसा पण सुंदर प्रयत्न!

चित्रकार सतीश भावसार यांनी डॉ. मुळे यांचा फोटो समोर ठेवून छानसे मुखपृष्ठ तयार केले आहे.

**मूल्य १५० रु.  सवलतीत ९० रु.**

## ग्रंथपान

### उत्तराच्या शोधातले प्रश्न

''ज्या महाराष्ट्राने देशाचे स्वातंत्र्य चळवळीत नेतृत्व केले, तोच महाराष्ट्र आज सहिष्णुतेला पारखा झाला, हे प्रगतीचे नव्हे तर अधोगतीचे लक्षण आहे. गावोगावी उभ्या राहिलेल्या संस्काराच्या मठाधिपतींनी, संस्कृतीच्या ठेकेदारांनी आपल्या मूळ सहिष्णुतेच्या विचारांपासून फारकत घेतल्याने महाराष्ट्रात वैचारिक दारिद्र्य वाढत चालले आहे. एकवेळ महाराष्ट्राचे आर्थिक दारिद्र्य कर्जबाजारीतून दूर करता येईलही परंतु महाराष्ट्राचे आज वाढत असलेले वैचारिक दारिद्र्य कसे भरून काढावयाचे?'' (पृ. क्र. ६४)

'प्रश्न आणि प्रश्नचिन्ह' हे नरेंद्र लांजेवार यांचे पुस्तक, पन्नास लेखांचा संग्रह असलेले, लेखकाच्या शब्दांत सांगायचे तर ह्या लेखांचा दुसरा संग्रह. पहिला संग्रह 'सल उकल' प्रकाशित झालेला आहे. दैनिक 'देशोन्नती'मध्ये सातत्याने केलेल्या सदर लेखनाचे हे दोन भाग. सदर लेखनाला अनेक मर्यादा असतात. तरी त्यातला आशय हा त्या त्या काळाचा, घटनांचा, संस्कृतीचा धागा धरून अतिशय नजरेआड करता येत नाही. तेच महत्त्व लक्षात ठेवून 'ग्रंथाली'ने हे दोन लेखसंग्रह प्रकाशित करण्यात उत्सुकता दाखविलेली आहे. नरेंद्र लांजेवार हे मुक्त पत्रकार आहेत. आपल्या भोवती भोवंडून टाकणाऱ्या घटकांनी त्यांच्यातल्या पत्रकाराला डिवचले नसते तरच नवल होते. गाफिल माणसाला फार काळ गाफिल नाही राहता येत. तसे पत्रकाराला सलणाऱ्या गोष्टींकडे नाही डोळेझाक करता येत. अन्याय, खोटे, दांभिक, अत्याचार, शोषण, भेदाभेद, राजकारण, शेती, शिक्षण, धर्म, नदी, भक्ती, पुस्तक, वाचन असे असंख्य विषय आहेत. रस्त्यावर पेरलेल्या काट्यांसारखे, पेटलेल्या निखाऱ्यासारखे, भावनांच्या गोठून गेलेल्या नद्यांसारखे, कशी डोळेझाक करावी, त्यातून नरेंद्र लांजेवार हे संवेदनक्षम व्यक्तिमत्त्व; वाचन, लेखन, साहित्य, ग्रंथालय या सारख्या क्षेत्रात सतत वावरणारे, त्यात स्वतःला पूर्णपणे झोकून दिलेले, इतके की त्यांना त्यापासून वेगळे करता येणे अशक्य आहे. आतापर्यंत प्रकाशित झालेले त्यांचे साहित्य आणि त्यातले विषय पाहिले असता हे व्यक्तिमत्त्व इतरांहून खूप वेगळे आहे हे लक्षात येते. सभोवतालचे वातावरण पाहून त्यांच्या संवेदनशील मनाला, भावनांना ज्या यातना होत आहेत, त्यांचा उद्रेक म्हणजे हा लेखसंग्रह आहे असे म्हणता येईल.

'बारोमास' ही सदानंद देशमुख यांची अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी. शेतकरी अनेक प्रश्नांनी बाराही महिने घेरलेला असतो. वीज, पाणी आणि रास्तभाव एवढ्या माफक अपेक्षा असलेला हा शेतकरी कायम– बाराही महिने दुर्लक्षित राहिला. मग त्याने आत्महत्येचा मार्ग स्वीकारला तर त्यात त्याची चूक काय? माणूस जीवावर उदार होतो म्हणजे काय? या प्रश्नाला भिडताना लांजेवार विचारतात, शेतकऱ्यांसाठी नको, शेतीसाठी वेतन आयोग का नको? या आत्महत्या थांबणार कशा? शेतकऱ्यांकडे गांभीर्यपूर्वक संवेदनशील मनाने डोळे उघडे ठेवून कधी पाहणार आहात?

**प्रश्न आणि प्रश्नचिन्ह?**

**नरेंद्र लांजेवार**




'स्त्री' हा समाजातला दुसरा घटक. हा घटक पुरुषी मानसिकतेचा शिकार ठरलेला, युगानुयुगे त्यात बदल घडताना कुठे दिसत नाही. वर्तमानपत्रांचे मथळे रोज त्यांच्यावरील अन्यायाने दुथडी भरून वाहात आहेत. त्यांच्यावर अन्याय करण्यात कुठला आलाय पुरुषार्थ? त्यात विटाळ नावाची गोष्ट, चतुष्पाद प्राण्यांना असलेल्या शेपटीसारखी कायम चिकटलेली. एका बाजूला गंगा शुद्धिकरणाच्या मोठमोठ्या गोष्टी करायच्या, त्याआधी मन शुद्धिकरणाच्या गोष्टी कधी करणार? पोस्टाने गंगाजल मागवून ते प्यायचे, सर्व पापातून मुक्त होऊन पुण्य लाभल्याचे खोटे समाधान मिळवायचे, हा दांभिकपणा नाही का?

राजकारणाने भावनाशून्यतेचा तळच गाठला आहे. धर्माचे राजकारण करायचे, जातीचे राजकारण करायचे, गुणवंत विद्यार्थ्यांचे राजकारण करायचे, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे राजकारण करायचे, एक क्षेत्र सोडलेले नाही, जिथे राजकारणाने आपले राक्षसी पंजाची नखे रुतवलेली नाहीत. बेरोजगारी निर्मूलन, नवीन रोजगारांची निर्मिती, नवीन समाज घडवण्याची तळमळ, आदर्शांची जपणूक, ज्ञानकेंद्रांचा विकास, संस्कृतीचे जतन यांसारखे विषय जणू आपले नाहीतच, अशी त्यांची वृत्ती. मग महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणायचे ते केवळ त्यांची नावे घेण्यापुरते? रोहित वेमुलासारख्या प्रकरणाकडे पाहिले तर आपण कुठल्या संस्कृतीकडे चाललो आहोत, अशी भयचकित शंका उभी राहते. कोपर्डीचे प्रकरण पाहता सुरक्षित इथे आहे कोण? असा प्रश्न उभा राहतो.

प्रश्न खूप आहेत, त्यांच्याकडे आपण पाहतो कसे, त्यावर त्यांचे अस्तित्व अवलंबून आहे. नरेंद्र लांजेवार यांनी लेखसंग्रहाला दिलेले शीर्षक किती समर्पक आहे, त्याची प्रचिती हा संग्रह वाचताना येते. लांजेवारांची लेखणी धारदार आहे, ती शल्यविशारदासारखी अचूक वर्मावर प्रहार करते. परंतु त्याचवेळी तिला अमृताचा वसा लाभलेला आहे, तिच्यावर संवेदनशील संस्कृतीचे संस्कार आहेत. त्यामुळे वेदना देणारा सल उकरून काढताना ते हळुवारपणा जपतात. डॉ. बाबासाहेबासारख्यांच्या व्यासंगाचे उदाहरण पुढे करीत सृजनाकडे सर्जकतेने घेऊन जाण्याचा प्रयत्न करतात. टीका करणे सोपे असते, तिला सोडवता आले पाहिजे. लांजेवार ती गाठ सोडवू पाहतात. त्यामुळेच हे लेख मनाला थेट भिडतात.


डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनीही या लेखांचे कौतुक केले आहे. लांजेवारांनी स्वतःची भूमिका मांडली आहे. सतीश भावसार यांनी समर्पक मुखपृष्ठ तयार करून दिलेले आहे.

**मूल्य १८० रु.   सवलतीत १२० रु.**




# ग्रंथपान

## साद हिमालयाची
### वसंत वसंत लिमये आणि हिमयात्री




**अनवट वाटेवरून दिव्यत्वाकडे**

''लदाखमध्ये कोणीही नवशिक्यानं जरी फोटो काढला तरी उत्तमच येतो असं म्हणतात. 'श्योक' नदीची गाज, विस्तीर्ण खोऱ्यात भळभळ वाहणारा थंड वारा आणि मावळत्या लालसर सोनेरी किरणांनी रंगून गेलेले लदाखी पहाड. लदाखमध्ये शेवटच्या मावळणाऱ्या हिमयुगात निसर्गाचा उत्पात जणू हजारो-लाखो वर्षांपूर्वी थिजल्यासारखा भासतो. 'शयनकोन' साधलेले तरीही ढासळतील असे मातीचे उतार. कपच्या कपच्यांचे धारदार खडक, पिवळा, मातकट, लालसर जांभळा अशा अनेकरंगी मातीचे डोंगर मैलान्मैल पसरलेलं शुष्क वाळवंट. सारंच अतिशय अस्थिर भासतं. निसर्ग शिल्पकार तर सूर्य चित्रकार!'' (पृ.क्र.१२८)

ट्रेकिंग आणि रॉक क्लायमिंगचा उदंड अनुभव असलेले नाव म्हणजे वसंत वसंत लिमये. सह्याद्री, युरोप, हिमालय इकडे अनेकदा या मोहिमा यशस्वी करणारे निष्णात आणि कुशल नाव म्हणजे वसंत वसंत लिमये. याच छंदाशी जोडलेल्या 'रानफूल' आणि 'हाय प्लेसेस' या संस्थांची स्थापना करणारे संस्थापक म्हणजे वसंत वसंत लिमये. नुसती आवड वा हौस एवढ्या भांडवलावर उदंड कीर्ती असलेले अनेकजण सापडतात. परंतु छंद, ध्यास, झोकून देण्याची वृत्ती, साहसाची कसोटी पणाला लावण्याची धमक आणि हाती घेतले ते पार पाडण्याची जिद्द, दुर्दम्य असा आत्मविश्वास असलेले, स्वच्छंदपणे निसर्गाचा आनंद मनमुरादपणे घेणारे, निसर्गाच्या अंगाखांद्यावर मुक्तपणे बागडणारे वसंत वसंत लिमये म्हणजे एक वेगळेच रसायन म्हणता येईल. जोडीला छायाचित्रणाचा छंद. अभिनय, लेखनाची अंगीभूत आवड. तीसुद्धा चोखंदळ, त्यासाठी संशोधन, अभ्यास, भ्रमण, चिकित्सा आणि स्वतःचे वेगळेपण सिद्ध करण्याचा ध्यास. 'धुंद स्वच्छंद', 'कॅम्पफायर', 'लॉक ग्रिफिन', 'विश्वस्त' यांसारखी अभिजात साहित्य ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर असून ती त्यांच्या या वेगळेपणाची साक्ष देणारी आहे. 'फेलो ऑफ रॉयल जिओग्राफिकल सोसायटी' (FRGS) लंडन आणि आयआयटीयन मुंबई असलेले वसंत वसंत लिमये नवीन पुस्तक घेऊन आपल्यासमोर आले आहेत, त्याचे नाव आहे 'साद हिमालयाची'.

हिमालयाचा प्रवास करायचा, सिक्कीमपासून ते लदाखपर्यंत, म्हणजे तब्बल बारा हजार किलोमीटरचा. तोही स्वतःच्या वाहनाने, आपल्या मर्जीप्रमाणे, आखून घेतलेल्या मार्गाने. 'हिमालय' हे नावच त्याच्या श्रेष्ठत्वाची ग्वाही देणारे. त्याची भव्यता जशी उंचीत आहे तशी विस्तारातही आहे. त्याचे सौंदर्य जेवढे रम्य, लोभस, खिळवून ठेवणारे तेवढेच त्याचे अंतरंग गूढ, अनिश्चित, खडतर, कधीही अस्तित्व पुसून टाकणारे. तो जितका प्रेमळ, आपला वाटणारा तितकाच निष्ठूर, परका वाटावा इतका अलिप्त. अशा हिमालयाच्या प्रेमात पडणारे त्याच्याइतकेच मनाची उंची, सौंदर्याची आवड आणि स्वतःला झोकून देणारी वृत्ती जपणारे साहसी असणार हे निर्विवाद! त्यातले एक नाव म्हणजे वसंत वसंत लिमये! आठ आठवड्यांचा प्रवास. 'गिरिजा' या वाहनाने. खास निवडलेले वाहन. त्यात जेवणाचे साहित्य, तंबू, तेलाचे कॅन असा सगळा रसदसाठा. कुठेही तंबू ठोकून हिमालयाच्या कुशीत विसावयाची सोय, पुन्हा पुढे प्रवास सुरू. हिमालय यात्रेचा हा आनंद एकट्याने घेण्याऐवजी समवृत्ती असणारे आणखी सोळा जोडीदार निवडले. प्रत्येक आठवडा एक जोडी याप्रमाणे ही कल्पना देखील भन्नाटच. अर्थात ज्या जोड्या मिळाल्या त्याही भन्नाटच. आपापल्या क्षेत्रात स्वतः ठसा उमटवलेल्या. नुसती नावे पाहिली तरी त्यांचे मोठेपण, रसिकता आणि निसर्गप्रेमाची ओळख पटावी. मृणाल परांजपे, संजय रिसबूड, प्रेम मगदूम, अजित देसवंडीकर, निर्मल खरे, सचिन खेडेकर, सुनील बर्वे, सुहिता थत्ते, राणी पाटील, आनंद भावे, प्रशांत जोशी, राजू फडके, जयराज साळगावकर, डॉ. अजित रानडे, मकरंद भरणारे, सुबोध पुरोहित, डॉ. आनंद नाडकर्णी आणि चालक अमित शेलार. दिवसदिवस गाडी चालवण्याचे कसब तेही हिमालयाच्या अंगाखांद्यावर, हे येरागबाळ्याचे काम नाही, परंतु अमितने तो संपूर्ण प्रवास अगदी सहजपणे पूर्ण केला. सोबत सहभागी झालेल्या सर्वांसाठी लेखकाने 'हिमयात्री' असा छान शब्द योजलेला आहे.

सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवासजी पाटील ते लदाखचा मराठी हॉटेल मालक आत्माराम परब, गुरूडोंगमार लेक ते पँगाँग सरोवर, तिस्तानदी ते श्योक नदी, गंगटोक, सिक्कीम ते लेह, लदाख असा बारा हजारांहून अधिक किलोमीटरच्या या प्रवासात जे भेटले, पाहिले, अनुभवले, जगणे झाले, त्याचे वर्णन म्हणजे 'साद हिमालयाची'. नवा प्रदेश, नवी माणसे, नवी संस्कृती, प्रत्येकवेळी दिसणारे निसर्गाचे नवे रूप, कांचगगंगाचे दर्शन, मंदिरांचे दर्शन, अनवट वाटा, अवघड रस्ते, हिमालयातून उगम पावणाऱ्या नद्या, वृक्षराजी, खाद्य संस्कृती, हिरवळ, वाळवंट, ठिसूळपणा, भव्यता आणि याच्या जोडीला येणारा त्याच्या ठिकाणांचा इतिहास, हे सारेच अनुभव पातळीवर असल्याने आपण आपोआपच त्या वर्णनाच्या प्रेमात एकरूप होत जातो.


वसंत वसंत लिमये हे स्वतःच आयोजक असल्याने आणि आतापर्यंत पन्नास ते साठ वेळेस हिमालयात जाऊन आलेले असल्याने, त्यांच्या नजरेतून दिसणारी ही सफर आणि हिमालयीन संस्कृती, त्याचप्रमाणे त्यांच्यासोबत असलेल्या हिमयात्रींनी अनुभवलेली हिमालयीन संस्कृती यांचे वर्णन म्हणून समृद्ध अनुभवाचा मोठा खजिना म्हणावा लागेल. ही यात्रा म्हणजे वेगळाच साहसी अनुभव म्हणता येईल. तशी या पुस्तकाच्या निर्मितीमध्येही खास असे वेगळेपण आहे. संपूर्ण आर्ट पेपर, त्यावर पानोपानी रंगीत फोटो, केलेल्या प्रवासाचे नकाशे. त्यामुळे हे पुस्तक केवळ प्रवासवर्णन नसून जिवंत अनुभवाचा अस्सल खजिना आहे. कुणाही हिमालय प्रेमीसाठी प्रेरणा आणि मार्गदर्शक ठरावा असा हिमस्तंभ आहे. मांडणी आणि मुखपृष्ठासाठी निलेश जाधव यांचे खास अभिनंदन करायला हवे.

**मूल्य ३५० रु. सवलतीत २५० रु.**

# पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे



डॉ. वसुधा सरदेसाई लिखित 'मन:पूर्वक' या कवितासंग्रह प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. अशोक निरफराके, कवयित्री डॉ. वसुधा सरदेसाई, गायिका आरती अंकलीकर-टिकेकर, डॉ. सलील कुलकर्णी, डॉ. रा.वि. आफळे आणि डॉ. नितीन सरदेसाई



शुभांगी मुळे लिखित 'सृजनशील जगन्मित्र' या पुस्तक प्रकाशनसमयी धनश्री धारप, लेखिका शुभांगी मुळे, रोटरी ३१३१चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रवी धोत्रे, माजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे, युनिक ॲकॅडमी प्रोजेक्ट मॅनेजर नागेश गव्हाणे आणि उद्योजक नितीन मुळे



पद्मरेखा धनकर लिखित 'फक्त सैल झालाय दोर' या पुस्तक प्रकाशनसमयी कवयित्री पद्मरेखा धनकर, प्राचार्य डॉ. राजेश इंगोले, नीरजा, डॉ. पी. विठ्ठल, रवींद्र शोभणे आणि डॉ. भूषण रामटेके



'चार सख्य चोवीस'च्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन.
संपदा जोगळेकर-कुलकर्णी, डॉ. सोनाली लोहार, चंद्रकांत चेन्ने, नीलिमा कडे, रवी जाधव, विजयराज बोधनकर, निर्मोही फडके आणि हर्षदा बोरकर



'दिनूकाका' पुस्तकप्रकाशनसमयी जाधव कुटुंबीय

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.